# माणूस

शनिवार
२३ सप्टेंबर १९७२
किंमत पन्नास पैसे



माणूस रंगतरंग स्पर्धा — स्पर्धा क्रमांक सहा

श्याम जोशी

स्पर्धकाचे नाव, पत्ता आणि वय

भाग एक

यावेळची स्पर्धा खास करुन बालगोपालांसाठी आहे. (अर्थात थोर मंडळीही यात भाग घेऊ शकतात.)

मुखपृष्ठावर एक चार रंगी चित्र आहे. मागील पानावर त्याचेच रेखाचित्र आहे. आपण रेखाचित्रावर रंगकाम करून मूळ चित्राइतके किंवा त्याहीपेक्षा अधिक ते आकर्षक करा. चित्रात तुम्हाला वाटल्यास थोडा बदल करू शकता. परंतु तुमचे चित्र सुरेख व आकर्षक दिसावे ही अपेक्षा आहे.

(भाग २ : मलपृष्ठ १ वर)

माणूस साप्ताहिक : २३ सप्टेंबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

पन्नास पैसे

शनिवार
२३ सप्टेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| | | | |
|---|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | पंचवीस रुपये | वर्ष : बारा | अंक : सतरा |
| परदेशची वर्गणी | पासष्ट रुपये | | |

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

## सप्रेम नमस्कार....

☐ २९ जुलै १९७२ च्या 'माणूस'च्या अंकातील स्त्री! कुटुंबाचा एक प्रमुख घटक ह्या विषयावरील डॉ. सरोजिनी बाबर यांचा लेख वाचून फार नवल वाटले. सुशिक्षित आणि विचारी माणसाने समाजाचे पुढे पडणारे पाऊल रोखण्याचा प्रयत्न करावा हे नवल वाटण्याजोगेच आहे.

आज कित्येक पिढ्या नवऱ्याच्या अगर वडिलांच्या इस्टेटीत वाटा नसल्याने स्त्रियांनी फार हाल सोसले. अनेक विधवांना दीरांनी अगर पुतण्यांनी लुबाडल्यानंतर हाती पोळपाट-लाटणे घेणे भाग पडले. ह्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी कायदा करून त्यांना इस्टेटीत वाटा द्यावा लागला. स्त्रीने घराची मर्जी संभाळून अगर कर्तृत्व दाखवून हवे ते मिळवावे हे म्हणणे सोपे असले तरी व्यवहारात ते मिळायला कायदाच लागतो.

ज्या काही स्त्रियांच्या वागण्याने सान्याच स्त्रिया हे हक्क मिळायला नालायक आहेत असे सरोजिनीबाईंना वाटते. त्या स्त्रिया समाजातल्या अतिशय श्रीमंत अशा अत्यल्प वर्गातला लहानसा भाग आहेत त्या स्त्रियांसंबंधाने कदाचित असेही म्हणता येईल की, त्यांना स्वतंत्र अस्तित्व नसल्याने व त्या संपूर्णतः नवऱ्याच्या लहरीवर अवलंबून असल्याने त्या निव्वळ नवऱ्याची हौस म्हणून स्वैराचाराला बळी पडत असतील.

पण कसेही असले तरी त्यांच्या वागण्यामुळे सर्व स्त्रियांना त्यांच्या हक्कापासून वंचित करावे असे म्हणणे म्हणजे एक-दोन रोपांना कीड लागली म्हणून सगळी बागच उध्वस्त करण्यासारखे आहे. बायकांचे शील संभाळण्यासाठी त्यांना पडद्यात अगर घरात कोंडून ठेवणाऱ्या मध्ययुगाकडे आपल्याला परत जावयाचे आहे का ?

**सौ माधुरी भिडे**, मुंबई

**माणूस : रंगतरंग स्पर्धा क्रमांक ६ यावेळी मुखपृष्ठावर देण्यात आलेली आहे.**

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

## पुणे वार्ता

# एक अभिनव प्रदर्शन !

मुकुंद मणूरकर

मराठीतील एक बंडखोर समजले जाणारे कवी मनमोहन यांनी चितारलेल्या गणेशचित्रांचे प्रदर्शन रॉय किणीकर यांनी भरविले होते. ज्यांच्या कवितेबद्दल दिलीप चित्र्यांनी 'विसाव्या शतकातील एकाही कवीने त्यांच्याइतकी भरारी मारली नाही' असे उद्‌गार काढले, त्या मनमोहनांनी गणेशाची चित्रे काढावीत हे आश्चर्य होते. पण ही चित्रे नाहीतच! गणेश या प्रतीकातून त्यांच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. त्यामुळे परंपरेला धक्के देणारे आकार गणपती म्हणून आपल्यापुढे उभे ठाकतात! मनमोहन रोज सकाळी उठल्यावर गणेशाचे चित्र काढतात. त्या वेळी जी त्यांची मन:स्थिती असते तिचे प्रतिबिंब त्यांच्या त्या दिवशीच्या चित्रात पडते. हर्षातिरेकाचा प्रसंग असो किंवा पुत्रवियोगाची शोकांतिका असो, त्यांच्या मनाची त्या वेळची हर्षखेदाची अवस्था गणेशाच्या चित्ररूपाने आकारते. त्यामुळे त्यांच्या काही प्रतिमा, शक्तिपात योगानंतर ज्ञानदेवांनी म्हटलेल्या, 'ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा। जया विश्वबीजाचिया कोंभा। साऊली केली ॥' याची जाणीव देतात.

जे वाङ्‌मयलिपीचे बंधन तोडू शकते, ते श्रेष्ठ अशी त्यांची धारणा असल्यामुळे आपल्या भावना व्यक्त करण्याचे वैश्विक माध्यम म्हणून त्यांनी चित्रकलेचा ध्यास घेतला! मनमोहन यांची ही चित्रे भारतीय चित्रेतिहासात एका नव्या प्रमत्त प्रतिभेच्या आविष्काराचे नवे पर्व सुरू करीत आहेत असे म्हटले जाते.

असो. चंद्रसूर्याची बटने लावून हिंडणाऱ्या व स्वत:ची लंगोटी पताका म्हणून खांद्यावर धारण करणाऱ्या या बंडखोर कवीच्या चित्रांनी त्याच्या काव्यवाचनाइतकाच आनंद दिला! ◻

## गणेशोत्सवाचे प्रचंड स्वरूप

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला दिलेल्या सार्वजनिक स्वरुपाने किती प्रचंड झेप घेतली आहे हे बघायचे झाल्यास गणेशोत्सवात पुण्यात मुक्काम करावा! युरोपमध्ये नाताळमध्ये जशी धमाल चालते तशी पुण्यात गणपतीच्या दहा दिवसात चालते! आबालवृद्ध, स्त्रीपुरुष या सर्वांच्यात मूर्तिमंत उत्साहाचे वारे शिरलेले असते.

बाकी पुण्यात जमा गणपती गाजतो तसा इतरत्र गाजत नाही हे नक्की! आणि का गाजत नाही हेही समजत नाही.

उत्सवाच्या आधी पंधरा दिवस दरवर्षी कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक वगैरेंची सभा भरते व त्यात एक आचारसंहिता ठरविली जाते. सर्वांची त्याला मान्यता मिळते, पण नियम कोणीच पाळत नाहीत. कारण ते मुळी पाळता येण्यासारखे नसतातच! म्हणून यंदा महापौर निळूभाऊ लिमयांनी नवा पवित्रा घेतला. उत्सवातील सर्व बंधने काढून टाकली. एवीतेवी कोणी नियमांप्रमाणे वागत नाहीतच, मग मोठेपणा मिळतोय तो का सोडा! ते काही असो, हे फालतू नियमांचे बंधन काढून टाकल्यामुळे यंदाचा उत्सव विशेष मुक्तपणे साजरा झाला.

गणपतीतील दहा रात्रींना दिवसाचे स्वरूप आले. सर्वांना, विशेषतः तरुणींना रात्रीही मुक्तपणे संचार करण्याची मुभा फक्त गणपतीतच असते! निरनिराळ्या मंडळांनी अविश्रांतपणे खपून साकार केलेली दृश्ये पहायला रस्ते फुलून गेले होते.

शिल्पकृती किंवा विद्युत् रोषणाई यांच्या सहाय्याने सजावट होते. केवळ शिल्पकृतीचा विचार केल्यास तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. त्यांनी यंदा ओरिसातील कोणार्कच्या सूर्यमंदिराची प्रतिकृती निर्माण केली होती. अभिनव कला विद्यालयातील एक प्राध्यापक ऑर्टिस्ट डी. एस्. खटावकर यांनी मूळ मंदिर पाहून, त्याची स्केचेस् काढून त्या सहाय्याने हे दृश्य साकार केले. सुमारे ६० फूट लांब, ४० फूट रूंद व २५ फूट उंच ही या भव्य कलाकृतीची बाह्य मापे! आणि आत शिल्पशास्त्राचा नयनमनोहर आविष्कार होता. एका प्रचंड रथात अश्वारूढ सूर्यरूपी गणेशमूर्ती असून हा रथ सहा अवाढव्य घोडे झेपावलेल्या अवस्थेत ओढीत होते. गाभाऱ्यातील भिंतीवर नवग्रह कोरले होते. त्यांचे कॉम्पोझिशन इतके झकास झाले होते की, जागेवरील खांबासारखे काही अडथळे बेमालूमपणे झाकले गेले होते! एका भिंतीवर चार फूट व्यासाचे प्रचंड चक्र प्रतीक म्हणून उभारले होते. दर्शनी भिंतीपैकी एका भिंतीवर विविध हावभाव व्यक्त करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या, नर्तकींच्या प्रतिमा कोरल्या होत्या. मोहक व प्रमाणबद्ध अशा या प्रतिमांमुळे या भिंतीला एक लय निर्माण झाली होती. दुसऱ्या एका भिंतीवर सुमारे १५ फूट उंचीचा एक प्रचंड हत्ती कोरला होता. निरनिराळ्या अलंकारांनी मढविलेला हा हत्ती दृश्याच्या भव्य स्वरूपाचा निदर्शक होता. हे सर्व दृश्य मूळच्याच म्हणजे काळसर हिरव्या रंगात घडविले होते. त्यामुळे खरेखुरे मंदिर पहात आहोत असा आभास निर्माण होई. गणेशमूर्ती ही सूर्यदेवाच्या रंगात म्हणजे लालभडक अशा फ्लोरोसंट कलरमध्ये रंगविली होती. या भव्य दृश्यातील इंचाइंचातून

खटावकरांच्या उच्च कलेचा आविष्कार व्यक्त होत होता. खटावकरांनी ही कलाकृती अभिनव कला विद्यालयातील त्यांच्या चाळीस विद्यार्थी कलाकारांच्या मदतीने तीन महिन्यात उभी केली. विशेष म्हणजे त्यांनी यासाठी एका पैशाचाही मोबदला घेतला नाही. गेली चार वर्षे ते अशाच तऱ्हेने मोबदला न घेता, केवळ हौस म्हणून अशा भव्य कलाकृती सादर करीत आहेत. यंदाच्या गणेशोत्सवातील सर्वोत्कृष्ठ कलाकृती म्हणून याचा निर्देश केल्यास ते कुणावरही अन्यायकारक होणार नाही याची खात्री वाटते !

खटावकरांशिवाय शाम सारंग, खेडकर, वाघ या कलाकारांनीही आकर्षक कलाकृती सादर केल्या. सद्यस्थितितील दृश्ये सादर करण्याच्या दरवर्षीच्या प्रथेला यंदाही अपवाद नव्हता. क्रांतीकारकांची वीरगाथा, भारत-पाकयुद्ध, दुष्काळग्रस्त परिस्थिती इथपासून ते सिमला करार, मुंबईतील संपापर्यंतची दृश्ये पेश केली होती. पिंजरा, पाकिझा अशा चित्रपटातील दृश्येही काहींनी उभारली होती. एका मंडळाने तर गणेशमूर्तीला राजेश खन्नाच्या स्वरुपात अवतरविले होते !

शिल्पकृतींप्रमाणे सजावटीचे दुसरे अंग म्हणजे विद्युत् रोषणाई ! गेल्या दोन-तीन वर्षात विद्युत् रोषणाईचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. बहुतेक सर्वांनी संगीताच्या तालावर नाचणारी विद्युत् रोषणाई केली होती. एका बाजूला इंग्लिश ट्यून्स् किंवा सनई, चौघडा आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या सुरांच्या हुकूमाप्रमाणे तयार होणारे आकर्षक विद्युत् आकार अशी जुगलबंदी प्रेक्षकांना बऱ्याच वेळ एका जागी खिळवून ठेवत होती. वस्ताद शेकचंद नाईक तालमीने अशा तऱ्हेची अप्रतिम रोषणाई केली होती. सोमवार पेठेतील अमरज्योती मंडळाने तर विद्युत्रोषणाईवर पंधरा हजार रुपये खर्च केले होते.

ही सर्व आरास बघण्यास रस्त्यावर पहाटे चार-चार वाजेपर्यंत तुडुंब गर्दी असे. हातातील ‘टिकटिक’ वाजवत किंवा पिपाणीचा आवाज करीत जाताना पहाट कधी उजाडे याचा पत्ता नसे ! ज्या उत्साहाने भव्य दृश्ये पाहिली जात त्याच उत्साहाने एखाद्या दुकानाच्या शोकेसमध्ये चाललेला बाहुलीचा नाच किंवा माकडाचे बँडवादनही पाहिले जाई ! एखाद्या मंडळापुढे वाजणाऱ्या इंग्लिश ट्यून्सच्या तालावर काही तरुण रॉक अँड रोल करीत, आणि त्यांना पहायला तिथे लगेच प्रचंड गर्दी जमे !

सजावटीवर खर्च करण्याऐवजी पूजेची, कायमची मूर्ती बसविण्याकडे बऱ्याच मंडळाचा कल दिसून आला. अशा गणपतीपुढे होमहवन, भजनपूजन, अथर्वशीर्ष पठण अशा धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल होती. यंदा दगडूहलवाई गणपती मंडळाने श्रीची महापूजा दररोज अस्पृष्ट समाजातील दांपत्यांच्या हस्ते

करण्याचा पायंडा पाडला.

सजावटीकडे लक्ष दिल्यामुळे बहुतेकांनी करमणुकीच्या कार्यक्रमांना पूर्णपणे फाटा दिला होता. काही ठिकाणी चित्रपट दाखविले गेले. रामदास कामत, सुलोचना चव्हाण यांनीही हजेरी लावली. करमणुकीबरोबरच जनमानसात वैचारीक क्रांती करण्याचा लोकमान्यांचा या उत्सवामागील हेतू होता ! या त्यांच्या कल्पनेचे पालन त्यांच्या वास्तूतच दरवर्षीप्रमाणे यंदाही केले गेले. गायकवाड वाड्यातील केसरी कचेरी गणपतीसमोर यंदा शिवाजीराव भोसले, अप्पासाहेब पवार, डॉ. वि. म. दांडेकर प्रभृती विचारवंतानी भाषणे केली. दांडेकरांनी दलितांच्या प्रश्नावर एक खळबळजनक भाषण ठोकले. ते म्हणाले, 'स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शासनाने अस्पृष्टांसाठी राखीव जागा ठेवल्या पण त्यांना अधिकारपदाची जागा मिळू नये अशी खबरदारी घेतली गेली. मंत्रिपदाची ठराविक खातीच महाराष्ट्रात हरिजनांकडे सोपविली जात आहेत, कमी दर्जाच्या व कमी महत्त्वाच्या जागा त्यांना दिल्या जात आहेत.' हिंदू धर्माविषयी बोलताना ते म्हणाले, 'सात्विक धर्मकल्पना बाळगून समानता निर्माण होणार नसेल तर धर्म सोडावा या निर्णयाप्रत मला यावे लागेल. मोक्षाची कल्पना ठेवून मोक्षाची दारे सर्वांना खुली असली पाहिजेत !'

असो. चैतन्याची पखरण करणारे गणपतीबाप्पा २२ तारखेला आपल्या घरी जातील ! उत्सवाचा मानबिंदू ठरणारी ही विसर्जन मिरवणूक दरवर्षीप्रमाणे यंदाही अनंत चतुर्दशीला दुपारी एक वाजता निघेल व दरवर्षीप्रमाणेच दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता शेवटच्या गणपतीच्या विसर्जनाने तिची सांगता होईल ! आतापर्यंत अनेक पोलीस कमिशनरांनी विडे उचलले, पण एकालाही ही मिरवणूक रात्री बारावाजेपर्यंत संपविणे जमले नाही,— आणि पुढेही कुणाला जमणार नाही ! !

□ □ □


**संध्याकाळ**

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# सत्यनारायण पूजा बंदी हवी !

डॉ. बाबा आढाव

सालाबादप्रमाणे यंदा श्रावण महिन्यात झालेल्या अनेक सत्यनारायण पूजेची निमंत्रणे माझ्याकडे आली. त्यातील दोन विशेष होती. कै. केशवराव जेध्यांच्या घरचे निमंत्रण माजी उप-महापौर जयसिंगराव जेधे यांनी आग्र-हाने माझ्या खिशात कोंबले. दुसरे निमंत्रण सेंट्रल बिल्डिंगमधील शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी पाठविले होते. निमत्रण निनावी होते. परंतु खास उल्लेख होता... 'अनेक मोठे अधिकारी पूजा-प्रसादासाठी येणार आहेत. त्यांच्या गाडीपुढे आडवे पडण्यासाठी आपण अगत्याने यावे.' परंतु माझ्यापुढे प्रश्न पडतो...

**सत्यनारायण पूजेची भाकडकथा किती दिवस चालणार ?**

सत्यनारायणाच्या पूजेचे फॅड कधी सुरू झाले ? याबद्दल अनेक तर्क सुचवि-ण्यात येतात. महाराष्ट्रात मात्र ही पूजा १००–१२५ वर्षांपूर्वीच आवतरली असावी. सत्यशोधक चळवळीच्या काळात हे सत्यनारायणाचे पिल्लू बहुजनांच्या घरात शिरले. त्याचा अवतार बराच वाढला आहे. श्रावण, भाद्रपद महिन्यात तर हा अवतार 'संगीत सत्यनारायण', 'सत्यनारायण महापूजा', 'सार्वजनिक सत्यनारायण', '१०८ सत्यनारायण', 'सव्वाखंडी सत्यनारायण' अशी विविध रूपे धारण करतो. सत्यनारायणाची पूजा करणारे विविध हेतूने पूजा बांध-तात. 'चार लोकांना आपल्या घरी येता यावे, चार लोकांचा हात आपल्या घरी धुतला जावा' असा सर्वसाधारण संकेत असतो. घरी लग्नकार्य झाले, की सोळाव्याला पूजेचे निमित्त करून लग्ना-तला उरलासुरला मानपानाचा व्यवहार पुरा करण्यात येतो. थोडक्यात म्हणजे कौटुंबिक जीवनात आप्तेष्ट-मित्रांना एकत्रित करण्यासाठी 'निमित्त' म्हणून सत्यनारायण पुजेचा उपयोग होतो. काही जणांचे नवस असतात. नवस म्हणजे देवाशी केलेला वायदा. सौदा पूर्ण होवो न होवो; देवाचा कोप नको म्हणूनही पूजा उरकण्यात येते. अनेक धार्मिक सप्ताहांची, पारायणांची, तीर्थयात्रेची समाप्ती या पूजेने होते. काही प्रसंगी सुरुवात होते. वास्तुशांतीला नव्या घरात ही पूजा केली जाते. लग्नपत्रिकेप्रमाणे निमंत्रणपत्रिका छापून वाटण्यात येतात.

या पूजेचे गौडबंगाल काय आहे ? याचा कोणी प्रत्यक्षात विचारच केलेला नाही. तो करतो म्हणून मी करतो एवढेच. काही तरी पुण्य गाठी बांधले जाईल ही खात्री व त्यामुळे जिवाला लाभणारी शांती...

सार्थ श्री. सत्यनारायणपूजा–कथा एखाद्या रुपयाला बाजारात विकत मिळते. पूजाविधीचा, पुराणोक्त मंत्रांचा अनुवादित अर्थ यात छापलेला नसतो. नवराबायको पूजेला बसतात. दिवसभर उपवास केलेला असतो. भटजीबुवांनी मंत्र म्हणावयाचे व यजमानांनी तुळशीपत्रे वाहायची. अर्धांगी हाताला हात लावायचा. (पुजेतील सर्वांत मोठा चार्म) भटजीबुवा काय काय म्हणतात?

ओम पुण्याहम् । इत्याद्युहः कार्यः
स्त्री शूद्रादिभिर्वैदिक मंत्र रहित
कार्यम् ।
अथ कलश स्थापनम् ।
ब्राह्मणानां शालिग्राम शीला ।
स्त्री शूद्रादिनांतु प्रतिमा पूजनम्
ओम इदं विष्णुर्विचक्रमे ।
ओम ब्राह्मणोस्य मुख मासीद्बाहू-
राजन्यः कृतः ।
उरुतदस्ययद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो
अजायत ।

या संस्कृत श्लोकांचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. स्त्री-शूद्रादिकांना वैदिक मंत्रांचा अधिकार नाही. ब्राह्मणांनी शालिग्रामशीला पुजावी. इतरेजनांनी प्रतिमा म्हणजे रांगता कृष्ण वा फोटो पुजावा. मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य व पायांपासून शूद्र निर्माण झालेत हे लक्षात घ्यावे. (ब्रह्मदेवाच्या) मानवाच्या उत्पत्तीचे हे व्हेजिटेटिव्ह रिप्रॉडक्शन पाश्चात्यांच्या अजून लक्षात आलेले नाही. वेदाची लॅबोरेटरी किती महान होती हे सहज लक्षात यावे.

हे सारे श्लोक पूजा करणारा न समजता निमूटपणे ऐकून घेतो. भटजी बुवांची वटवट सुरू राहते. पूजाविधी संपल्यानंतर भटजीबुवा कथेला सुरुवात करतात. (उरकू लागतात)

नैमिष अरण्यात एकदा शौनकादिक पुष्कळ ब्राह्मण एकत्र बसले होते.

मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील असे एखादे व्रत ऐकण्याची त्यांना तीव्र इच्छा झाली. पुराणिकाने त्यांना सांगितले 'नारदाने भगवान विष्णूजवळ अशीच इच्छा प्रगट केली होती. भगवंताने नारदाला जे सांगितले तेच तुम्हाला सांगतो. लक्ष देऊन ऐका...

– मृत्युलोकी अनेक प्राणी अनेक प्रकारची दुःखे भोगीत आहेत. कोणास अन्न नाही कोणास वस्त्र नाही, कोणास संतती नाही, काहींना दुर्धर रोग जडलेत. अनेक योनीचे पशुपक्षी, मनुष्यादी जीवजंतु आपापल्या पूर्वजन्मीच्या कर्मानुरूप क्लेश भोगीत आहेत. त्यावरचा उपाय भगवंतांनी नारदाला सांगितला.

– बालका नारदा, ज्याच्या आचरणे करून मानव आपल्या मोहजालांपासून उद्भवलेल्या दुःखातून मुक्त होतील असा उपाय म्हणजे 'सत्यनारायणाचे व्रत.' स्वर्ग, मृत्यू, पाताळांतही जे आजवर दुर्लभ होते ते बालका, केवळ तुझ्यावरच्या प्रेमामुळेच तुला सांगतो.

मग भगवंतांनी या व्रताचे फल व विधी कथन केला. फलप्राप्तीची उदाहरणे पुढीलप्रमाणे.

१. काशीक्षेत्रात कोणी एक ब्राह्मण

[ पृष्ठ ५८ वर ]

# आलेपाक

समाजवादी पक्षाने आपले ध्येयधोरण सांगणारा नवा जाहिरनामा नुकताच प्रसिद्ध केला. त्यात, सत्ताधारी काँग्रेसला हटवणे हे पक्षाचे सर्वप्रमुख ध्येय आहे, असे म्हटले आहे.

वास्तविक पाहता आपला पक्ष (कसाबसा) टिकवणे, हे समाजवादी पक्षाचे सर्वप्रमुख ध्येय असायला हवे.

पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट स्थानकासमोरील चौकाचे देवी अहिल्याबाई होळकर चौक असे नामकरण करण्यात आले आहे.

मुंबईचे कलकत्ता होईल तेव्हा होवो; पण आता मुंबईचे पुणे व्हायला कितीसा उशीर ?

पवई येथे दीक्षान्त समारंभात इंदिरा गांधींनी काढलेले उद्गार : ' देशाला व समाजाला काय देता येईल याचा पदवीधरांनी विचार करावा. '

आणि पदवीधरांना काय देता येईल याचाही विचार पदवीधरांनीच करावा.

पंतप्रधान इंदिरा गांधींविरुद्ध काळे निशाण घेऊन निदर्शन करू इच्छिणारे अखिल भारतीय हिंदुराज्य पक्षाचे सरचिटणीस संत कर्तारसिंग ऊर्फ ल. ग. थत्ते यांना अटक करण्यात आली. आता त्यांची अटकसंख्या ९१ झाली असून हा अटकेबाबतचा जागतिक उच्चांक असावा.

मी म्हणतो, श्री. थत्ते यांनी अटकेपार निशाण लावण्याची महत्त्वाकांक्षा का धरू नये ?

मुंबईत भुयारी रेल्वे बांधण्याची योजना तयार होते आहे, असे म्हणतात.

कोणी असेही म्हणतात, की मुंबईत भुयारी झोपडपट्टी बांधण्याची योजना तयार होते आहे !

ही बातमी वाचा : वेश्या-व्यवसायात शिक्षणतज्ज्ञ : घाटकोपरच्या वेश्या-वसाहतीचे अजब गूढ : घाटकोपरच्या रामनिरंजन झुनझुनवाला कॉलेजसमोरील वेश्या-व्यवसाय त्या कॉलेजमधील एका प्रमुख व्यक्तीच्या प्रोत्साहनाने चालतो अशी खळबळजनक माहिती आमच्या हाती आली आहे. (संपादक विश्वनाथराव वाबळे यांचे ' दैनिक शिवनेर ' वर्ष १९, अंक १७, सोमवार दि. ५ जून १९७२)

कमाल आहे ! या कॉलेजात आर्टस् आणि सायन्सव्यतिरिक्त ' बिझिनेस मॅनेजमेंट 'चे वर्ग चालतात, एवढीच मोघम माहिती आम्हाला होती.

ऑलिंपिक उपांत्य फेरीतील भारत-

पाकिस्तान हॉकी सामन्याचे वर्णन एका क्रीडासमीक्षकाने पुढीलप्रमाणे केले होते : ' खेळावर भारताचे प्रभुत्व; पण गोल करण्यात पाकिस्तानचे. '

' सिमला-कराराचेही वर्णन एखाद्याला वरच्याप्रमाणेच करता येईल : ' वाटाघाटीवर भारताचे प्रभुत्व; पण लाभ उठवण्यात पाकिस्तानचे ! '

एक अधिकृत आकडेवारी असे सांगते, की सध्या आपल्या देशात ७५,००० शास्त्रज्ञ, ६४,७०० तंत्रज्ञ आणि २,६२० डॉक्टर्स बेकार आहेत.

यांना बोनस मिळवून देण्यासाठी काय करावे, या विचाराने अगदी त्रस्त झालो आहे मी.

महापालिका कामगारांना बोनस हवा; बेस्ट कर्मचाऱ्यांना बोनस हवा; राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना बोनस हवा; राज्य कर्मचाऱ्यांना बोनस हवा; केंद्रीय कर्मचाऱ्यांना बोनस हवा; जॉर्जच्या कामगारांना बोनस हवा; भाई डांगेंच्या कामगारांना बोनस हवा; रजनी पटेलांच्या आणि खाडिलकरांच्या कामगारांना बोनस हवा; काम करणाऱ्या कामगारांना बोनस हवा; काम न करणाऱ्या कामगारांना बोनस हवा; बोनस मिळणाऱ्या कामगारांना अधिक बोनस हवा.

नस-बंदीसारखी आता बो-नस-बंदीची चळवळ निघायला हवी असे तुम्हाला नाही वाटत ?

' विच्छे 'च्या प्रयोगासाठी वसंत सबनीस उभे राहिले नसते तर ' विच्छा 'ला यश मिळाले नसते, असे दादा कोंडके म्हणाले.

---

**श्यामरावांची दैनंदिनी**



हे म्हणजे सबनीसांना टक्कल नसते तर त्यांनी 'विच्छा' लिहिलेच नसते, असे म्हणण्यासारखे आहे.

रविवारच्या 'नवशक्ती'तील जपान! जपान! या प्रवासवर्णनात लेखक डॉ. विठ्ठल प्रभु म्हणतात : 'क स य ह म न ग त ही अक्षरे कशीही जुळवली, की जपानी भाषा होते' असा निष्कर्ष मी काढला.

यात काय विशेष? आम्हीसुद्धा ए बी सी डी पासून एक्स वाय झेड पर्यंतची अक्षरे कशीही जुळवली, की इंग्रजी भाषा होते, असे पिढ्यानपिढ्या मानत आहोत.

याच प्रवासवर्णनात ते पुढे म्हणतात, 'तरुण मुलगी जपानी भाषा बोलत राहिली, की कानावरून पीस फिरवल्यासारखे वाटे.'

पीस फिरवल्यासारखे वाटे ते तिच्या जपानीमुळे नव्हे; जवानीमुळे!

एक अवलोकन : प्रा. वसंत कानेटकर तीन कादंबऱ्या लिहून नाटयलेखनाकडे वळले. पण एकदा नाटके लिहायला लागल्यावर ते परत कादंबरीकडे वळले नाहीत.

श्री. श्री. ना. पेंडसेदेखील कादंबऱ्या लिहून मग नाटयलेखनाकडे वळले; पण नाटके लिहिण्यासाठी ते आपल्याच कादंबऱ्यांकडे वळले!

---






## ख्रिस्ती

रहस्यकथा लिहिणाऱ्या विद्यमान लेखकात अॅगाथा ख्रिस्ती ही बहुधा सर्वात अधिक प्रसिद्ध आहे. वाढत्या वयाचा तिच्या लेखनावर सकृद्दर्शनी कसलाही परिणाम झालेला नाही. गेली पन्नास वर्षे तिचे लेखन सारख्याच उमेदीने चाललेले आहे.

तिच्या पुस्तकांची १०३ भाषांतून भाषांतरे झाली असून पुस्तकांच्या ३५० लाखांवर प्रती विकल्या गेल्या आहेत. कादंबऱ्या, नाटके आणि चित्रपट यांच्यामुळे तिला होणारी वार्षिक प्राप्ती सुमारे एक लाख पौंड आहे ! ◻

## अरब अॅटिट्युड्स टु इस्रायल

म्युनिकच्या ऑलिंपिक नगरीत अरब गनिमांनी इस्रायली खेळाडूंची भीषण हत्या केली. या पाशवी कृत्याला क्रीडेच्या प्रदीर्घ इतिहासात तोड सापडणार नाही. हे पाशवी कृत्य अकस्मात झालेले नाही. आज अनेक वर्षे अरबांच्या मनात इस्रायलबद्दलचा द्वेष धुमसतो आहे. याला पुरावा हवा असेल तर 'अरब अॅटिट्युड्स टु इस्रायल' हे पुस्तक वाचा. मूळ पुस्तक इस्रायली पायदळातील गुप्तहेरखात्याचा प्रमुख येहोशाफात हारकावी याने हेब्रूमध्ये लिहिले आहे. इंग्रजी भाषांतर : मिशा






लूविश; प्रकाशक : हार्ट; पृष्ठे : ५२७, किंमत : सुमारे ८० रु.


या पुस्तकासाठी हारकाबीने १९१ अरब पुस्तकांची व लेखांची साक्ष काढली आहे. त्यानुसार, इस्रायलला नामशेष करणे हे अरबांचे ध्येय आहे, असा निष्कर्ष निघतो.

अरब-इस्रायल संघर्षात मृत्यू पावलेल्या ज्यू व अरबांना हे पुस्तक अर्पण केले आहे. □

## लेडी चॅटर्लिज लव्हर

काही गोष्टी आपण प्रत्यक्ष वाचलेल्या-पाहिलेल्या नसतात. परंतु त्या गोष्टींबद्दल वातावरणात इतकी माहिती फैलावलेली असते, की आपण त्या गोष्टी वाचल्या-पाहिल्या आहेत असा आपला दृढ समज होऊन बसतो. शिवाय एखादी 'चालू' गोष्ट आपल्याला माहीत नाही असे सांगणे माझ्या तरी जिवावर येते. 'सखाराम बाईंडर'बद्दल बोलणे निघाले तर मी नाटक पाहिले आहे अशा थाटात बोलतो. आता ते नाटक मी खरोखरच पाहिले आहे, ही गोष्ट वेगळी. ते जाऊ द्या. मी काय म्हणतो ते तुम्हाला कळलं म्हणजे झालं.

'सखाराम बाईंडर' मी पाहिले असले तरी डी. एच् लॉरेन्सची अश्लील म्हणून गाजलेली 'लेडी चॅटर्लीज लव्हर' ही कादंबरी मी वाचलेली नाही. पण त्या कादंबरीबद्दल मी इतके ऐकले आहे, की ती मी वाचलेली नाही






असे सांगणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे, अशी भीती कोणीतरी मला घातलेली आहे.

आता 'लेडी चॅटर्लीज लव्हर' या कादंबरीचे दोन अवतार आहेत हे तर आपण सगळे जाणतोच. एक अस्सल अवतार (ज्यात 'सगळे' आहे); आणि दुसरा कम-अस्सल अवतार (ज्यात सगळे नाही). परंतु आता या कादंबरीचा, आत्तापर्यंत अदृष्य असलेला, अवतार प्रकट झाला आहे. त्याचे नाव आहे : 'जॉन थॉमस अँड लेडी जेन'. कादंबरीचा हा दुसरा खर्डा असून डी. एच् लॉरेन्सने तो १९२७ साली पुरा केला होता. या खडर्यावर लॉरेन्सने संस्कार केले, आणि संस्कारित खर्डा 'लेडी चॅटर्लिज लव्हर' या नावाने पुढे आला. यावेळी काही पात्रे बदलली होती; आणि मुख्य म्हणजे, लॉरेन्सने शेवट पार बदलून टाकला होता.

लॉरेन्सने 'जॉन थॉमस अँड लेडी जेन' हे नाव बदलून 'लेडी चॅटर्लिज लव्हर' असे कादंबरीचे नवे नामकरण केले ते योग्यच झाले. या नामबदलामुळेही सुरुवातीला ती कादंबरी लोकांच्या नजरेत भरायला मदत झाली असावी. 'जॉन थॉमस अँड लेडी जेन' हे काय 'सगळे' असणाऱ्या कादंबरीला शोभेसे नाव आहे?.. मला वाटते, नावातील बदल लॉरेन्सला आधी सुचला असावा; आणि मग बदललेले नाव सार्थ करण्यासाठी त्याने त्या दुसऱ्या खडर्यावर योग्य ते संस्कार केले असावेत!

□

## कुत्र्या-माणसात काय फरक ?

ही बातमी तुम्ही ऐकलीत का? नाही? ऐका तर मग : कोणी एक मिस एलेनॉर रिचे नावाची अमेरिकन बाई होती. तिला कुत्रा पाळण्याचा षोक होता. (तसा षोक आम्हालासुद्धा पुष्कळ आहे; पण कुत्री पाळणे आम्हाला जमण्यासारखे नाही; आम्ही आपले ढेकूण पाळावे.) बाईजवळ अफाट संपत्ती होती. पण मरताना संपत्ती बरोबर थोडीच नेता येते? सांगायचे तात्पर्य, बाई मेली. मृत्युपत्रान्वये आपली १० कोटी रुपयांची संपत्ती बाईने ८१ कुत्र्यांच्या स्वाधीन केली आहे.

मग काही नातेवाईकांनी मृत्युपत्राबद्दल तक्रार केली. प्रकरण न्यायालयात गेले. कुत्र्यापुढे चार तुकडे फेकावे, तसा संपत्तीचा थोडा भाग नातेवाईकांपुढे फेकला गेला; बाकीची संपत्ती त्या कुत्र्यांचीच, असा निर्णय झाला. सगळे कुत्रे मेल्यावर ती संपत्ती प्राण्यांवर संशोधन करणाऱ्या कोठल्याशा संस्थेला मिळणार आहे.

बातमी वाचली तेव्हा क्षणभर वाटले होते, आपण त्या ८१ कुत्र्यांमधले एक असतो तर किती रम्य झाले असते! नाहीतरी कुत्र्या-माणसात काय मोठा फरक आहे? माणसे काय भुंकत नाहीत? माणसे काय खाऊ घालणाऱ्या धन्याच्या पुढे घोटाळत नाहीत? माणसे आपल्या पायात शेपटी घालत नाहीत? माणसे काय कुत्र्यांसारखी जगत नाहीत? आणि कुत्र्यांच्या मौतीने मरत नाहीत?

—अनंतराव

मृत्यूने ओशाळावे
हिटलरने लाजावे अशी

# पाक युद्धकैद्यांची अमानुष गुन्हेगारी

म. श्री. दीक्षित

भारत-पाक देशात जो सिमला-करार झाला त्यातील एक अनिर्णित बाब म्हणजे भारताच्या ताब्यातील पाऊण लाख पाक युद्धकैद्यांच्या सुटकेचा प्रश्न. भारताने पाक युद्धकैदी भारतात आणले ते मुख्यत: त्यांच्या सुरक्षिततेसाठी. हे युद्धकैदी पोसणे बांगला देशला आर्थिकदृष्ट्या एक तर शक्य नव्हते आणि दुसरे म्हणजे सूडभावनेने पेटलेल्या बांगला देशाच्या नागरिकांनी या युद्धकैद्यांना सुरक्षित जीवन जगू दिले नसते. बांगला देशात १६ डिसेंबर १९७१ ला पाक सेनेने जी शरणागती पत्करली, ती भारतीयसेना आणि बांगला देशाची मुक्तिसेना यांच्या संयुक्त आघाडीपुढे स्वीकारली ही गोष्ट लक्षात घेता, या शरणार्थी युद्धकैद्यांचे भवितव्य उभय देशांच्या संमतीनेच ठरावयाचे आहे व ते रास्त आहे. मैत्री व सहकार्याच्या भावनेतून भारताने आतापर्यंत या युद्धकैद्यांवर चार-पाच कोटींचा खर्च केला आहे व या कैद्यांना आंतरराष्ट्रीय संकेतानुसार चांगली वागणूक दिली आहे.

सिमला कराराची दुसरी फेरी सुरू होईल, त्या वेळी काश्मीर आणि युद्धकैद्यांची सुटका हे दोन्ही प्रश्न गंभीरपणे सोडविण्याचा यत्न होईल. भारताला हे युद्धकैदी फार काळ पोसणे शक्य नाही. त्यांना बांगला देशाच्या संमतीने लवकरात लवकर सोडून मायदेशी पाठविणे हेच सर्वांच्या हिताचे व भारत-पाक देशात टिकाऊ शांतता नांदण्याच्या दृष्टीने योग्य होईल. तथापि, सर्वच युद्धकैद्यांची सुटका करायची की गुन्हेगार, अत्याचारी कैदी वगळून इतरांची करायची हा खरा वादाचा प्रश्न आहे. या वादाचा निकाल अर्थातच बांगला देशचे मुजीब सरकार कोणते धोरण ठरवते त्यावर अवलंबून आहे. पाक राष्ट्राध्यक्ष भुट्टो यांनी युद्धगुन्हेगारांची चौकशी करून त्यांना कठोर शासन करण्याचे आश्वासन दिले तर हा प्रश्न लवकर सुटण्यासारखा आहे. अर्थात यासाठी युद्धगुन्हेगारांची चौकशी व न्यायदान तटस्थ राष्ट्रांच्या न्यायमूर्तींमार्फत व्हावयास हवे व त्या स्थळी

बांगला देश हाच फिर्यादीपक्ष हवा. बांगला देश सरकारने युद्धगुन्हेगारांची पुराव्यानिशी जी यादी तयार केली आहे तीत सुमारे पंधरा हजार युद्धकैदी आहेत. या गुन्हेगारात पाक लष्करातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून तो खालच्या दर्जाच्या सैनिकांपर्यंत सर्व स्तरांवरचे लोक आहेत. या सर्वांची चौकशी होऊन ज्यांच्यावर अपराध सिद्ध होतील त्यांना शिक्षा ही झालीच पाहिजे. पाकची मर्जी-मैत्री सांभाळण्यासाठी भारताने या प्रश्नाबाबत उदार धोरणाचा अवलंब मुळीच करू नये. किंबहुना या युद्ध-गुन्हेगारांच्या चौकशीवर ठाम भर दिला पाहिजे. युद्धकैद्यांचा प्रश्न पाक आणि बांगला देश यांनी परस्पर सोडवावा अशी बघ्याची भूमिका भारत सरकार स्वीकारील तर तो एक मानवतेविरुद्ध गुन्हा होईल. अकारण योजनापूर्वक जाळपोळ, लुटालूट, कत्तल आणि स्त्रियांवर अत्याचार करणारे सैनिक हे मानवजातीचे शत्रू असतात व त्यांना कठोर शासन करणे हे एक माणुसकीचेच सत्कृत्य आहे. उन्मत्त शासक आणि सैनिक अमानुष गुन्हे करून जर पुन्हा विनाशिक्षा मुक्त झाले तर मग न्याय, नीती, शासन यांना काही अर्थच उरणार नाही आणि या प्रकारांच्या पुनरावृत्ती वारंवार घडत राहतील.

पाक युद्धकैद्यांची गुन्हेगारी किती भयंकर, अमानुष, जगात कधी न घडलेली अशी आहे. याचा एक संकलित वृत्तांत या लेखात देत आहे. हा वृत्तांत केवळ पाकिस्तानच्याच नव्हे, तर एकूण इस्लामी संस्कृतीवर प्रकाश टाकणारा आहे. तो तयार करताना बांगला देशाच्या जनसंपर्काधिकाऱ्याने प्रकाशित केलेल्या 'दी ट्रुथ अबाऊट बांगला देश' या लाल पुस्तिकेचा तर आधार घेतलाच आहे. पण त्याशिवाय टाइम, टाइम्स ऑफ इंडिया, वीकली टाइम्स, इलस्ट्रेटेड वीकली, ब्लिटझ्, महाराष्ट्र-टाइम्स इत्यादी नियतकालिकांतून आजवर आलेल्या वृत्तांचाही आधार घेतला आहे. परदेशी वृत्तपत्रांचे वार्ताहर, बांगला देशाच्या नेत्यांच्या मुलाखती, काही ताजे ग्रंथ आणि वरील साधने यांच्या आधारे हा वृत्तांत तयार केला असल्याने त्यात अतिशयोक्ती नाही, की हेतुत: भडकपणा केलेला नाही. हा संकलित वृत्तांत म्हणजे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील एका आक्रमक, अमानुष, धर्मांध, प्रतिगामी सत्तेचे चित्र आहे. इतिहासाने नोंद घ्यावी, इस्लाम-धर्मियांनी खाली मान घालावी आणि इतरांची झोप उडावी असा हा स्फोटक वृत्तांत आहे.

हा वृत्तांत कथिण्यापूर्वी दोन-तीन सत्य गोष्टी सांगितल्या पाहिजेत. बांगला देशात नऊ महिने जे हत्याकांड व अत्याचार झाले, त्यात एकूण ३० लाख आबाल-वृद्ध स्त्री-पुरुष-मुले बळी पडली, दोन लाख स्त्रियांवर अत्याचार झाले आणि एक लाख स्त्रिया गरोदर राहिल्या. हत्याकांड व अत्याचार करणारे मुख्यत: प. पाकमधील बलुची, पठाण आणि पंजाबी सैनिक होते. या सैनिकांना बंगाली जनता 'खानसेना'

म्हणून संबोधते. बांगला देशातील रझाकार, विहारी मुसलमान आणि अलबदर या धर्मवेड्या फॅसिस्ट संस्थेचे सभासद यांनी अत्याचार-कत्तलीच्या दुष्कृत्यात पाक सैनिकांना सर्वतोपरी मदत केली होती. आणखी एक ढळ-ढळीत सत्य म्हणजे पाक सैनिकांचे पहिले भक्ष्य हिंदू जनता आणि दुसरे भक्ष्य शेख मुजीबच्या अवामी लीगचे कार्यकर्ते असे होते. बांगला देश लढ्याच्या प्रसंगी भारतात जे एक कोट निर्वासित आले त्यात ८५ टक्के हिंदू होते. यावरून पूर्वपाक-मधील हिंदूंचे समूळ उच्चाटन करण्याची कशी पद्धतशीर योजना होती हे स्पष्ट होते. प. पाकमध्ये हिंदू औषधाला नाहीत ही गोष्टही ध्यानी घेण्यासारखी आहे. बांगला देश मुक्तिसंग्रामात हिंदू-बरोबर बंगाली मुसलमान प्रथमच नाग-वले-भरडले गेले व त्यामुळेच बांगला देश पाकपासून अलग होऊन स्वतंत्र झाला. भारताने लष्करी कारवाई करून या संग्रामाला जो विजय प्राप्त करून दिला तो इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जावा असा आहे. पण त्यासाठी किती रक्त सांडले ! पापांच्या किती राशी रचल्या गेल्या आणि अश्रू ? किती ढाळले गेले-वाहवले गेले असतील ? हा वृत्तांत वाचूनच कल्पना करावी.

## राजधानी ढाक्का व इतरत्रचे हत्याकांड

३० मार्च : ढाक्का उध्वस्त, भय-ग्रस्त नगरी झाली आहे. दोन दिवसात ७ हजार लोक मारले गेले. चितगाव, कोमिल्ला, जेसोर आदी भागात १५ हजार प्रेते पुरण्यात आली. २५ ला मध्यरात्री अमेरिकन रणगाड्यांची ढाक्का विद्यापीठावर धाड. इकबाल हॉलमध्ये मशिनगन्सनी २०० विद्यार्थी व २० प्रोफेसर्स टिपले. काही प्रेते जाळली, काही तळ्यात फेकली, काही पुरण्यात येऊन वर बुलडोझर फिरवण्यात आला. विद्यापीठाच्या आसमंतातील घरे पेटवून दिली. काही दुकानदारांना झोपेतच गोळ्या घालण्यात आल्या. ईस्ट पाक पोलीसदलातील सर्वांना ठार मारले. दोन वृत्तपत्रकचेऱ्या व एक भात गिरणी पेटवली. सर्वत्र स्मशानशांतता.

ढाक्क्यात तोफा, बंदुका, इन्फंट्रीचे हल्ले, ब्रि. कौन्सिल लायब्ररीत पाक-सैनिक घुसले. ७ बंगाली रक्षक जागचे जागी मारले. इकबाल हॉलमध्ये विद्यार्थी व प्राध्यापक यांचे मुडदे. तीन प्रेते हॉलच्या छपरावर. त्यात एक विद्या-र्थिनी. जगन्नाथ हॉल, अलीमुल्ला हॉल व मेडिकल कॉलेज या ठिकाणी दिसेल तो ठार. रात्रभर हत्याकांड, आक्रोश.

कत्तल २४ तास चालू. एकूण १० हजार ठार. तांदळाचा भाव दुप्पटीने महाग. १८ धान्यबाजारांपैकी १४ नष्ट. भयभीत नागरिकांनी घराघरांवर पाकची निशाणे व जिना-याह्याची चित्रे लावली. पेट्रोल ओतून घरे पेटवणे, लहान मुलांना आगीत फेकणे, आगीतून निसटत ते बंदुकांच्या गोळ्यांनी मरत. जळकी प्रेते तीन दिवस पडून दुर्गंधी. एक बंगाली व्यापारी चार नातवांसह जळून मेला. एक तरुण वहिणीसाठी अजीजी करू लागताच दोघांनाही

बायोनेटस्ने भोकसले. डॉ. अबदुल सैदला घरी फोन करू दिला व लगेच ठार मारून प्रेत घरी पाठवले.

जुन्या ढाक्क्यातील बाजारपेठेत प्रेतं तुडवत मार्ग काढावा लागतो. दुर्गंधीमुळे नाकाला फडकं लावावं लागतं. टिकाखानाच्या शपथविधीला नकार दिल्याने न्यायाधीशास ठार मारले. प्रो. इनाजअल्ली व डॉ. कमालहुसेल यांची तीच गत. ताजुद्दिन अहमद नरमेधातून निसटले. मुजीबच्या अटकेपूर्वी त्यांचे अकरा रक्षक ठार मारले.

त्या काळरात्री एकाएकी दिवे गेले. गोळीबार, आक्रोश पहाटेपर्यंत, सकाळी मैदानात प्रेतंच प्रेतं. तीन विद्यार्थ्यांना फरपटत आणले. एकाला बायोनेट खुपसून मारले. दोघांना जीप जवळ पेट्रोल ओतून पेटवून दिले. एका पाक लष्करी अधिकाऱ्याचे उद्गार, 'बांगलामधील पुरुषांना आम्ही गुलाम करणार आणि स्त्रियांना भोगदासी करणार.' ती रात्र आठवली, की भोवळ येते.

पाक सैनिकांनी विद्यार्थ्यांना तीन रांगात उभे केले व समोरून गोळ्या घातल्या. एका गोळीने तीन विद्यार्थी मरून पडत. एक विद्यार्थी ठेंगणा म्हणून वाचला व रात्रीच्या अंधारात जखमी अवस्थेत निसटला. सकाळी विद्यापीठातील माळी, झाडूवाले व चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी वेठीला धरून प्रेतं पुरण्यात आली व नंतर त्या सर्व कर्मचाऱ्यांना मशीनगनने ठार मारले.

ढाक्क्यात गेस्टॅपो रूल. एका जळक्या घरात एक तरुण मुलगी छोट्या भावाला कवटाळून भयभीत अवस्थेत उभी दिसली. तिचे आईबाप आदले दिवशी ठार मारले होते. भिंतीशी उभं करून नागरिकांना गोळ्या घालण्याचे भयंकर प्रकार. त्यामुळे शुकशुकाट. एक भयभीत नागरिक म्हणाला, 'आता बंगला देशचा कुणी उच्चार करीत नाही. भयाने पाकझेंडे सर्वांनी लावले. पण एक दिवस बांगला देश स्वतंत्र होईल.'

ढाक्क्यातील मृतात एकूण १४० बुद्धिजीवी ठार मारले. २८० बेपत्ता आहेत. पाक सैन्याच्या शरणागतीपूर्वी उथळ पाणथळात २० प्रेते आढळली. इतरत्र २५० पडून होती. हात मागे बांधून या सर्वांना गोळ्या घातल्या. विद्यापीठातील कत्तलीत सर्व शाखांतील तज्ज्ञ प्राध्यापक, संशोधक होते. हिंदू आणि मुसलमान. रेसकोर्सभोवतीच्या सर्व कॉलनीत प्रेतं इतस्ततः पडलेली. विद्यापीठाची ७५ टक्के हानी.

२५ मार्च ते १२ मेपर्यंत एकूण ५ लक्ष लोक मारले. नातोर येथील एक विहीर कुजलेल्या प्रेतांनी भरून गेली. तळ्याशेजारी एक मुलगी आईबापांची प्रेतं हुडकत हिंडत होती. चितगावच्या ज्यूट गिरणीतील १८०स्त्री-पुरुष भोसकून मारले. खुलना जिल्ह्यात ७ कोटींच्या चलनी नोटा जाळल्या.

चितगाव-हॉस्पिटलमधील पेशंटस्ना बाहेर ओढून ठार मारले. प्रेतांवर कुत्री ताव मारत होती. दोरखंडाला बांधून हजारो स्त्री-पुरुष व मुले कुत्र्यांसारखी मारली. घराघरात खिडक्यांतून मॉर्टर बॉम्ब टाकून शेकडो लोक मारले. ज्यूट

मिलच्या मॅनेजरला स्त्रियांवरील अत्याचार वर्णन करताना भोवळ आली. शेकडो मुलांची प्रेतं रस्त्याच्या दुतर्फा पडून होती. ढाका विमानतळाच्या रस्त्यावर दोन्ही बाजूला अशीच प्रेते पडलेली होती.

ढाक्क्यापासून नऊ-दहा मैलावर हरिहरपारा हे गाव. इथे नरमेघाचा कहर झाला. ट्रकमधून लोकांना धरून आणत, त्यांचे हात व डोळे बांधत व मग बुधीगंगेच्या काठी त्यांना उभं करून गोळ्या घालत. नदीच्या पात्रात एक हजार प्रेतं आढळली. कुत्री, कावळे आणि गिधाडं अजीर्ण होईपर्यंत या ठिकाणी तुटून पडत होती. इथल्या कत्तलीत मुसलमानांचा मोठा हात होता.

ढाक्क्यातील कत्तलीसाठी तीन हजार बुद्धिजीवींची यादी तयार होती. मे. ज. फर्मानअल्लीला अलबदर संघटनेने या कामी मदत केली. रात्री कर्फ्यूच्या वेळेत धमकीची पत्रे पाठवून बुद्धिवाद्यांना बोलावून घेत व मग त्यांचे डोळे बांधून, त्यांना दूर नेऊन गोळ्या घालत. भारतीय सैन्य ढाक्क्यात दोन दिवस उशीरा पोचते तर आणखी तीन हजार लोक प्राणास मुकते.

चितगाव जिल्ह्यात नऊ महिन्यात एक लाख लोक कत्तलीला बळी पडले, पाच हजार स्त्रियांवर अत्याचार करण्यात आले व ५०० कोटींची मालमत्ता नष्ट करण्यात आली. शरणागतीचे आधी दोन दिवस पाच हजार लोक मारले. एका हिंदू मंदिराचे मशीदीत रूपांतर करण्यात आले. नौखालीत मुक्तिसैनिक व नागरिक मिळून १७०० मारले. माघार घेताना पाक सैन्याने १६ लाखांच्या चलनी नोटा पळवल्या. चितगाव व कॉकसबझार येथील नदीतून पळून जाताना पाकिस्तान्यांनी ३० कोटींच्या नोटा जाळल्या व नाण्यांनी भरलेल्या थैल्या नदीत फेकल्या. ग्रामीण भागातील हिंदू वस्ती बेचिराख केली. सर्किट हाऊसच्या जवळ कोर्टमार्शल करून माणसं मारली जात. त्या ठिकाणी हजारो सांगाडे आढळले. त्यांचे ढीग कसे हलवायचे हा नगरपालिकेला प्रश्न पडला होता. रझाकार व मुजाहीद पाक सैनिकांना कत्तलीत मदत करीत.

ब्राह्मणबेरीया येथे सभा बोलावून बुद्धिजीवी लोक बोलावण्यात आले व त्यांना एकाएकी ठार मारले. भारतीय छत्रधारी सैनिकांना ४० प्रेते आढळली.

बाकरगंज जिल्ह्यात रझाकार, अलबदरचे स्वयंसेवक व पाक लष्कर यांनी मिळून २५ हजारांची कत्तल केली. प्रार्थनास्थळे व बाजारपेठा भस्मसात केल्या. दिघापाटिया येथे हिंदुराजाने बांधलेल्या राजवाड्याचा विध्वंस केला. अनेक मूर्ती फोडल्या, चित्रे फाडली व वस्तू पळवल्या. पाकच्या सोळाव्या डिव्हिजनने लुटालूट केली. एका घरात ६० हिंदु-मुस्लीम स्त्री-पुरुष व मुलं डांबून ठेवली होती. त्यांना मशीनगन्सने मारण्यात आले. छोट्या मुलाला छातीशी कवटाळून एक माणूस बाहेर आला तो त्याला मुलासकट भोसकून ठार मारले.

मैमेनसिंगवर पाक जेटस् व अमेरिकन

टॅंक्सने हल्ले केले. ले. ज. टिकाखानाने मे महिन्यात दोन लाख बंगाली मारले. ९० टक्के जनता ग्रामीण भागात पळून गेली. राजशाहीत बाजार उध्वस्त व जाळपोळ. इटालियन मिशन व चर्च-मधील बायकामुले मारली.

जमियत इ इस्लाम संस्थेची 'अल-बदर' ही फॅसिस्ट संघटना. तिचा नेता अवदल खलिक पाक शरणागतीनंतर पकडला गेला. या पदवीधर नराधमाने हजारो बंगाली नागरिकांची ढाक्का पडण्यापूर्वी कत्तल केली. प्रत्येक मुंड-क्याला २॥ रु. पासून १०० रुपयांपर्यंत बक्षीस दिले जाई. अलबदरचा जोर सिल्हेट जिल्ह्यात विशेष होता. जिल्ह्या-तील ४० लाख लोकवस्तीपैकी किमान १५ हजार स्त्री-पुरुष मारले गेले. फरीदपूरच्या एक लाख लोकांपैकी २० हजारांची पाकिस्तान्यांनी कत्तल केली. खुश्तीया जिल्ह्यात बलात्कार व कत्त-लींचा कहर झाला. कत्तलीत १२०० तरी बळी पडले. सिल्हेटमधील हबीबगंज विभागात कत्तलीबरोबर शेकडो घरं जाळून टाकली. ७५हजार मण भात पीक नष्ट केलं. लहान मुलांना आयांपासून हिसडून ती आगीत भिरकावली गेली. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी कुजलेली प्रेतं, हाडांचे सांगाडे, रक्ताळलेले कपडे व केसांचे पुंजके आढळत. मानवी कवटयांचे ढीग एकेठिकाणी आढळले.

दिनाजपूरमधील ठाकुरगाव येथे १५० ते २०० बंगाली मुस्लिम वाघाच्या पिंजऱ्यात लोटून हप्त्याहप्त्याने हाल करून मारले. ठाकुरगाव मुक्त झाले तेव्हा वाघाच्या पिंजऱ्यात अनेक मानवी सापळे, हाडे आढळली. पाक सैनिकांना बायका पुरवण्यास नकार दिल्याने पुरुषांची अशी हिंस्रपणे वासलात लावण्यात आली.

परदेशी वार्ताहरांनी हत्याकांडाबाबत पाक अधिकाऱ्यांना विचारले, तेव्हा त्यांना पुढील उत्तरे मिळाली, 'मुलांना मारणे भाग होते. नाहीतर भावी काळात ही मुले पाकची शत्रू झाली असती. बंगाली मुसलमान हे असली मुसलमान नाहीतच. बंगाली मुस्लिम व हिंदू स्त्रियांपासून आम्ही जी संतती निर्माण करू ती सच्ची पाक बनेल. आमच्या सैन्यातील प्रत्येकाला एकेक बंगाली स्त्री-विवाहित वा अविवाहित मिळाली पाहिजे. बंगाली आमचे गुलाम आहेत.'

## माता-भगिनींवर अत्याचार

२५ मार्चनंतर ढाक्क्यातील १०० मुली कराचीला पळवण्यात आल्या. त्यांची वये १२ ते २५ होती. त्यात बहु-संख्य विद्यार्थिनी व शिक्षिका होत्या. काहीजणींना नंतर प. आशियाई देशा-तील मुस्लिम देशात विकण्यात आले.

रोमहून इंटरनॅशनल कॅथोलिक रिलीफ ऑर्गनायझेशनने जाहीर केले, की पाक सैनिकांनी एप्रिल-मेत ४०० स्त्रियां-वर बलात्कार केले व त्यापैकी बहुसंख्य स्त्रिया गरोदर राहिल्या.

राजशाही विद्यापीठाच्या जोहा हॉल-मध्ये २०० स्त्रिया अत्याचार करून मारण्यात आल्या. त्या सर्व १५ ते ४० वयाच्या होत्या. आंबराईतील चर्चनजीक ३६ कुजलेली प्रेते आढळली. दिनाजपूर

विभागात २००० स्त्रिया अत्याचारांना बळी पडल्या. त्यांची छिन्नभिन्न, कुचकी प्रेतं, सापळे, हाडं पाणवठ्यात आढळली.

आगरतळ्याच्या समद नावाच्या मुस्लीमाच्या पत्नीवर काही पाकिस्तान्यांनी अत्याचार केला तशी त्याने आत्महत्त्या केली. अरीबारीच्या मलीक या रेल्वेनोकराच्या घरातील सर्व स्त्रियांवर सैनिक तुटून पडले. रंगपूर जिल्ह्यात भुरंगमरी येथे पंजाब रेजिमेंटच्या २५ व्या बटालियनने २५ स्त्रियांना एका खोलीत कोंडून ठेवले. त्यांच्यावर रोज अत्याचार होत. एक स्त्री वेड लागून मेली. मुक्तीवाहिनीने या स्त्रियांची नंतर सुटका केली.

बोग्रा येथे माघार घेण्यापूर्वी कत्तल नि बलात्कार झाले. रेल्वेस्टेशनजवळील स्मशानात व विहिरीतून शेकडो प्रेतं आढळली. अत्याचारातून वृद्ध स्त्रिया फक्त वाचल्या. एक झाडूवाला व त्याची पत्नी यांना प्रेतांची विल्हेवाट लावण्यास भाग पाडले. नंतर झाडूवालीवर अत्याचार करून तिला ठार मारले. स्टेशनवर शिवप्रसाद नावाचा हॉटेलवाला होता. त्याच्या हॉटेलची नासधूस करण्यात आल्यावर त्याच्या बायकोवर व मुलीवर त्याच्या डोळ्यादेखत बलात्कार केले.

जेसोरमध्ये मुस्लिम लीगचे एजंट पाक सैनिकांना स्त्रिया पुरवत. सायंकाळी हे सशस्त्र एजंट घरोघरी जात व सापडतील त्या स्त्रियांना ट्रकमध्ये कोंबून पाक छावण्यात पाठवत व सकाळी परत आणून सोडत. जेसोर मुक्तीनंतर मुस्ताफा महंमद नावाचा एजंट पकडला गेला. त्याला काही हिंदू तरुणींनी मुसक्या बांधून फरफटत वस्तीत आणले व उताणा पाडून धारदार बांबूच्या काठ्यांनी टोचटोचून मारले. सलमा चक्रवर्ती, बिंदु, आवेशा, मृणालिनी, तरुलता, पुष्पावती, हेमवती आणि तरलावाला या वंगकन्यांनी सैतानाला असा न्याय दिला.

जेसोरच्या मिशनऱ्याने कत्तलीची व अत्याचारांची हृदयभेदक कथा पुढील शब्दात ऐकवली– 'दोन आठवड्यात दहा हजार लोक मारले. एका मिशनऱ्याला जवळ बोलवून गोळी घातली. मी केळीच्या वनात पळालो म्हणून वाचलो.' फादर अल्बर्टने डोळ्यात आसू आणून सांगितले, 'तरुण मुलींना छावण्यात पळवून नेत व बलात्कार करत. शहरातील किमान ३०० स्त्रिया कँटोन्मेंटमध्ये डांबून ठेवल्या होत्या. अब्रूरक्षणार्थ काहींनी साड्या फाडून गळफास लावून घेतले, तेव्हा त्यांच्या साड्या हिसडून प्रत्येकीला ब्लँकेट देण्यात आली.'

कलकत्ता प्रेस क्लबमध्ये मुलाखत देताना ले. ज. अरोरा यांनी सांगितले, की एका खंदकात भारतीय सैन्याला अनेक स्त्रिया आढळल्या. त्यात एक बारा वर्षांची मुलगी होती.' रंगपूर जिल्ह्यातील अनु रहमान यांनी सांगितले, की भूंगपारी गावातील बंकरमध्ये चार स्त्रिया आढळल्या. त्यातील दोघी बी. एससी. असून एक शिक्षकाची पत्नी होती. एकूण २६ स्त्रिया अत्याचाराला बळी पडल्या. ढाक्का विद्यापीठातील काही मुली पळवण्यात आल्या.

अत्याचारांना बळी पडलेल्या गरोदर स्त्रियांची मोठी समस्या बांगला देश सरकारला सतावत आहे. किमान दीड लाख स्त्रिया गरोदर राहिल्या व त्यात १२ वर्षांच्या मुलीपासून चाळीस वर्षांच्या विवाहित, विधवा स्त्रिया आहेत. मानवता संघातर्फे उपचार केंद्रे चालविली जात असून अनेक स्त्रिया गर्भपातासाठी पुढे येत आहेत. या स्त्रियांच्या मुलाखतीवरून पाक सैनिकांनी कित्येक स्त्रियांवर कधी एकदा, कधी अनेकदा तर कधी सामुदायिकपणे बलात्कार केले. बलात्कारित गरोदर स्त्रियांपैकी कोणालाही संततीबद्दल प्रेम दिसून आले नाही. फक्त एकदोघींनी वत्सलभाव प्रकट केला. बलात्कारित महिला व नवजात बालके यांच्याकरिता बांगला देश सरकारने ६०–७० केंद्रे उघडली आहेत. या स्त्रियांशी विवाह करण्याचे शेख मुजीबने आवाहन केले असून त्याला प्रतिसाद देणारे अकरा हजार अर्ज आले आहेत.

सिस्टर मार्गारिट मेरीने एका मुलीची कथा पुढील शब्दात सांगितली– 'आमच्या क्लिनिकमध्ये एक चौदा वर्षांची मुलगी दाखल झाली होती. पाक सैनिकांनी तिच्या बापाच्या छातीवर बंदुक रोखून त्याच्या डोळ्यादेखत मुलीवर बलात्कार केला. ती मुलगी शरमेने आत्महत्याच करणार होती. पण आत्महत्या केली तर आपल्या गरीब आईबापांना मोलमजुरी करून मदत करता येणार नाही या जाणीवेने आत्महत्येचा विचार तिने सोडून दिला. त्वेषाने ती एकदा म्हणाली, 'आमच्यावर असे अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा कोण करणार ?, जग या गुन्ह्यांकडे दुर्लक्ष का करीत आहे ?'

ढाक्क्यातील एका युरोपियनने पुढील हकिकत सांगितली. एक दिवस फॅक्टरी सुटल्यावर मी घरी जात असता रस्त्याने पाक सैनिकांची एक जीप आली. रस्त्यात त्यांना एक तरुण मुलगी दिसताच जीप थांबवली गेली. तिला खेचून प्रत्येकाने तिच्यावर बलात्कार केला आणि नंतर बायोनेट खुपसून तिला रस्त्यावर फेकून देण्यात आले.

ढाक्क्यातील मेडिकल हॉस्पिटलमधील एका डॉक्टरने सांगितलेली हकिकत–पंधरा-सोळा वर्षांचे दोघे बहीण-भाऊ. बहिणीचं नुकतंच लग्न झालेलं. पाक सैनिकांची धाड त्यांच्या घरावर आली, तशी भावाने जवळ असतील तेवढे पैसे देऊ केले. बहीणही करुणा भाकू लागली. पण त्या कुरूप अबलेला नराधम घेऊन गेले. जिथे तिला डांबून ठेवले तिथे आणखी नऊ शिकलेल्या मुली होत्या. त्यांचे केस कापलेले होते व त्यांना फक्त चड्डया नेसायला दिल्या होत्या. लांब केस नि साड्या फाडून त्यांनी आत्महत्येचा यत्न केला म्हणून त्यांची अशी गत केली होती. पाक सैनिक रोज रात्री खोलीत येत व त्यांना मारझोड करून आपली वासना शमवत. त्या साऱ्याजणी अक्षरशः जमिनीवर झोपत. संडास मोरीवरसुद्धा त्यांना बंदोबस्ताने नेले जाई.

प. पाकिस्तानातील छावण्यात सक्तीने ठेवण्यात आलेल्या शेली

नावाच्या एका वंग युवतीने रिटा नामक मैत्रिणीला लिहिलेले एक पत्र : 'मला कसे पळवून आणले व माझ्यावर अत्याचार झाले याचे वर्णन करवत नाही. त्याचा काही उपयोग नाही. इथल्या छावणीत अनेक मुलींनी आत्महत्त्या केल्या. अनेकींनी दिवस गेले म्हणून आत्महत्त्या केल्या. काहीजणी बाळंतपणात मृत्यू पावल्या. छावण्यात पुरेसे अन्न मिळत नाही. मलाही दिवस गेले आहेत. मुजीबभाई आमची कधी सुटका करणार ? त्या आशेवर जगून आहे.'

## हिंदुधर्मियांवर सूड

बोग्रा येथे माघार घेतांना पाकसैनिकांनी तेथील शिवालय उध्वस्त केले. साधू व पुजारी यांची कत्तल केली. त्यांचे अक्षरश: तुकडे केले. ढाक्क्यातील कालीमाता व शंकरपारा ही मंदिरं पाडली. पुजाऱ्यांना बडवून ठार मारले. विद्यापीठ आवारातील मोठा वटवृक्ष लाकूडतोडे आणवून जमीनदोस्त केला. ढाका, खुलना, जेसोर, चितगाव येथे एकही हिंदु मंदिर उभे नाही. सक्तीच्या धर्मान्तराचे शेकडो प्रकार घडले. पाकसैनिकांना स्थानिक रझाकार गुंड मदत करीत. फरीदपूरच्या जगद्बंधु आश्रमातील आठ पुजाऱ्यांना आश्रमात घुसून ठार मारले. चितगावच्या राम ठाकूर मंदिराच्या बावीस पुजाऱ्यांना एका वेळी गोळ्या घालण्यात आल्या. ढाक्क्यातील ढाकेश्वरी नि कालीमंदिर भुईसपाट केले. बंगाली हिंदूंनी अवामी लीगला मते दिल्याने तिला बहुसंख्य जागा मिळाल्या या सबबीखाली हिंदू प्रजा खतम् करण्याची योजना होती.

असे आहेत हे पाकी युद्धगुन्हेगार आणि या गुन्हेगारांची विनशर्त सुटका व्हावी म्हणून पाकचे राष्ट्रपती भुट्टो आग्रह धरतात. भारतीय मुसलमान या अमानुष गुन्हेगारीविरूद्ध ब्र काढीत नाहीत. कोणा जबाबदार मुस्लिमाने, मुस्लीम देशाने, अथवा मुस्लीम संस्थेने निषेधाचा आवाज उठवला नाही, की चौकशीची मागणी केली नाही. उलट बांगला देश स्वतंत्र झाला म्हणून भारतातील बहुसंख्य मुस्लिमांची तोंडे उतरून गेली होती. तीस लाख मानवसमूहाचे हत्याकांड आणि दोन लक्ष माताभगिनींवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना माता इंदिरा गांधी आणि वंगबंधू कोणती शिक्षा करणार याची इतिहास नोंद करील. या दोन लक्ष स्त्रियांचे शिव्याशाप हे दोवे घेणार, की सैतानांना कठोर शासन करून निरपराध अबलांचे अश्रू पुसणार याकडे काळपुरुष डोळा लावून बसला आहे. खरे म्हणजे अशा गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी स्वतंत्र कायदाच आधी करावयास हवा. कारण यांना अगदी मृत्युदंडाची शिक्षा दिली तरी ती अपुरीच होईल.

□ □ □

मनोविकारशास्त्र

# स्वयंभावाची कार्ययंत्रणा

डॉ. प्रकाश श्री. साठये

माणूस हा अनुकरणशील प्राणी आहे आणि चारचौघात रहाणं त्याला पसंत पडतं. जगापासून दूर जाऊन एकांतवासात राहणारा साधू फकीर फार विरळा ! माणसाच्या चारचौघात रहाण्याच्या या प्रवृत्तीबरोबर आपलं असं काहीतरी, कुणीतरी असावं, त्यांनी आपल्याला आपलं म्हणावं, चार लोकांनी आपल्याला ओळखावं, मान द्यावा याही इच्छा आल्याच. त्यांना आपण माणसाच्या सामाजिक गरजा म्हणू या. भूक, तहान, झोप, विश्रांती, काम या शारीरिक गरजांच्या जोडीला आणखी या सामाजिक गरजा भागवायच्या म्हणजे जबाबदारी वाढली. पुन्हा रोजच्या व्यवहारातल्या प्रसंगांना प्रतिक्रिया म्हणून व्यक्त होणाऱ्या प्रीती, आनंद, दुःख, राग, भीती या भावनांशी सामना द्यायचा असतो. हा एवढा सगळा व्याप हे मन सांभाळतं तरी कसं असा प्रश्न पडतो.

प्रत्येक इच्छा पुरी होत नाही हा अनुभव लहानपणापासूनच यायला लागलेला असतो. गरजांची व्यवहाराशी सांगड घालावी लागते आणि हे काम स्वयंभाव (Ego) करतो. बाहेरून आणि आतूनही येणाऱ्या संकटांचा प्रतिकार, अडचणीतून मार्ग काढण्याचं काम हा स्वयंभाव कसा करतो ? शरीरातील घातक द्रव्यांची विल्हेवाट लावण्याचं काम यकृत व मूत्रपिंड, आणि बाहेरून येणाऱ्या रोगजंतूंचा प्रतिकार करण्याचं काम प्रामुख्यानं पांढऱ्या पेशी करतात. पांढऱ्या पेशी रोगजंतूंना आपल्या 'पोटात' घेऊन त्यांच्यापासून बाकीच्या इंद्रियांचं रक्षण करतात. त्याचप्रमाणं स्वयंभावानं मन शाबूत ठेवण्यासाठी संरक्षणयंत्रणा उभारलेली असते आणि त्या यंत्रणेच्या जोरावर तो आपल्या अंतस्थ आणि परस्थ शत्रूंशी मुकाबला करतो. आपलं स्वतःचं आणि भोवतालच्या लोकांचं वागणं नीट डोळे उघडून पाहिलं म्हणजे हे कार्य कसं चालतं ते कळणं अवघड नाही.

चिंता (Anxiety) उद्याच्या काळजीनं माणूस आज हातपाय हलवतो, काम करतो. ती नसली तर तो बेफिकीर आणि म्हणून निश्चल राहील. ती असते म्हणून त्याच्या सामर्थ्याला चालना मिळते. ती चिंता योग्य प्रमाणात असेल तर ठीक; नाही तर आली पंचाईत ! काळजी किंवा धास्ती प्रमाणाबाहेर वाढली, की माणसाच्या कौशल्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. खेळात

हे जास्त दिसून येतं. नेहमी उत्तम खेळणारे पण मॅच म्हटली, की केवळ नर्व्हस झाल्यामुळे हरणारे लोक आपण पहातो. त्यांना 'मॅच टेंपो' नाही असं आपण म्हणतो. धास्तीच्या प्रभावाचं नेहमी दिलं जाणारं उदाहरण पहा. १॥ फूट रुंद आणि २० फूट लांब अशा जमिनीवर ठेवलेल्या फळीवरून तुम्हाला चालत जायला सांगितलं तर तुम्ही अगदी हसत जाल. पण हीच फळी समोरासमोरच्या इमारतीच्या ६ व्या मजल्यांना जोडून ठेवली आणि तुम्हाला सांगितलं, की या फळीवरून एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जा. तर जमेल का ? शक्य नाही ! व्यायामपटूंना, डोंबाऱ्यांना आणि स्लॅबची कामं करणाऱ्या मजुरांनाच हे साधेल. तुम्ही म्हणाल, हा संवयीचा प्रश्न आहे. पण खरं सांगा. दीड फुटाच्या पट्टीवरून २० फूटच काय पण त्याच्या कितीतरी पटीनं जास्त अंतर तुम्ही रोज चालता की नाही ? जिवाच्या धास्तीमुळं तुम्हाला हेच चालणं शक्य होत नाही (अर्थात ही धास्ती abnormal आहे असं मी तरी मुळीच म्हणणार नाही). सांगायची गोष्ट ही, की चिंतेच्या आणि धास्तीच्या प्रभावामुळं माणूस आपलं कौशल्य हरवून बसतो; हतबल होतो.

निरोधन (Repression) आणि दमन (Suppression) निरोधनामुळे माणसाच्या, समाजाला अजिबात न चालणाऱ्या, विशेषत: नैतिक स्वरूपाच्या अशा इच्छा मनाच्या जागृतावस्थेत येत देखील नाहीत. त्या इच्छा मूळ स्वरूपात माणसाच्या संज्ञाशील मनात आल्या तर त्याला लाज वाटेल, अपराधाची भावना निर्माण होईल. अशी इच्छा झाल्याचं कळल्यावर तो दुःखी होईल. निरोधन हे सुप्तावस्थेत व नकळत घडतं तर दमन हे जागृतावस्थेत, समजून आणि प्रयत्नपूर्वक केलं जातं. अशा रीतीने कितीतरी इच्छा आणि विचार कळत नकळत सुप्त मनाच्या तळाशी जाऊन बसतात. या निरोधन-दमनात बरीच मानसिक शक्ती खर्च होते मनावरचा ताण वाढत जाऊन अनाकलनीय अशी चिंता निर्माण होते. आणि व्यक्तिमत्त्व कमकुवत होतं. या दमन-निरोधनाच्या घट्ट झाकणामुळे बरीच वाफ कोंडली जाते. ती कमी करण्यासाठीच की काय, आपल्याकडे शिमगा, धूळवड, रंगपंचमी, गटारी यासारखे 'सण' असावेत असं वाटतं. त्यांचा उपयोग झडपेसारखा वाफेचा दाब कमी करण्यासाठी होतो. मनातल्या वाईट गोष्टी माणूस यावेळी ओकून टाकतो आणि मोकळा होतो. काही वेळा शिमगा गेला तरी कवित्व रहातं ही गोष्ट वेगळी !

आत्मीकरण (Identification) सहवासात येणाऱ्या मोठ्या माणसांच्या सवयी, लकबी, चांगल्या गोष्टी मुलं उचलतात त्या आत्मीकरणामुळेच ! बऱ्याच वेळा वडिलांची चालण्याची, बोलण्याची, हसण्याची ढब मुलांच्यात हुबेहूब उतरलेली दिसते, आत्मीकरणाची आणखी एक पायरी म्हणजे माणसाचं आपण स्वत: त्या ठिकाणी आहोत अशी कल्पना करणं ! कथा-कादंबऱ्या नाटक-

सिनेमातल्या पात्रांच्या ठिकाणी स्वतःला कल्पून लोक त्यांच्याशी समरस होतात. आपल्या इच्छा त्यांच्या आयुष्यात पुऱ्या झालेल्या पहातात. पलायनवादी साहित्य आणि लोकप्रिय होण्यामागचं मोठं कारण हेच असतं. वड्या ऑफिसरचा पट्टेवाला किंवा ड्रायव्हर त्यांच्याइतक्याच रुबा-बात वावरतात हा त्यांचा त्यांच्याशी झालेल्या आत्मीकरणाचा प्रभाव ! काही वेळा कोर्टात आपण दोषी असल्याच्या (खोट्या) जबान्या दिल्या गेल्याचं आपण वर्तमानपत्रातनं वाचतो. त्या जबानी देणाऱ्याच्या, गुन्हेगाराशी झालेल्या आत्मीकरणामुळे दिल्या गेलेल्या असतात आणि भाऊ भावाचा, आई मुलाचा, मुलगा वडलांचा, पती पत्नीचा गुन्हा आपल्यावर लादून घेतात. निरनिराळ्या संस्थांच्या कार्याला जन्मभर वाहून घेतलेली माणसं आपण पहातो. त्यांचं त्या संस्थांशी आत्मीकरण झालेलं असतं. या आत्मीकरणाच्या अतिरेका-मुळं माणूस abnormal ठरतो. स्वतःला 'जवाहरलाल नेहरू' 'महात्मा गांधी' किंवा 'राजेश खन्ना' समजून गावात हिंडणारी माणसं पुष्कळांच्या पहाण्यात असतील.

स्थानांतर (Transference) हा आत्मीकरणाचा प्रकार आहे. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या सासवा-सुनांच्या ३६ या आकड्याला हे स्थानांतर जबाब-दार आहे. सासू म्हटलं, की मुलींच्या डोळ्यांसमोर एक ठराविक आकृती उभी रहाते ती स्थानांतरामुळे ! 'घाऱ्या डोळ्यांची माणसं लबाड असतात.' कोकणस्थ लोक चिक्कू असतात ' पासून ते थेट ' गणिताचे मास्तर कडक असतात ' इथपर्यंत असे जे समाजात ग्रह आहेत, ते पूर्वीच्या लोकांच्या अनुभवांचं स्थानांतर झाल्यामुळे रूढ झालेले असतात. समाजात आढळणाऱ्या निरनिराळ्या पूर्वग्रहदूषित वृत्तींना हे स्थानांतर कारणीभूत असतं.

विस्थापन (Displacement) विशे-षतः राग, चीड, वैताग या गोष्टींपासून सुटका करून घेण्यासाठी स्वयंभाव विस्थापनाचा उपयोग करतो. नवरा ऑफिसातनं घुश्शातच आला, दारात खेळणाऱ्या मुलांवर ओरडला, चपला कोपऱ्यात भिरकावून देऊन खुर्चीवर आदळून बसला,' काय गार चहा दिलाय, कुणाला आमची किंमतच नाही.' असं खेकसला, की चाणाक्ष बायको ओळखते की 'ह्यांचं' ऑफी-सात काहीतरी बिनसलेलं दिसतंय. ऑफिसात साहेबांनी क्षुल्लक चुकीबद्दल किंवा त्याच्या मते चूक नसताना चापलं, की माणूस असं वागतो. आपला राग साहेबांसमोर व्यक्त करणं त्याला शक्य नसतं. तो तसाच खदखदत रहातो आणि घरी आल्यावर इतरत्र निघतो. या विस्थापनाला ' वड्याचं तेल वांग्यावर ' म्हणतात. झुरळं, पाली, अंधार, एकांत, पाणी यासारख्या गोष्टींबद्दल बऱ्याच लोकांना वाटणारी अनाकलनीय भीती हा विस्थापनाचा परिणाम असतो.

भरपाई (Compensation) न्यून-गंडापासून (Imferiority complex) मुक्तता करून घेण्यासाठी स्वयंभाव भर-

पाईचा अवलंब करतो. कमी उंचीचा अधिकारी, हा त्याच्या स्वतःच्या बुटकेपणाबद्दल वाटणाऱ्या न्यूनाची भरपाई सूट घालून, आत्मविश्वासपूर्वक व प्रतिपादनात्मक बोलून, योग्य हातवारे करून करतो. अशी कितीतरी माणसं तुमच्या पहाण्यात असतील. आंधळा माणूस संगीतज्ज्ञ होतो. बहिरा माणूस स्वतःतून उत्तम चित्रकार घडवतो. प्राप्त उणीवावर कुढत न बसता, मिळालेल्या गुणांचा विकास करून या भरपाईने कित्येक लोक आपल्या न्यूनगंडावर मात करतात, तर काही स्वतः आपल्या न्यूनाला विनोदाचा विषय करून त्याची धार बोथट करतात. भरपाईचा अतिरेक झाला, की मात्र माणूस आत्मवंचक ठरतो.

पलायन (Escapism–withdrawal) काही प्रसंग किंवा संकटं अशी असतात, की माणूस त्यांना तोंड देऊ शकत नाही आणि म्हणून मग तो पलायनाचा आश्रय घेतो. एका मोठ्या घरचं डोहाळ जेवणाचं आमंत्रण आलंय, त्या घरी जायला शोभेल अशी साडी न् चार दागिने बाईजवळ नाहीत. अशा वेळी ती जेवायला जात नाही; आजारी असल्याचं, पाहुणे आल्याचं, असं काहीतरी कारण सांगून ती जाणं चुकवते. प्रकृतीचं कारण सांगून महत्त्वाच्या परीक्षांना 'ड्रॉप' घेणारी कितीतरी मुलं असतात. प्रसंगाला तोंड द्यायचं टाकून निसटणारी माणसं त्या प्रसंगावर कुढत बसतात. स्वतःला त्रास करून घेतात. पलायनवादाचा वारंवार आश्रय घेणारी माणसं भित्री तर ठरतातच; पण त्यांना वस्तुस्थितीपासून (reality) दूर जाण्याचा धोकाही असतो. वेळी प्रसंगाला धीरानं तोंड देणं, वस्तुस्थिती मान्य करणं; व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनं फायद्याचं ठरतं.

प्रायश्चित्त (Restitution) हातून काही पाप किंवा दुष्कृत्य घडलं, की माणसाला अपराधी वाटतं. सदसद्विवेकबुद्धीमुळं ही अपराधाची भावना, टोचणी, त्याला अस्वस्थ, काहीवेळा तर निराश करून सोडते. हातून घडलेल्या गुन्ह्याबद्दल प्रायश्चित्त–मग ते 'शास्त्रानं' सांगितलेलं असो किंवा त्याला स्वतःला सुचलेलं असो–घेतलं, की अपराधाची टोचणी बोथट होते. मनावरचा ताण कमी होतो. माणूस सुटकेचा निःश्वास टाकतो. ख्रिस्ती धर्मात पाद्र्याजवळ 'Confession' देतात ते याचसाठी. अर्थात प्रायश्चित्त घेतलं किंवा Confess केलं म्हणजे माणूस पुनः गुन्हा करायला मोकळा झाला असं समजणं चुकीचं ठरेल.

◻ ◻ ◻

# श्रीसप्तकोटीश्वर

ब. मो. पुरंदरे

कोल्हापूर प्रांतात हणमंत्या घाटाच्या तोंडावर असलेला रांगणा किल्ला विजापूरच्या आदिलशाही किल्लेदाराच्या ताब्यात होता. तो प्रख्यात किल्ला रावजी सोमनाथ सुभेदारांनी स्वराज्यात दाखल केला. महाराज आग्र्याहून सुटायच्या दोनच दिवस फक्त आधी हा गड स्वराज्यात आला.

हा गड शिवाजीराजांच्या लोकांनी बळकावलेला पाहून विजापूरकर रागावले. आपलं एखादं ठाणं शत्रूने दडपलं तर ते कोणाला खपेल? विजापूर दरबारने लगेच आपल्या दोन बड्या सरदारांना हुकूम केला, की गेलेला रांगणागड परत काबीज करा. हे दोन सरदार कोण? अब्दुल करीम बहलोलखान आणि व्यंकोजीराजे भोसले.

महाराजांनी रांगण्याचा कायाकल्प केला होता. सैन्य, दारूगोळा, शस्त्रास्त्रं, अन्नधान्य आणि तोफखाना गडावर उत्तम पाठविला होता. तटाबुरुजांची दुरुस्ती व जरूर तेथे नव्याने बांधणी केली होती. महाराजांनी गडाला नवीन नाव दिलं होतं, 'प्रसिद्धगड.' रांगणा आता सिद्धही होता आणि प्रसिद्धही होता.

आदिलशाही फौजा विजापुराहून निघाल्या. महाराजांनीही तयारी केली. वास्तविक महाराजांनी ठरवलं होतं, की शक्य तोवर इतक्यातच कुणाशी भांडण मांडायचं नाही. पण जर दुष्मन स्वराज्यावर चालून येऊ लागला तर काय गप्प उभं राहायचं? खरं म्हणजे तलवार बाजूला ठेवून वागणं महाराजांना जमतच नव्हतं. विजापूरची आदिलशाही फौज रांगण्याकडे येत आहे हे महाराजांना समजलं. त्यांचा हात तलवारीला गेला. पण त्यांना वाईटही वाटलं. कारण चाल करून येणाऱ्या बहलोलखान पठाणाबरोबर येत होते त्यांचे बंधू चिरंजीव राजश्री व्यंकोजीराजे. धाकटे महाराज. तीर्थरूप महाराजसाहेब शहाजीराजे यांच्या मृत्यूनंतर या धाकट्या बंधूंची भेट एकदाच झाली होती. कुडाळ येथे समोरासमोर. रणांगणावर. शत्रू म्हणून! त्या गोष्टीला आता अडीच वर्षे झाली होती. त्यावेळी व्यंकोजीराजे असेच खवासखानाच्या सांगाती स्वराज्यावर व महाराजांवर चालून आले होते. यावेळी ते एका पठाणाच्या सांगाती येत होते.

वैशाखी उन्हाळा रणरणत होता. आदिलशाही फौजा पाटगावाहून पुढे सरकल्या. रांगण्याच्या भवताली अरण्य अगदी घनदाट होतं. वाट दिसत नव्हती. तरीही बहलोलखान आणि एकोजीराजे यांनी गडाला मोर्चे लावले. अन् एके

दिवशी महाराज स्वतः फौजेनिशी गुपचुप त्या भयंकर दाट झाडीतून लपत दबत आले आणि त्यांनी आदिलशाही मोर्चांवर हल्ले चढवले. हे हल्ले इतके कहारी होते, की शाही फौजेचा दमच निघेना. एकोजीराजे आणि खान मराठ्यांवर तुटून पडले. पण त्यांची घटकेत दाणादाण उडाली. शाही फौजेत केवळ पळापळ सुरू झाली. सारे मोर्चे पार उधळले गेले. शाही मोहीम संपली! खान आणि राजे रांगण्याचा नाद सोडून पळाले. जिवानिशी सुटले हेच नशीब. रांगणा अल्लाद राहिला.

महाराज नंतर हुणमंत्या घाटाने कोकणात कुडाळला उतरले. कुडाळचा परिसर महाराजांच्या ताब्यात होता. पण सावंतवाडीकर सावंत भोसले नेहमीच स्वार्थाचं राजकारण खेळत असत. महाराज जातीने कुडाळवर उतरलेले पाहून त्यांनाही वचक बसणार होता. शिवाय गोव्यातल्या पोर्तुगीझ फिरंग्यांनाही तडाखा देण्याचा त्यांचा डाव होता. आणखी एक वरकरणी हेतू त्यांच्या मनात होता. तो म्हणजे स्वराज्याची या भागातील जी ठाणी आहेत, त्यांची पाहणी करणे.

महाराजांचा तळ कुडाळला पडला. महाराजांचे हेर आवती भवतीच्या मुलखात तिखट नजरेने फिरत होतेच.

तिकडे दिल्लीला औरंगजेब त्यातल्या त्यात अतिशय खुषीत होता. नेताजी पालकरसारख्या 'दुसऱ्या शिवाजी'ला आपण बाटवलंय, म्हणजे आपण निम्मा शिवाजीच बाटवलाय, अशा आनंदात तो होता. त्याचं लक्ष दख्खनवर होतंच. आपला राजपुत्र मुअज्जम हा शिवाजीशी फार स्नेहाने वागतोय, ही गोष्ट औरंगजेबाला जरा बेचैन करीत होतीच. औरंगजेबाला संशयाचं पडसं नेहमीच झालेलं असायचं. सर्वांत जास्त संशय त्याला यायचा आपल्याच पुत्रांचा. ही पोरं माझ्याविरुद्ध बंड करून माझं सिंहासन तर बळकावणार नाहीत ना, ही शंका त्याच्या मेंदूत सदैव वळवळत असायची. दिवसातून शंभर वेळा त्याला या शंकेने आतल्या आत शिंका येत असत. शिवाजीराजांपेक्षा त्याला सतत आठवण येत असायची आपल्या मुलांची. तो बोलून दाखवत नसे, पण त्याला उचकी लागायची! त्याच्या घराण्यात बापाविरुद्ध बंड करायची वहिवाट पडली होती. त्याने स्वतःही बापाविरुद्ध बंड करून, बापाला कैदेत टाकून, शेवटी त्याच्या अंगाला विषाने मर्दन करवून त्याने त्याला ठार करवले होते. पण आपल्या मुलांनी आपल्याविरुद्ध बंड करावं, ही गोष्ट औरंगजेबास पसंत नव्हती!

पण सध्या तरी मुअज्जम आणि शिवाजी महाराज यांच्यात स्नेह होता. मुअज्जम महाराजांशी प्रेमाने वागत होता. सरहद्दीवर पूर्ण शांतता होती नव्हे, प्रेमाचं गुलाबपाणी शिंपडण्याची संधी कुणीही दवडीत नव्हतं.

महाराज कुडाळात उतरले होते. त्यांचं आता लक्ष्य आणि भक्ष्य होते गोवेकर फिरंगी. हे पोर्तुगाली फिरंगी महाभयंकर चिवट आणि क्रूर लोक होते.

यांच्यासारखा शत्रू नाही हे महाराजांनी ओळखलं होतं. या परक्यांना कायमचे हाकलून देऊन गोमांतकाची भूमी मुक्त करावी आणि दक्षिण कोकणकिनारा निर्धास्त करावा हा महाराजांच्या मनातला मनसुबा होता. पण सरळ सरळ जर या फिरंग्यांवर चढाई केली तर यश लौकर मिळणार नाही. ही चिवट जात वर्षन् वर्ष लढत राहील; यांच्यापाशी उत्तम तोफा-बंदुका, दारू-गोळा आणि शस्त्रास्त्रे आहेत, यांनी आपले किल्लेकोट जय्यत तयार ठेवले आहेत. यांच्यापाशी आरमार उत्तम आहे, यांच्या फौजा कवायती हुकूमबंद आहेत, यांच्यात फंदफितुरी, हरामखोरी कुणी करणार नाही. यांना बुडवायचे असेल तर आपल्यालाच बळ वाढवून यांच्यावर घालायला हवे, एरवी हे अशक्य आहे, हे सारे महाराजांनी ओळखलं होतं. म्हणूनच महाराजांनी एक विलक्षण गनिमी काव्याचा डाव मनात योजला. एकाच घावात सारे फिरंगी उडवायचे आणि बुडवायचे असे महाराजांनी ठरवलं. त्यासाठी महाराजांनी पहिली बादळी फुंकर घातली गोव्याभवतीच्या देसायांवर.

भतग्राम महालात एक असाच देसाई होता. याचं नाव होतं रवळो देसाई. पंचवीस एक गावांची जहागीर याच्याकडे होती. हा जहागीरदार होता विजापुरी आदिलशाहाचा. महाराजांनी या भतग्राम महालावर एकदम हल्ला चढवला. महाराजांनी आपल्या तळावर असलेल्या अकरा हजार घोडेस्वारांपैकी सहा हजार घोडेस्वार या देसायावर घातले. स्वतः महाराज होतेच त्यात. आता या देसायाचं बळ किती? तो मराठी वादळापुढं क्षणभर टिकू शकला नाही. पार उधळला गेला. त्याची सारी जहागीर महाराजांनी एकाच झेपेत जिंकली. रवळो देसाई पळाला. आता तो कुठं पळणार? तो पळाला आग्वादच्या किल्ल्याकडे पोर्तुगाली फिरंग्यांच्या आश्रयाला. पाठलागावर असलेल्या महाराजांची नेमकी हीच अपेक्षा होती. हा देसाई फिरंगी अमलात पळून जाऊन गोवेकर गव्हर्नर जनरल फिरंग्याच्या आश्रयाला जाईलच अन् मग आपण या देसायाच्या पाठलागाचं निमित्त करून या फिरंग्यांच्या मुलुखात घुसू, असा महाराजांचा बेत होता. जमलं! नेमकं तसंच घडलं आणि जमलं! गोवेकर पोर्तुगाली फिरंग्यांचा गव्हर्नर जनरल होता जुवाव नुनीस द कुंज कोंदी दे सा व्हिसेंती. या गव्हर्नराच्या आश्रयाला रवळो देसाई गेला. हे लबाड कातडी बचाऊ देसाई लोक नेहमीच गोवेकर गव्हर्नराच्या असे आश्रयाला जात असत. अन् अशा अडलेल्या गिऱ्हाइकांना आश्रय देऊन चार पैसे मिळविणे हा या गव्हर्नराचा धंदा होता. त्याच्या घरी हे गिऱ्हाईक चालत आलं. तो का सोडील? त्याने रवळो देसायाला आश्रय दिला. आपल्या कुंपणात बकरे आलेले त्याला दिसले, पण मागोमाग वाघ येत असलेला त्या गव्हर्नराला दिसला नाही.

महाराज रवळो देसायाचा पाठलाग

करण्याचे निमित्त करून एकदम पोर्तुगाली मुलखात घुसले! त्यांनी पोर्तुगीझांची सोळा गावे पार फस्त करून टाकली! या मराठी धुमाकुळाच्या बातम्या आग्वादला गव्हर्नेरास समजल्या. अगदी अचानक आपल्या मुलखात मराठी फौज घुसलेली पाहून गव्हर्नेराची गडबड उडाली. त्याने किल्लेकोटांना तयार राहण्याचा हुकूम दिला. पण महाराज कोणत्याही फिरंगी किल्लेकोटावर गेलेच नाहीत. त्यांचा धुमाकूळ इतरत्र गावोगाव चालू होता. एका बाजूने गव्हर्नेराने संरक्षणार्थ भराभरा फौजांना हुकूम सोडले. महाराजांना याचीही कल्पना होतीच की, हा गव्हर्नेर नक्कीच लढायला येईल. म्हणून महाराज पोर्तुगीझ ठाण्यांकडे जातच नव्हते. पण दुसऱ्या बाजूने गव्हर्नेराने, ही मराठी चढाई जर तहाच्या वाटाघाटीने थांबत किंवा परतत असेल तर उत्तमच, म्हणून आपला एक वकील ताबडतोब शिवाजी महाराजांकडे पाठवून दिला. हा वकील महाराजांकडे आला. महाराजांनी चढाई थांबविण्यासाठी अट घातली,

'ताबडतोब सर्व देसायांना गोव्याबाहेर हाकलून द्या! त्यांना राजकीय आश्रय देऊ नका!'


गोवेकर वकिलाने ही अट ताबडतोब मान्य केली. या वेळी इतरही काही देसाई मंडळी गोवेकरांच्या आश्रयाला महाराजांच्या भीतीने पळून आलेली होती.

वकील गोव्यात गेला. अटीप्रमाणे गव्हर्नेराने या सर्वच देसायांना गोव्याबाहेर निघून जाण्यास फर्मावले. सर्व देसाई निघून गेले. ते आता कुठं जाणार? ते गेले विजापूरकर आदिलशहाच्या आश्रयाला! 'आम्ही तुमच्या अटीप्रमाणे सर्व देसायांना घालवून दिले आहे,' असे गव्हर्नेराने महाराजांना कळवले. महाराजांनी 'प्रामाणिक'पणाने फिरंग्यांची व्यापलेली गावं सोडून दिली व ते डिचोलीस आले. ही डिचोली महाराजांच्या अमलाखाली होती.

इथपर्यंत सर्व महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे आणि आराखड्याप्रमाणे घडत आले. या डिचोली गावालाच फिरंगी लोक बिचोली म्हणत.

डिचोलीच्या जवळच, पंचगंगा नदीच्या काठी एक पवित्र शिवस्थान होते. या शिवस्थानाची माहिती महाराजांना होती. पोर्तुगीझांनी या देवस्थानाचे धिंडवडे उडवले होते. हे शिवस्थान वारवे या गावी अत्यंत उदासवाण्या वातावरणात व हालअपेष्टात पडले होते. या देवस्थानाचे नाव श्रीसप्तकोटीश्वर. फार प्राचीन, फार प्रसिद्ध, फार पवित्र शिवस्थान हे. या शिवाची आणि त्याच्या भक्तांची सहनशीलता आणि चिकाटीही अपूर्वच.

म्हणजे, त्याचं असं झालं. पूर्वी गोमांतकात कदंब राजघराण्याची सत्ता होती. गोमांतक स्वतंत्र होता. समर्थ होता. वैभवशाली होता. हे कदंब राजे शूर होते. त्यांचं आरमार होतं. हे शूर कदंब राजे देवाचे महान भक्त होते. शांतादुर्गा, मांगरीश, महालसा इत्यादी अत्यंत श्रेष्ठ व तेवढ्याच वैभवशाली



**ताबडतोब सर्व देसायांना गोव्याबाहेर हाकलून द्या**

सहा देवस्थानांपैकी हा सप्तकोटी होता. त्यावेळी सप्तकोटीश्वराचं मंदिर दिवाडीला होतं. हे मंदिर अतिशय भव्य व अत्यंत सुंदर होतं. कोरीव शिल्पाने हे मंदिर आतून बाहेरून अप्रतिमपणे नटलेलं होतं. गाभाऱ्यात एका अति शोभिवंत शाळुंकेवर एक तेजस्वी शिवलिंग लखलखत असे. तांबड्या व सुवर्णरंगाच्या धातूचे हे राजवर्खी शिवलिंग म्हणजे उभ्या महाराष्ट्राचं वैभव होतं. गोमांतकाचे कदंब राजे या देवाचे भक्त होते. ते स्वतः म्हणवून घेत असत, 'श्रीसप्तकोटीश्वरप्तब्धवरप्रसाद महाराजाधिराज श्रीकादंबवीर'

पुढं सुलतानांचं भयंकर आक्रमण गोमांतकावरही आलं. धर्मग्रंथ जळाले. मंदिरं उध्वस्त झाली. देवदेवता फुटल्या. अवघा हलकल्लोळ झाला. त्यावेळी सुलतानांनी श्रीसप्तकोटीश्वराचं ते तेजस्वी लिंग एका शेताच्या बांधावर चिखलात घालून ठेवलं. स्वातंत्र्य गेलं की, देवालाही असे हाल आणि अपमान सहन करावे लागतात. देव हालात होते. सत्ता बहमनी सुलतानांची होती.

पुढं विजयनगरच्या राजांनी धर्मध्वज हाती घेतला आणि ही सर्व देवभूमी, धर्मभूमी सुलतानांच्या मिठीतून सोडवून स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा केली. त्यांनी प्रजेला, पृथ्वीला आणि देवाला वचनच दिलं की, 'नावू आडिद भाषिगे तपूव दिल्ह!' म्हणजे, आम्ही दिलेला शब्द मोडणार नाही!

विजयनगरच्या राजांनी सुलतानांच्या जरबेतून गोमांतकाची सुटका केली. गोवा स्वतंत्र झाला. गोयकपट्टणावर स्वातंत्र्याचं निशाण फडकू लागले. देवदेवता नंदादीपांच्या तेजात नांदू लागल्या. श्रीसप्तकोटीश्वर पुन्हा आपल्या सुंदर प्रासादांत पालखीत बसून आला.

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

**प्रथम पहिल्या मुलाची सर्व तरतूद नीट करायला नको का?**



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**



लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

**लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक**

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/460

गाभाऱ्यात रुद्र घुमू लागला.

अशी काही वर्षं गेली आणि पुन्हा एक प्रचंड राक्षसी पंजा गोव्यावर पडला. पोर्तुगीज फिरंग्यांची तऱ्हा निराळीच. सुलतान बरे म्हणायची वेळ आली. त्यांनी धर्माच्या नावाखाली लोकांचे आणि देवाधर्माचे भयंकर हाल सुरू केले. त्यांनी लष्कर घालून एका रात्रीत सहाशे पन्नास मंदिरे फोडून टाकली. त्यांत दिवाडीच्या श्रीसप्तकोटीश्वरांचे मंदिरही सापडले. फिरंगी रानटयांनी ह्या सुंदर मंदिराचा प्रत्येक दगड उखडून काढला आणि समुद्रांत नेऊन बुडविला. उरली फक्त श्रीशिवसप्तकोटीश्वराची लखलखती पिंडी. फिरंग्यांनी ते शिवलिंग मुद्दाम गोमांतकीयांचा अपमान करण्यासाठी, एका विहिरीच्या कांठाला लावून ठेवलं. ते अशा तऱ्हेने लावून ठेवलं की, विहिरीचं पाणी शेंदणाऱ्या माणसाचा पाय त्या लिंगाला लागवा !

अशाही स्थितीत चाळीस वर्षं उलटली. पुढे सुर्यराव देसाई नावाच्या माणसाने फिरंगी गव्हनेराची परवानगी मिळवून ते शिवलिंग नारवे येथे एका कातळाच्या कोनाडयात नेऊन ठेवले. सप्तकोटीश्वरला थोडासा का होईना, पण निवारा मिळाला.

अशा निवाऱ्याखाली साठ वर्षं उलटली आणि एके दिवशी एक तेजस्वी पुरुष, नारव्याच्या त्या गर्द झाडीझुडपातून मार्ग काढीत श्रीसप्तकोटीश्वरापुढे येऊन उभा राहिला. या तेजस्वी पुरुषाचं नाव होतं, शिवाजीराजे भोसले !

नारवे ! पलीकडे पंचगंगा वहात होती. नारळी, पोफळी, अंबा, साग, फणस, जांभळी इत्यादी शेकडो प्रकाऱ्च्या हजारो वृक्षांच्या गर्द झाडीत दहावीस झोपडया उभ्या होत्या. शेतकऱ्यांची ही घर. एक नागमोडी पाऊलवाट या घरकुलांवरून त्या गर्द झाडीखालून सळसळत जात होती. एका बाजूला उंचट टेकाड चढत गेलेलं. त्यावरही किर्रर्र झाडी. कुठून कुठून पाणी खळाळ उडया मारीत अन् दगडाधोंडयांशी कुजबुज करीत धावत होते. त्या दहावीस घरकुलांच्या नारवे गावाचा औरस चौरस परिसर असा होता. हिरवागार, शांत, प्रसन्न. पण जरा काही वेगळी चाहूल लागली तर विचकणारा. नुकताच हा भाग स्वराज्यात दाखल झाला होता.

इथंच, या झाडीत जांभ्या दगडांचा मोठा कातळ कातून काढलेला होता. दक्षिणेच्या अंगाला कातळातच एक कमानी कोनाडा कोरलेला होता. कोनाडा उंचपुरा होता. या कोनाडयांत श्रीशिव सप्तकोटीश्वर विराजमान झाले होते. जवळच दगडी आडोशाला एक पणती तेवत होती. समोरचं वावर मोकळं होतं. नारळीच्या वाळलेल्या झावळयांचा सभामंडप बनविलेला होता. आवतीभवतीच्या हलत्याझुलत्या फांद्याफांद्यातून उन्हाची किरणं लपंडाव खेळत होती. एकूण श्रीसप्तकोटीश्वराच्या देवालयाचा थाट असा होता आणि या चंद्रमौळी देवालयात देवापुढं उभे होते महाराज शिवाजीराजे. आवतीभवंती होते त्यांचे जिवलग.

□ □ □

## पुस्तके

# चाफा सौ. आशा भाजेकर

केशव मेश्राम

सौ. आशा भाजेकर यांच्या सोळा कथांचा हा दुसरा कथासंग्रह. त्यांच्या पहिल्या कथासंग्रहात म्हणजे ' उमलायला हवी होती कळी ' यामध्ये लेखिकेच्या विविध विषय सहजपणे हाताळण्याच्या शक्तीची चुणूक पहायला मिळाली होती. लेखिकेच्या पुढील लेखनाचे स्वागत करण्याचे औत्सुक्य निर्माण करण्याचे कार्य ह्या पहिल्या पुस्तकाने केले होते. ' चाफा ' हा संग्रह भाजेकरांच्या काही वैशिष्टयांची प्रामुख्याने ओळख करून देतो.

विषयांच्या संदर्भात एक विशेष गोष्ट या पुस्तकात खास करून आढळते, ती ही, की मराठी लघुकथेच्या विषयाविष्करणाच्या लकबी जसजशा बदलत गेल्या, तरल होत गेल्या; तसतसे त्यांच्यात मुक्तपणाचा व धीटपणाचा प्रादुर्भाव होत गेला. म्हणजे स्त्रीलेखिका असली, की काही विवक्षित भावनांचाच आविष्कार करणार, दुसऱ्या वगळणार, असे जे काही ठोकताळे समीक्षेत आढळत होते, ते पूर्णपणे विसरावयास लावणारी कथा; आता नव्या-जुन्या लेखकांकडून लिहिली जाते.

' चाफा ' ह्या संग्रहातील बहुसंख्य कथा ' स्त्री ' आणि ' बालक ' या दोन घटकांशी निगडित आहेत. ' चाफा ', ' ठिणगी ', ' साद ', ' बोल्ट ', ' सम ' आणि ' रानफूल ' या कथा नायिकाप्रधान आहेत. प्रत्येक कथेची वेगळाली धाटणी आहे. ' चाफा 'मध्ये पांढरपेशा घरात वावरणारी, एकलेपणामुळे व मातापित्यांचा मिळावा तसा सहवास न लाभल्याने हेकेखोर–एककल्ली बनलेली लिली. किशोरावस्थेतील ही मुलगी निवेदिकेच्या मनात अभावित आस्था निर्माण करते. आपला प्रपंच सांभाळून-

ही उमलणाऱ्या ह्या 'कळीवर' निवेदिका माया करीत असते. सुभानराव नामक एका सामान्य तरुणाच्या मोहजालात सापडून अगतिकतेने लुटल्या जाण्याच्या अवस्थेत असताना निवेदिका तिची मुक्तता करते. एवढीच ही कथा आहे.

'ठिणगी' ही कथा भडक आहे. म्हातारी सिल्हिया एका सावळा नामक ब्राह्मण खलाशाशी विवाहबद्ध होते. त्याच्यापासून मार्थाचा जन्म होतो. पुढे तो खलाशी बेपत्ता होतो. मार्था वयात येते पण एका भयाण आजारात तिला कायमचे अंधत्व लाभलेले असते. विपन्नावस्थेत आयुष्य जगतानाही निसर्ग आपले काम करतच असतो. मार्थाला खूप जपणाऱ्या सिल्हियाच्या नकळत एका काळोख्या रात्री इस्माईल पाववाला मार्थाशी 'शारीरिक' सलगी करतो आणि ह्या नव्या अनुभवाच्या वेगळेपणाची ठिणगी मार्थाचे तरुण शरीर घुसळून काढते अशी ही कथा. कारुण्याच्या स्पर्शानेही ही कथा सौम्य नाही. ज्या भावनिक 'ठिणगी'कडे लेखिकेला लक्ष वेधायचे आहे त्यापेक्षा इतर तपशीलच कथा गिळून टाकतो.

'साद' ही अनेक प्रसंगांची विस्कळित कथा. पुरुषाच्या तरुण वयातील बेजबाबदारपणाची, भास्कर रानडे व अरुंधती यांच्या मीलनाची आणि पुढे अरुंधतीने गंगाधर नामक समंजस पुरुषासोबत केलेल्या प्रपंचाची ही कथा. आश्रमात असलेला मुकुंदा व त्याला पत्नीची पूर्वायुष्यातील चूक विसरून घरात आणणारा गंगाधर अशी ही कथा आहे. 'रानफूल' ही कथाही खूप भडक आहे. दारिद्र्यात एकटेपणाने वाढून आपल्या पोटी आलेल्या अपत्याचे समाजाला ठोकरून संगोपन करू पहाणारी स्त्री यात रंगविली आहे. कथानकाचे कितीतरी कच्चे धागे नीट न बांधल्याने ही कथा मनाला स्पर्श करीतच नाही.

'बोल्ट' आणि 'सम' या दोन कथा खूप प्रभावी अशा आहेत. 'बोल्ट' कथेत एका प्रौढ कुमारिकेच्या मानसिक स्पंदनाना शब्दरूप लाभले आहे. समोरच्या खोलीतील दूरच्या अपरिचित तरुणावर आपल्या मनाने जीव जडवणारी ही प्रौढ अविवाहित शिक्षिका कातर करून सोडते. 'सम' कथेत निवेदिका आपल्या स्वतःच्या भावजीवनाचे मनःपूर्वक चित्रण करताना दिसते. पतीपत्नींमध्ये प्रयत्न करूनही वाढणारा मानसिक दुरावा, त्यायोगे येणारी ग्लानी आणि मग केव्हातरी दोन्ही मनाची साधलेली सुसंवादी लय याचा भाजेकरांनी सहजतेने आविष्कार केला आहे. 'फुलपंखी' कथेत एका अवखळ विवाहितेची व तिच्यासाठी समाजाकडून अवहेलना सोसूनही त्याग करू पाहणाऱ्या नवऱ्याची ही कथा आहे. 'माझं घर कुठलं?' ही कथा एक जुना विषय पण नव्या पद्धतीने हाताळलेला अशी आहे. विधवा झाल्यावर दुसऱ्या विधुराशी पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीच्या लहान मुलीची मनोव्यथा या कथेत आहे. नव्या घरात, नवे बाबा, आजो आणि प्रभा, चंदा ही

पार्क - डेव्हीसचा

# त्रिविध फायदे देणारा

# निको साबण

**इतर कोणत्याहि साबणापेक्षा तुमच्या त्वचेची अधिक काळजी घेतो**

1 निको जंतूंचा नाश करतो

2 निको शरीराचा घामटपणा घालविते


3 निको कातडी निर्मळ करून तिचे रक्षण करतो

निकोनें केलेले स्नान म्हणजे आरोग्यमान, नितळ कांतिकरिता घेतलेली परमावधीची काळजी! निकोच्या जंतुनाशक फेसामुळे कातडीवरील जंतूंचा नाश होतो आणि तिचे आरोग्य राखले जाते निकोच्या औषधी गुणधर्मामुळें शरीराचा घामटपणा व दुर्गंधी दूर होतात. निकोच्या प्रभावी जंतुनाशक क्रियेमुळे कातडीच्या साधारण रोगांपासून रक्षण होते व त्वचा निर्मळ धुतली जाऊन ती तजेलदार, कांतिमान व टवटवीत होते. निको पुटकुळ्या व घामोळें यापासूनही रक्षण करतो। निकोच्या नियमित वापराने डोक्यांतील खवड्यापासून बचाव होतो तुमच्या कातडीचा तजेलदारपणा व आरोग्य राखण्यासाठीं त्रिविध फायदे देणाऱ्या निकोचा वापर आजच सुरू करा.

TRIPLE ACTION

**NEKO®**

The Original Antiseptic Soap




निकोची संवय लावून घ्या

आपल्या त्वचेसाठीं तो आवश्यक आहे

® Regd. Trade Mark. Regd. Users—Parke Davis (India) Ltd., Bombay-72 AS.

सावत्र भावंडे या कुणाशीच नंदिनी एकरूप होऊ शकत नाही. इतकेच काय पण सख्खी आईही नव्या घरात तिच्याकडे कमी लक्ष देते किंवा दुर्लक्ष करते. आईला सगळे मिळाले पण 'माझे घर कोणते ?' हा नंदिनीने विचारलेला हा प्रश्न मनाला स्पर्श करून जातो. भाजेकरांनी ह्या कथेचेही अतिनाटयीकरण केले आहे त्यामुळे तिची सुप्त प्रभाविता ढोबळ झाली आहे.

'मंजू', 'अश्विनी' व 'इतकं रागावायचं कशाला ?' या तीनही कथा लहान मुलामुलींच्या मानसिक चित्रणावर भर देणाऱ्या आहेत. 'मंजू' कथेचा शेवटचा प्रसंग 'मुल्कराज आनंद' यांच्या 'Lost Child' सारखा नाटयात्मक आहे. 'अश्विनी 'मध्ये स्त्री-मत्सर आणि त्याला पडणारा तेढा याचे हृद्य चित्रण आहे. 'इतकं रागवायचं कशाला ?' ही कथा खूप हसतखेळत लिहिली आहे. छोटया मुलाच्या समर्थ चित्रणाचा एक चांगला नमुना म्हणून या कथेचा उल्लेख करावा लागेल. पण चंचलबेन-सुखलालशेठ यांचा मुलगा सुभाष आणि त्यांच्याकडे येणारे डॉक्टरकाका यांचे उल्लेख पुन्हा बटबटीत व कलाहीन आहेत. त्यातील सूचना व्हलगरतेकडे झुकणारी आहे.

'दीड दिवस' व 'थोरली काकू धाकटी काकू', या कथा सामान्य आहेत. 'हरीमामा' ही कथा भावपूर्ण जरी असली तरी पु. ल. देशपांडे यांच्या 'हरीतात्याशी 'ती जवळीक साधताना दिसते. तात्यांचे दुःख व वेगळेपण वेगळ्या प्रकाराने 'हरीमामात' आलेले दिसते. आणि व्यक्तिचित्रण व नामसाधर्म्य ह्या दोन्ही दृष्टींनी ही कथा स्वतंत्र म्हणून आपला ठसा रसिकमनावर उमटवू शकत नाही. अनुकरणासारखी वाटते. त्यातील भावपूर्णताही साशंक करते.

'पुरुष' ही या संग्रहातील एक अत्यंत समर्थ कथा. विषय आणि आविष्कार या दोन्ही बाजूंचे स्वतंत्र वैशिष्टच असलेली. बरेच दिवस मूलबाळ नसलेल्या जोडप्याची ही गोष्ट आहे. सामान्यत: 'स्त्री 'मध्येच काही दोष असेल असे मानणारा समाजाचा पारंपरिक दृष्टिकोण, पुरुषाच्या वीर्याची तपासणी करण्याचे डॉक्टरांनी सांगितल्यावर शेखरच्या मनोरचनेत ला घडलेला बदल—माधुरीबद्दल—आपल्या पत्नीबद्दलची त्याची बदललेली भावना—हळूवारपणे तिची होणारी चौकशी आणि पुन्हा निर्दोषित्व सिद्ध झाल्यावर आलेला पुरुषी कोरडेपणा यांची स्पंदने आणि चढउतार इतक्या सहजतेने सौ. भाजेकरांनी हाताळले आहेत, की त्यांच्या लेखनप्रतिभेपुढे वाकावेसे वाटते.

'चाफा' हा संग्रह आणखीही एका तऱ्हेने आस्वादिता येईल. काही कथांचे निवेदन अत्यंत सोपे, प्रांजल व निरलंकृत असे आहे. त्या स्वाभाविकतेमुळे त्या कथा मनाचा ठाव घेतात, तर उलटपक्षी काही कथा आलंकारिक फडके पतिपत्नीच्या जुन्या बाजाने लिहिल्या असल्याने कृत्रिम वाटतात. 'तडा' सारखी कथा घरासाठी उभी

ह्यात पैसा अडका साठवून, कंजूष म्हणून बदनाम झालेल्या म्हाताऱ्या पिढीची प्रतिनिधिक कथा ठरते तर 'पुरुष' सारखी कथा एक श्रेष्ठ सार्वकालिक कथा ठरते.

'पुरूष', 'बोल्ट', 'सम' आणि 'तडा' या चार कथा संग्रहातल्या श्रेष्ठ कथा आहेत. थोडी चोखंदळ निवड केली. गेली असती तर हा 'चाफा' नक्की गुंगी आणणारा ठरला असता. पण 'पुरुष' सारखी कथा लिहिणारी लेखिका संग्रहाच्या जाडजूडपणाचा मोह टाळून अधिक चोखंदळ, अलिप्त नेटकी निवड करून आपले नवे पुस्तक नक्कीच प्रकाशीत केल्याशिवाय राहणार नाही असे वाटते. ◻

**चाफा**
सौ. आशा भाजेकर
परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई
किंमत : आठ रुपये.

---

व्यावहारिकदृष्टचा सामान्यात जमा होणारे हे चरित्र. पण या सामान्याने एका विशाल उद्दिष्टाच्या रथाशी स्वतःला बांधून घेतले आणि रस्त्यावरच्या दगडधोंड्यांनी शरीर व मन घायाळ होत असतांही कधी सुखाचा निवारा शोधला नाही. जखमी होऊनही पराभूत न झालेल्या, प्रसादाच्या अपेक्षेवाचून पूजा करणाऱ्या, उजेडाच्या उपासनेसाठी काळोख विकत घेणाऱ्या माणसाची, एका विठू मास्तराची ही कहाणी. त्या कार्यकर्त्याच्या शब्दात थोडा बदल करून मी शेवटी म्हणेन, 'लाँग लिव्ह विठू मास्तर!'

–कुसुमाग्रज

# कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

दहा रुपये

राजहंस प्रकाशन

---

एक 'स्टंट' अमेरिकन स्त्री-वार्ताहर

# नेली ब्लाय

डॉ. शरद अभ्यंकर

गोष्ट आहे १८८५ सालातील. पिट्सबर्ग येथील 'डिस्पॅच' या वृत्तपत्राने 'मुलींनी वागावे कसे ?' या विषयावर एक अग्रलेख लिहिला होता. लेखात म्हटले होते, 'कोणतीही कुलीन मुलगी विवाहाची मागणी येईपर्यंत घरातच रहाते. समजा, कमनशिबाने अशी मागणी आलीच नाही तर ती कुमारिकाच रहाते आणि आपल्या आईबापांचेकडे अथवा अन्य नातेवाईकांकडे दिवस काढते. याबद्दल विनावेतन करावे लागणारे घरकाम, मुले सांभाळणे इ. ती आनंदाने पार पाडते. हेच मुलींच्या जातीला आदर्श जीवन होय.

एलिझाबेथ कोच्रान त्यावेळी १८ वर्षांची होती. हा लेख वाचताच तिचे पित्त खवळले आणि तिने संपादकांना एक सणसणीत उत्तर पाठवले. 'राष्ट्रातील निम्म्याअधिक नागरिकांची अक्कलहुषारी आणि कौशल्य केवळ त्या स्त्रिया आहेत म्हणून वाया घालवणे हा मूर्खपणा आहे. प्रत्येक स्त्रीने तिच्या योग्यतेनुसार समाजातलं तिचं स्थान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि पुरुषांनीही तिला या बाबतीत उत्तेजन दिले पाहिजे.' असा तिचा दावा होता. मात्र घाबरून तिने पत्राखाली सही न करता ते तसेच पाठवले. आपल्या आयुष्यात घाबरून तिने केलेली ही अखेरचीच गोष्ट ठरली.

'डिस्पॅचचे संपादक जॉर्ज मॅडन यांना एलिझाबेथचा लेख अतिशय आवडला. विशेषत: तर्कशुद्ध विचार आणि लेखाची मांडणी त्यांना आकर्षक वाटली. त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले आणि आमच्या संपादकीयाविरुद्ध टीकात्मक लेखन निनावी पाठविणाऱ्या सद्गृहस्थांनी कृपया संपादकीय कचेरीत येऊन भेटावे अशी विनंती केली.

थोड्याच दिवसात एलिझाबेथ कोच्रान त्यांच्यापुढे येऊन हजर झाली आणि संपादक महाशय आश्चर्याने



**बायकांना आम्ही कामावर ठेवत नाही**

उलटेच झाले. वृत्तपत्राच्या संपादकीय कचेरीत एक बाई येणे हीच मुळी त्या-काळी अभूतपूर्व घटना होती. मग तिला लेखक म्हणून काम देणे दूरच !

'बायकांना आम्ही कामावर ठेवत नाही.' मॅडनसाहेबांनी सरळ सरळ साँगितले. 'पण माझा लेख तर तुमच्याच मताने उत्कृष्ट होता !' एलिझाबेथने आठवण करून दिली. "मग तुम्ही 'सोसायटी पेज' लिहित जा. मॅडन जरा खाली आले. 'सोसायटी पेज' म्हणजे श्रीमंत बायकांच्या पार्ट्या, परदेशगमन आणि समाजकार्य यांचे खरे–खोटे रिपोर्ट ! एलिझाबेथने स्पष्ट नकार दिला. 'घटस्फोट या विषयावर एक लेखमाला लिहावी असा विचार आहे माझा', तिने सांगितले. बापरे ! घटस्फोट हा शब्दसुद्धा त्या काळी सभ्य लोक उच्चारीत नसत ! त्यामुळे मॅडननी सुचवले, की तिने पुरुषाच्या टोपण नावाने लिहावे. एलिझाबेथने पुन्हा स्पष्ट नकार दिला. या विषयावर पेचप्रसंग निर्माण झालेला असतानाच एक कामकरी पोऱ्या 'नेली ब्लाय' हे तेव्हांच सुप्रसिद्ध गाणे शिटीवर वाजवीत गेला. झाले 'नेली ब्लाय' असे एलिझाबेथ कोच्रानचे नामकरण करण्यात आले आणि लवकरच 'नेली ब्लाय'ने खरोखरीचे नाव कमावले.

पूर्वी कोणी न केलेले करून दाखवणे हाच नेलीचा स्वभाव बनला. सुरुवातीलाच तिने एका बाटल्या भरण्याच्या कारखान्यात नोकरी पत्करली. इतर स्त्रियांच्याबरोबर तिने रोज १४–१४ तास काम करून २–४ आणे रोजगार घेतला. अनेक स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या आणि या अन्यायी, अस्वच्छ कारखान्यांचेवर जबरदस्त लेख लिहून सारे पिट्सबर्ग हादरवून सोडले.

१९ वर्षाची असतानाच नेलीने 'डिस्पॅच'च्या वतीने मेक्सिकोचा दौरा केला. या गोंडस चेहेऱ्याच्या सुंदर

मुलीला अनेकांनी उत्साहाने माहिती पुरवली. मेक्सिकोमधील दारिद्र्य, व्यसनाधीनता, लाचलुचपत यावर तिने स्फोटक लेख लिहिले. यातील काही लेख मेक्सिकोपर्यंत येऊन पोचताच तिची तेथल्या सरकारने हकालपट्टी केली. सरहद्दीवरच्याच एका गावात मुक्काम टाकून तिने मेक्सिकोतील हलाखीची परिस्थिती आणि तेथे स्त्रियांना दिली जाणारी भयानक वागणूक यावर हल्ला चढवणारे लेख पाठवले.

पिट्सबर्गला येईपर्यंत 'नेली 'चे नाव सर्वत्र गाजू लागले होते. 'माझी चार स्वप्ने' या नावाने तिने पुढील गोष्टी करण्याची आशा व्यक्त केली होती. १. प्रेमात पडणे. २. एखाद्या लक्षाधिशाशी विवाह करणे. ३. जगात सुधारणा घडवून आणणे आणि ४. न्यूयॉर्कच्या एखाद्या वृत्तपत्रात काम करणे.

यापैकी एक गोष्ट तिने कृतीत उतरवली. न्यूयॉर्कला जाण्याची. पुलिट्झर पारितोषकाच्या प्रणेत्याचे 'वर्ल्ड' हे वृत्तपत्र त्याकाळी सर्वोत्कृष्ट समजले जाई. त्याच्या संपादकांशी नेलीने भेट मागितली पण तिची मागणी हसण्यावारी नेण्यात आली. अखेर तिने स्वत: पुलिट्झरनाच भेटून 'वर्ल्ड 'करता कामगिरी मिळवली.

त्याकाळी न्यूयॉर्कच्या ईस्ट रिव्हरमधील ब्लॅकवेल बेटावर म्हातारे-कोतारे आणि वेडे यांना ठेवण्यासाठी एक बंदिशाळा होती. या बंदिशाळेतील परिस्थितीची प्रत्यक्ष पहाणी करण्याचे नेलीने ठरवले. आणि तीही कशी तर स्वत:च तेथे वेडी म्हणून प्रवेश घेऊन. पुलिट्झरना हे साहस तात्काळ पसंत पडले.

नेलीने तयारी म्हणून किंकाळ्या फोडणे, वेडावणे, एकटक पहात रहाणे असल्या गोष्टींचा सराव केला. न्यूयॉर्कच्या एका बकाल भागात नेलीब्राऊन या नावाने तिने एक खोली घेतली. मेक्सिकोमधे शिकलेले, मोडकेतोडके स्पॅनिश बोलून आपण क्यूबा देशाची राजकन्या आहोत, आणि लवकरच आपले नोकरचाकर, लवाजमा हॅवानाहून येणार आहे असे ती सांगत असे. मधेच ती बडबडे, मधेच रडत बसे तर मधेच नोकराला पिस्तुल घेऊन येण्याचा हुकूम करी. साहजिकच तिला लवकरच एका रुग्णालयात आणि तेथून ब्लॅकवेल तुरुंगात पाठवण्यात आले.

आपल्या तीक्ष्ण नजरेने तिने तेथल्या सर्व गोष्टींचा अभ्यास केला. निर्विकार डॉक्टर्स, दुष्ट नर्सेस, शिसारी आणणारे अन्न, गलिच्छ रहाणी, आणि निर्दयी वागणूक! जरी हे वेड्यांचे रुग्णालय असले तरी इथले सर्वच रुग्ण काही वेडे नव्हते. काही केवळ म्हातारे आणि आजारी होते. पण सर्वांनाच इथे पशूगत् वागवले जाई. मारहाण करणे, तोंडात बोळे कोंबणे, कपाटात कोंडून ठेवणे हे प्रकार नित्याचे असत.

दहा दिवसांनी 'वर्ल्ड 'चे वकील नेलीच्या सुटकेचा हुकूम घेऊन आले. सुटका होताच 'नेली 'ने 'तुरुंगाच्या गजाआड' ही लेखमाला लिहून न्यूयॉर्क शहर आणि सर्व देश हादरवून सोडला. तात्काळ या सर्व गोष्टींची चौकशी




सॅनफ्रान्सिस्को येथे भव्य स्वागत

करण्यात आली, आणि ब्लॅकवेल बेटा-वरील परिस्थिती सुधारण्याकरता उपाय योजण्यात आले.

यानंतर नेलीने आपला मोर्चा वेठ-बिगारासारखे काम करून घेणाऱ्या कारखान्यांकडे वळवला. एका खोक्याचे कारखान्याच्या जाहिरातीला तिने उत्तर पाठवले. तिला लगेच काम मिळाले. एक अंधारी कोंदट तळघरातली खोली, एकच गॅसचा दिवा आणि कामाची वेळ सकाळी ६ ते संध्याकाळी ७. पहिले दोन आठवडे पगार नाही. काही १२ वर्षांच्या मुलीही तिथं कामाला होत्या. बरेच मालक दोन आठवडे झाल्यावर पगार न देता त्यांची हकालपट्टी करीत असत. नेलीने या सर्व गोष्टींना वाचा फोडणारी एक लेखमाला लिहिली आणि या कामगार-स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याची मागणी केली.

या पुढच्या साहसाने नेलीने अक्षरशः जग जिंकले. जूल व्हर्न याची '८० दिवसात पृथ्वी प्रदक्षिणा' ही कादंबरी १८७२ मध्ये प्रसिद्ध झाली होती. आपण स्वतः ८० दिवसांचे आत असाच प्रवास करून परत येऊ असे नेलीने आव्हान दिले. 'वर्ल्ड' वृत्तपत्राने ते स्वीकारले आणि १४ नोव्हेंबर १८८९ ला नेली निघाली.

वादळ, हिमवृष्टी, प्लेग या साऱ्यांना न जुमानता नेलीनं आपला प्रवास चालूच ठेवला. एवढेच नव्हे तर प्रवासाचे नियमित बातमीपत्र ती 'वर्ल्ड' कडे पाठवीत होती. सर्व लोकांनी तिच्या या साहसात प्रचंड उत्सुकता, कळकळ आणि उत्साह दर्शवला. तिच्या जिंकण्या-हरण्यावर हजारो पैजा लागल्या. तिचे पोवाडे रचले जाऊ लागले. फुलांना, गाड्यांना, रेसच्या घोड्यांना तिचे नाव

दिले जाऊ लागले.

सॅनफ्रान्सिस्को इथे नेली पोचली त्या वेळी धक्क्यावर हजारो लोक तिचे स्वागत करण्याकरिता जमले होते. मतदान हक्काकरता चळवळ करणाऱ्या स्त्रियांनी मोठमोठे फलक तिच्या गाडीसमोर मिरवले. बँड, गर्दी, टाळ्या असा जल्लोष उडाला. रेल्वेतून न्यूयॉर्कला जाताना प्रत्येक ठिकाणी तिचे दणदणीत स्वागत झाले. कॅन्सासच्या स्त्रियांनी तिला गव्हर्नरपदासाठी उभे करायचे ठरवले.

७२ दिवस, सहा तास अकरा मिनिटांनी नेली ब्लाय पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करून परत मूळ ठिकाणी हजर झाली. अमेरिकन जनतेने तिच्या केलेल्या गोड कौतुकाला सुमारच राहिला नाही.

'अमेरिकन तरुणी ही आता साधीभोळी राहिलेली नाही ' एक पुढारी गरजले. ' जगात कुठेही गेली तरी निश्चयी, स्वतंत्र आणि आपल्या पायावर उभी राहू शकेल अशी ती आता झाली आहे. ' नेलीला हेच व्हायला हवे होते. अमेरिकेत आता स्त्री-वार्ताहर डझनावारी झाल्या होत्या.

आपल्या स्वप्नरंजनापैकी इतर गोष्टीही नेलीने लवकरच पूर्ण केल्या. रॉबर्ट सीमन या लक्षाधिशाच्या ती प्रेमात पडली आणि त्यांच्याशी तिने विवाह केला. (१८९५) नेली यावेळी २८ वर्षांची होती आणि सीमन ७२ वर्षांचे ! लवकरच सीमन स्वर्गवासी झाले आणि नेलीने काही अनुभव नसताना त्यांच्या धंद्याची सूत्रे हातात घेतली. १९१२ पर्यंत अमेरिकेतील एक अग्रगण्य स्त्री-कारखानदार म्हणून तिने नाव मिळवले.

पण या परीकथेसारख्या भासणाऱ्या गोष्टीचा शेवट मात्र सत्यकथेप्रमाणे आहे. कोर्ट-कज्जे, लबाड्या, चोऱ्या यामुळे नेलीच्या धंद्याचे दिवाळे वाजले. १९१९ पर्यंत ती युरोपमध्येच जाऊन राहिली. परत आल्यावर तिने पुन्हा न्यूयॉर्क इव्हिनिंग जर्नलमध्ये काम पत्करले.

पण आता नेली ब्लायला लोक विसरले होते. १९२० मध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क देणारी घटना दुरुस्ती पास झाली. स्त्री-कामगारांची परिस्थिती आता सुधारली होती. कुणाही मुलीला आता इच्छेविरुद्ध घरी रहावे लागत नव्हते. स्त्री स्वातंत्र्याच्या या यज्ञाची सुरुवात नेलीने अल्पस्वल्प प्रमाणात केली होती.

१९२२ साली ही जबरदस्त व्यक्तिमत्त्वाची धाडसी स्त्री न्युमोनियाच्या विकाराने निधन पावली.

आजकाल पाश्चात्य देशात स्त्री समतेच्या नावाखाली चाललेल्या पोरकट चळवळी पाहिल्या, की नेली ब्लायचे जीवन भलतेच उज्ज्वल भासू लागते.

□ □ □



चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय् !

प्रत्यक्ष साक्षीदारांच्या जबान्या

जबानी दुसरी : हप्ता पहिला

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

एका दृष्टीनं माझं आयुष्य व्यर्थच गेलं असं म्हणता येईल. दोन गोष्टी आपल्या हातनं व्हाव्यात असं फार वाटत होतं.

पूर्व आशियातल्या लाखो लोकांच्या इच्छेच्या इरावतीत मी माझ्यापण इच्छेची लहानशी धार मिसळून टाकली होती. आमचं काय वाट्टेल ते होवो. पण आझाद हिंद सेनेचा शेवटचा सैनिक एक दिवस दिल्लीला पोचू दे अन् त्या लाल किल्ल्यावर आपल्या हातानं

तिरंगी झेंडा फडकवू दे. असं पूर्व आशियातल्या लाखो लोकांना वाटत होतं. मला पण वाटत होतं. पण ते झालं नाही.

ज्यांच्या हातनं अखेर लाल किल्यावर तिरंगी झेंडा फडकवला गेला, त्यांच्या नावानं आमच्या दोन नंबरच्या डिव्हिजनमधे एक ब्रिगेड होती. पण—मला वाईट वाटतंय् सांगताना—ते आमच्या सेनेतले नव्हते. ऐन लढाईच्या वेळीच आम्ही ब्रिटिशांना त्रास देत होतो. म्हणून हा सद्‌गृहस्थ एकदा चिडलापण होता. गांधीजींच्या 'क्विट–इंडिया' ठरावावर सही देतानापण ह्याच गृहस्थानं काचकूच केली होती म्हणे. तोच हा गृहस्थ. त्याच्याच हातनं लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा फडकवला गेला. पण तो गृहस्थ काही आमच्या सेनेतला नव्हता.

आणखी एक इच्छा होती. ज्या अफलातून माणसाबरोबर एक वर्ष, अकरा महिने व बावीस दिवस सावलीसारखं फिरायचं भाग्य मला लाभलं, त्याचं एक चरित्र लिहायचं माझ्या फार मनात होतं. हीही इच्छा अपुरीच राहली. आयुष्यभर दुसऱ्याचे शब्दच तेवढे नोट करत आलो. निदान तरी स्वतःचं काही लिहावं असं फार वाटत होतं. पण तेदेखील झालं नाही.

झालं नाही, कारण हा अफलातून माणूसच. तेच एक दिवस मला म्हणाले होते—आय ॲम सॉरी, बॉस्वेल ! ह्या बंगाली सुभाष बोसचं चरित्र तुला कधीच लिहिता यायचं नाही.

जणू काहीतरी रहस्य असल्यासारखं म्हणाले होते. पण ज्या परिस्थितीत न् ज्यांच्याबरनं ते असं म्हणाले होते, त्यांच्याबद्दल मला नंतर फार विचार करायला लागलाय्.

ह्या दोन वर्षांतल्या कितीतरी गुप्त घटना माझ्यादेखत घडल्यायत. आजपर्यंत मी त्यांचा गप्प साक्षीदार होतो. पण आज आता त्या घटना बोलायला काहीच हरकत नाही. तो गप्प साक्षीदार आज बोलका होतोय्. कारण पंचवीस वर्ष लोटल्यानंतर त्यातली एकपण गोष्ट गुप्त ठेवायचं काही कारणच नाही आज.

पण ह्या गोष्टी नीटपणानं सांगायच्या तर एक दृष्टिकोन हवा. एक आदर्श हवा आयुष्यात. तसं काहीच ह्या स्टेनोग्राफर भास्करनजवळ नाही. माझा हा कमकुवतपणा आज मी मोकळ्या मनानं कबूल करून टाकतो.

ही झाली एक गोष्ट. तरी पाव शतक ओलंडून आल्यावर आता जेव्हा मी मागं वळून पहातो, तेव्हा आयुष्य व्यर्थ गेलंय् असं तर अजिबातच वाटत नाही. माझ्याइतकं नशीबवान् दुसरं कोण आहे ? चालू शतकातल्या करोडो भारतीयांच्यात आश्चर्यकारक, सगळ्यात रोमांचकारक, सगळ्यात महान् आयुष्य असलेल्या एका माणसाच्या सर्वश्रेष्ठ दिवसांत त्याच्या सगळ्यात जवळ यायचं भाग्य लाभलं होतं मला. सूर्योदयापास्नं सूर्यास्तापर्यंत मी होतो सूर्यसारथी ! नाही नाही, चुकलो. सूर्यसारथी नाही, सूर्यसाक्षी बनून होतो मी. मला तोफा–बंदुका चालवायला लागल्या

नाहीत. मी काही सैनिक नव्हतो. माझी हत्यारं अगदी फालतू होती. माझी रायफल होती माझं नोटबुक. अन् संगीन होती एक टोकदार पेन्सिल.

आझाद हिंद सेनेच्या सरसेनापतींच्या ह्या कॉन्फिडेन्शियल स्टेनोनं लढाई केली ती ह्या दोन हत्यारांच्या बळावरच.

सूर्य उगवला होता एकोणीसशे त्रेचाळीसच्या पंचवीस ऑगस्टला. ज्या दिवशी त्यांनी सरसेनापतीची सगळी सूत्रं आपल्या हातात घेतली. सिंगापुरात. पूर्व-आशियाचं सिंहद्वार असलेल्या ह्या सिंगापुरात.

नव्वद दिवसांत समुद्रांत बुडी मारून अर्ध्या पृथ्वीला प्रदक्षिणा घालून ते ह्या सिंहद्वारात येऊन ठेपले होते. दोनच महिन्यापूर्वीची गोष्ट ही. दोन जुलैला. तेव्हा पूर्व-आशियाच्या पूर्व क्षितिजावर गेल्या युगातला उजळ शुक्रतारा अजून आपल्या तेजानं लकाकत होता. म्हंजे रासविहारी बोस. सकाळच्या सूर्याला पहिलं वंदन करायचा मान तर ह्या शुक्रालाच असतो की !

त्या लांबलचक समुद्रसफरीतसुद्धा ह्या स्फोटक पदार्थाला खारट पाण्याचा थेंबदेखील लागला नव्हता. विझायला आलेल्या ज्योतीनं जेव्हा ह्या दारुगोळ्याला प्रेमानं आलिंगन दिलं, तेव्हा ही गोष्ट अगदी साफ झाली.

सूर्याचं मावळणंपण पाह्यलंय् मी. ह्या सिंगापुरातच. पंचेचाळीसच्या सोळा ऑगस्टला. ज्या दिवशी त्यांनी सिंगापूरच्या रहिवाशांचा अखेरचा निरोप घेतला.

ह्या दोन वर्षांतल्या घटना आज इतिहास होऊन गेल्यायत. सूर्यमंत्राच्या अनेक उपासकांनी ह्या दोन वर्षांची स्तुतिस्तोत्रं लिहून त्या मार्तंडदेवाची पूजा केलेली आहे. त्याच गोष्टी परत सांगायचं काही कारणच नाही. पण त्यांच्या गुप्त दप्तराची जबाबदारी माझ्यावर होती. माझी काय अशी लायकी ! पण ती जबाबदारी माझ्यावर होती. त्यामुळं अशा अनेक गोष्टी मला ठाऊक आहेत—ज्या आजदेखील जगाला ठाऊक नाहीत. ह्या गोष्टी म्हंजे काही ऐतिहासिक सत्य नाही. पण ह्या असल्याच गोष्टीतनं त्या अफलातून माणसाच्या स्वभावाचे विविध पैलू बघता येतील. माझ्याजवळ आहे एक साध्या काचेचा प्रिझम. आता पहा ह्याच्यातनं तुम्हाला चांगल्या माहीत असलेल्या सूर्याच्या रंगपटात काही नवीच छटा दिसते का ते.

शेवटच्या काही दिवसांची गोष्टच तेवढी लिहिणाराय् मी. शेवटच्या आठवड्याची सरती कथा. दहा ऑगस्टपास्नं सोळा ऑगस्टपर्यंतची. तरी मी काही चरित्रकार नाही. आठवणीच्या नादात कलम जर मूळ गोष्ट सोडून जरा इकडंतिकडं गेलं तर माफ करा मला. म्हंजे झालं.

रंगूनहून परत फिरायला सुरवात झाली होती चोवीस एप्रिलला. परतणाऱ्या त्या टोळक्यात मी पण होतो. पायीपायी आम्ही मौलमीनला पोचलो. तारीख होती पाच मे. वाटेत काय काय झालं ते सविस्तर लिहून ठेवलंय् बऱ्याच

जणांनी. ते नक्कीच तुम्हाला ठाऊक झालं असेल एव्हांना. नाही तर अय्यरजींचं Unto him a witness किंवा लेफ्टनंट थीबर्सची रोजनिशी वाचून टाका. पण वाटेत घडलेल्या ह्या सगळ्या घटनांच्या मागं ज्या घटना होत्या--तो इतिहास काही माहीत नसेल बहुतेक तुम्हाला.

सित्तांग नदीच्या तीरावर एक काळीज पिळवटून टाकणारा अपघात झाला होता—तो किस्सा ऐकलाच असेल तुम्ही. आझाद हिंद सेनेच्या एका सैनिकाच्या हातनं एक जपानी अधिकारी मारला गेला होता. ह्या जपानी अधिकाऱ्याला नेताजींच्याबद्दल फार आदर होता. तो मेला आमच्याच सैनिकाच्या संगिनीनं. ताबडतोब त्या सैनिकाची शस्त्रं काढून घेतली गेली. नेताजींच्याच आदेशानं. बरेचजण चिडले होते त्यावेळी. भारतीय मंत्र्याचा हा काय धसमुसळेपणा ! अशी अचानक संगीन चालवायची म्हंजे काय ! घोडचूकच ती ! नेताजींनी त्याच्याजवळची शस्त्र काढून घ्यायचा आदेश दिला, तेव्हा बऱ्याचजणांना वाटलं, की नेताजीपण चिडलेयत. अन् म्हणूनच त्यांनी आपल्या संत्र्याला निःशस्त्र करायचा हुकूम दिलाय्. पण माझ्या समजुतीप्रमाणं ते तसं नाही. नेताजींनी त्यांची शस्त्रं काढून घ्यायचा आदेश दिला तो चिडून नव्हे. त्यांना भीती होती, की विश्वंभर आत्महत्त्या करायचा एखादवेळेस. म्हणून त्यांनी त्याला निःशस्त्र करून टाकलं.

हा विश्वंभरदास पांडे रँकनं सेकंड लेफ्टनंट होता. बहादूर ग्रुपच्या सिक्युरिटी युनिटमधे. नेताजींच्या वैय्यक्तिक सुरक्षिततेसाठी पहाऱ्याची जी व्यवस्था होती, तिची सगळी सूत्रं विश्वंभर पांडेकडे होती. अत्यंत शांत स्वभावाचा आस्तिक गृहस्थ होता हा विश्वंभर. निष्ठावान् ब्राह्मण. रोज पहाटे सूर्याला अर्घ्य द्यायचा. त्याच्या 'पिठू'मधे तुलसी-रामायण होतं. मलाया-ब्रह्मदेशच्या जंगला-डोंगरावर जिथं म्हणून विश्वंभर फिरला तिथं त्यानं तुलसीदासजींना वाहून नेलं होतं. जेव्हा ड्यूटी नसायची तेव्हा तो रामायण म्हणत असायचा. सुरावर.

पांडे राहणारा मुजफ्फरपूरचा.' जोरूगोरू' सगळं तिकडे. आज तीन वर्षं पांडेला त्यांची काही बातमी नव्हती.

तो मलायात आला होता भारतीय सैन्याबरोबर. सापडला जपान्यांच्या हाती. युद्धबंदी म्हणून अडकून पडला निशूनच्या कँपमधे. ही अगदी सुरुवातीची गोष्ट. मग सामील झाला आझाद हिंद सेनेत.

तसा चांगला सरळ धर्मनिष्ठ इसम. सगळं ठीकठाक.

पण एक दिवस काय झालं. विश्वंभर भलताच बेचैन दिसायला लागला.

ही जवळजवळ वर्षभरापूर्वीची गोष्ट. विश्वंभरचा एक मित्र होता महावीरप्रसाद म्हणून. त्याला विश्वंभरनं बाजूला घेतलं. सांगितलं, की आपल्याला एक खबर मिळालीय्. काही ब्रिटिश गुप्तहेरांनी कट केलाय् नेताजींना मारून

टाकायचा.

महावीर पडला एकदम प्रॅक्टिकल माणूस. त्यानं ताबडतोब विश्वंभरला नेऊन उभं केलं बहादूर ग्रुपच्या सिक्युरिटी कमांडरसमोर. सगळ्या गोष्टी उघड सांगितल्या त्यानं. कमांडरला कुतूहल वाटलं. त्यानं एकटचा विश्वंभरला बाजूला नेलं.

विचारलं--काय बातमी मिळालीय् तुला ? कुठनं मिळाली ही बातमी ?

--मारेकऱ्यांची टोळी नेताजींचा खून करायला येणाराय् !

--वरं. पण कशी कळली ही बातमी तुला ? कोण म्हणालं ?

--महावीरजी !

कमांडर दचकलाच. ताबडतोब त्यानं महावीर प्रसादला बोलवून घेतलं.

त्याला चांगलंच दरडावलं--तू म्हणतोयस विश्वंभरला खबर मिळालीय्. अन् हा विश्वंभर म्हणतोय् महावीर प्रसादला खबर मिळालीय्. काय आहे काय प्रकार ! खरं काय ते सांग !

विश्वंभरनं दोन्ही हात जोडले. म्हणाला--गुस्ताकी माफ करा हुजूर. मी ह्या महावीर प्रसादबद्दल नाही बोललो. महावीर म्हंजे श्रीरामजींचे सेवक महावीर बजरंगवली. म्हंजे हनुमानजी !

कमांडर पंजाबी होता. शीख. पण रामदास हनुमानजी त्याला ठाऊक होते. आत्तापर्यंत त्यांचा चेहरा गंभीर होता, तो आता ढिला पडला.

विश्वंभरचे हात जोडलेलेच होते. तो म्हणाला-- काल रात्री महावीरजींनी स्वप्नात दर्शन दिलं. म्हणाले, इग्लंडचे दुष्मन नेताजींचा खून करायला मारेकरी पाठवतायत.

सरदारजींनी काही बोलणं आणखी वाढवलं नाही. दोघांनाही जायला सांगितलं.

पण त्यांच्यात झालेलं बोलणं काही गुप्त राह्यलं नाही. कॅंपमधले सगळेच विश्वंभरच्या मागं लागले. सगळेच त्याला विचारायला लागले--काय, बजरंगवलींचं लेटेस्ट वॉर बुलेटिन काय आहे ?

देवाबद्दल लोक अशी टिंल करतायत हे पाहून विश्वंभरला भारी वाईट वाटलं. नर्व्हस झाला बिचारा.

विश्वंभरला वाटणारी भीति कुणीच मनावर घेतली नाही. अन् घेणार तरी कशी काय ! कारण त्यावेळी सबंध जपान, चीन, मलाया, सयाम, थायलंड, ब्रह्मदेशात नेताजींचं नुकसान करायला टपलेला एक तरी माणूस शोधून काढता आला असता का ? ज्यांच्या दर्शनानं करोडो माणसं आनंदानं स्वतःला विसरून जात होती, लाखो माणसं मृत्यूची भीतीपण विसरत होती, ज्यांच्या गळ्यातला फुलांचा हार सात लाख रुपयांना विकत घेऊन लखपति रस्त्यावरचा भिकारी बनून जात होता--त्यांना कुणी शत्रु ?

सगळेच हसत होते.

पण तसं जास्तीदिवस हसत राहता आलं नाही त्यांना.

विश्वंभरला ज्या रात्री स्वप्न पडलं होतं, त्याच्यानंतर सातेक दिवसानंतरची

गोष्ट. तारीखपण लक्षात आहे माझ्या—बावीस फेब्रुवारी.

नेताजींचं हेडक्वार्टर्स तेव्हा रंगूनला होतं. एका दुमजली इमारतीत वरच्या मजल्यावरची एक खोली नेताजींची. माझी खोलीपण दुसऱ्या मजल्यावरच. बंगलावजा लाकडाचं घर होतं. घराच्या-समोर मोठी सुंदर बाग होती. फाटका-पास्नं सरळ एक वाट येऊन थांबली होती पोर्टिकोत. सिक्युरिटी-स्क्वाडचं ठाणं खालच्याच मजल्यावर होतं. पंच-वीसेक संत्री आळीपाळीनं पहारा करायचे. नेताजींच्या सुरक्षिततेकरता इतका बंदोबस्त ठेवायची खरंच काही जरूर आहे असं कुणालाच वाटत नव्हतं. कारण नेताजी म्हंजे सबंध पूर्व-आशियाचे त्यावेळचे अनभिषिक्त राजेच होते. तरी लष्करी नियमानुसार रीतसर पहाऱ्याचा बंदोबस्त होता. सेकंड-लेफ्टनंट विश्वं-भरदास पांडे ह्या पहारेकऱ्यांच्या तुकडीचा नायक होता. स्क्वाड्रन-लीडर.

तर बावीस फेब्रुवारी. रात्रीची साडे-दहा-अकराची वेळ. मी आपला माझ्या खोलीत काही महत्त्वाची पत्रं टाइप करत बसलो होतो. एवढ्यात नेताजींचा टेबल-बॉय काली आला. म्हणाला—सर, लगेच त्या खोलीत चला. नेताजी कसं-तरीच करतायत !

ताडकन् उठून उभा राह्यलो मी. म्हणालो—कसंतरीच करतायत म्हंजे ?

—काहीतरी वाईट बातमी आलीय् वाटतं. ते . ते रडतायत !

—रडतायत ?

वाट्टेल तेवढी वाईट बातमीदेखील प्रचंड धीरानं ऐकतांना पाह्यलंय् मी नेताजींना. शिवाय काहीही वाईट बातमी आली असती तर मला ती नक्कीच कळली असती. सगळी पत्रंवित्रं माझ्याच हाती त्यांच्याकडे जातात. अगदी गुप्त लष्करी पत्रंदेखील. अन् बिनलष्करी पत्रंपण. पण अशी काही हृदयविदारक बातमी आल्याचा मला तर अजिबातच पत्ता नव्हता.

तावडतोब कालीच्यामागोमाग मी नेताजींच्या खोलीकडे गेलो.

पडद्याच्या बाहेरनं विचारलं—May I come in Sir ?

ये म्हणाले.

हलक्या हातानं पडदा बाजूला सारून आत गेलो.

बघितलं तर ते एका सोफ्यावर गप्प बसून होते. चेहरा त्यांनी दोन्ही हातांनी झाकून घेतला होता. जवळच टीपॉयवर कॉफीचा एक कप. कॉफी थंड होऊन गेलेली. वर साय जमलेली. टेबलावर एक छोटासा शॉर्टवेव्ह रेडिओसेट.

मी आत जाताच त्यांनी मान वर केली. सबंध चेहऱ्यावर दुःखाची कळा पसरलेली.

—काही वाईट बातमी आली का सर ?

—हो भासी. आई वारली आज !

मी थक्कच झालो. आई ? नेताजींची आई ?

त्यांना तर जाऊन बरेच दिवस झाले होते. मग ? देशबंधु चित्तरंजन दासांच्या बायकोला—वासंतीदेवींना—ते आई म्हणायचे. म्हंजे त्याच गेल्या का काय ?

—बापाचं न् मुलाचं जेव्हा भांडण होतं तेव्हा सगळ्यात पंचाईत होते ती घरातल्या बाईची. एकीकडे नवरा, एकीकडे मुलगा. कुणाला सोडणार ती ?

हे सगळं निव्वळ स्वगत. हे काही ते मला सांगत नव्हते.

एकदम शुद्धीवर आल्यासारखं झालं नेताजींना. त्यांच्या ध्यानात आलं, की मला ह्यातलं काहीच कळत नाहीय्.

त्यांनी रेडिओकडे बोट दाखवलं. म्हणाले—कस्तुरबा वारल्या आज! ब्रिटिशांच्या तुरुंगात!

काय बोलावं काही सुचेना मला. गप्पच उभा राह्यलो. नेताजीपण गप्प. किती गोष्टी आठवत असतील त्यांना! मला पण आठवत होत्याच की. गांधीजींच्या गोष्टी. कस्तुरबांच्या गोष्टी.

एवढ्यात खालनं काहीतरी गडबड कानावर आली. — पकडो! पकडो!

नेताजी दचकून भानावर आले. त्यांनी विचारलं — काय झालं?

मी म्हणालो — तुम्ही बसा. मी बघून येतो.

जिन्यावरनं खाली आल्याआल्या दिसलं — लँडिंगच्या खालीच तीनचार शिपायांची धक्काबुक्की चाललीय्. काही सेकंदच फक्त गेले असतील. एका इसमाला जवानांनी काबूत आणलं.

काय झालं म्हणून मी विचारलं.

सेकंड लेफ्टनंट विश्वंभर पांडे पुढं झाला. जिन्याच्या खाली अटेन्शनच्या पवित्र्यात उभा राह्यला. बुटाच्या नालांचा खट्कन् आवाज झाला. विश्वंभरनं मला सॅल्यूट ठोकला होता. खरं म्हंजे मी काही लष्करी माणूस नाही. अन विश्वंभर काही लान्सनायक नाही, हवालदार नाही की सब ऑफिसर नाही. चक्क सेकंड लेफ्टनंट आहे तो. मग असा फौजी सॅल्यूट मला काय म्हणून करतोय् हा?

पण दुसऱ्याच क्षणी माझा भ्रम नाहीसा झाला. मी उभा होतो जिन्याच्या तिसऱ्या का चवथ्या पायरीवर. अन् विश्वंभर काही माझ्याकडे पहात नव्हता. माझ्या डोक्यावरनं तो लँडिंगकडे बघत होता स्थिर नजरेनं. मी झटदिशी मागं वळलो तर लँडिंगवर स्वत: नेताजी उभे!

म्हंजे ते माझ्यामागोमागच आले होते.

नंतर विश्वंभरनं थोडक्यात प्रकार सांगितला.

रात्रीचे अकरा म्हंजे ड्यूटी बदलायची वेळ. पण सातेक दिवसामागं स्वप्न पडल्यापासनं मी आपला रात्रंदिवस ह्या जिन्याखालीच बसून असायचा. मग ड्यूटी असू दे नाहीतर नसू दे.

ड्यूटी बदलायच्या वेळेला नवे संत्री आले. त्यांच्यात एक चेहरा काही मला ओळखू येईना. नीट बघावं म्हणून गेलो तर तो सांपडेचना. म्हणून मग मी सगळ्यांना फॉल-इन केलं. म्हजे जे ड्यूटीवरनं चालले होते त्यांना न् जे ड्यूटीवर आले होते त्यांना पण. दरवान, माळी, नोकरचाकर सगळेच्या सगळे! सगळ्यांना उभं करून मी हजेरी घेतली. एकजण जास्ती आला गिन्तीत.

माझा संशय आणखीच बळावला.

एक-एक माणूस तपासत गेलो. नाव न् कार्ड.

ह्या पोराजवळ आलो न् काय सांगू हुजूर, त्यानं अचानक खिशातनं रिव्हॉ-

ल्वर काढलं. माझ्या हातात बंदूक होती. पण ती रोखायच्या आत त्यानं रिव्हॉल्वर माझ्या छातीवर रोखलं.

रामखिलावन शेजारीच होता. फ्री-स्टाइल कुस्तीतला आपला चँपियन! त्यानं असा काही पेच मारला. घोडा दाबायची फुरसत काहीं मिळाली नाही त्याला.

मग आम्ही सगळ्यांनी मिळून पकडलं त्याला.

तो माणूस मान खाली घालून उभा होता. अगदी पोरवयाचा. म्हंजे किशोर म्हणता येईल असा. ओठ कोपऱ्यात फाटला होता. त्यातनं रक्त गळत होतं. दोन्हीकडनं दोघाजणांनी त्याचे दोन्ही हात मागं पिळून धरले होते. रामखिलावन त्याचा बेल्ट पकडून होता मागनं.

पोरगा मलायी किंवा ब्रह्मी असल्यासारखा दिसत होता. निदान भारतीय नक्कीच नव्हता. चेहरा मंगोली होता. छोटेसे डोळे. वर आलेली गालफडं. अंगावर कपडे मात्र आझाद हिंद सेनेच्या सैनिकाचे. पण हा काही आमच्यापैकी नव्हता हे पक्कं.

विश्वंभरचं सांगून संपल्यावर काही क्षण गप्पच गेले. मग नेताजीच पहिल्यांदा बोलले

—त्याची तलाशी घेतल्यायस ?

—जी हाँ !

—रिव्हॉल्वरखेरीज आणखी काही शस्त्र होतं त्याच्याजवळ ?

विश्वंभरनं एक ·२२ रिव्हॉल्वर न् एक सुरा दाखवला. नेताजींनी रिव्हॉल्वरचा मेक बघितला अन् ते परत विश्वंभरच्या हातात दिलं.

मग म्हणाले——ह्याला बरोबर घेऊन य.

असं म्हणून नेताजी आपल्या खोलीकडे चालले.

तिघंजण त्या पोराला धरून आमच्या मागोमाग आले.

नेताजी आपल्या खुर्चीवर बसले न् तीन जवान त्या पोराला घेऊन उभे राह्यले.

—ह्याला राहू दे. तुम्ही जा.

आश्चर्यानं थक्कच झालो मी. अन् विश्वंभरपण.

——लेकिन सर——

नेताजी हंसले.

स्वतःच्या कमरेचं रिव्हॉल्वर टेबलावरल्या काचेवर ठेवून म्हणाले——का बरं विश्वंभर ? तुझ्या नेताजींनी कुठल्या लष्करी शाळेत टार्गेट प्रॅक्टिस केली नाही कधी म्हणून ?

विश्वंभरनं जीभ चावली. सॅल्यूट केला.

पण हुकमाची अंमलबजावणी करावीच लागली. आम्ही खोलीतनं बाहेर आलो.

पंधराएक मिनटं वाट पाह्यली बाहेर. सारखं–सारखं घड्याळ बघत होतो त्यामुळं वेळ लक्षात आहे. पंधरा मिनटं. नाहीतर त्या स्तब्ध रात्री कॉरिडॉरमधे वाट बघत राह्यलेल्या आम्हाला तो वेळ म्हंजे काय प्रचंड वाटत होता !

विश्वंभर मात्र गप्प नव्हता. एवढ्यातच त्यानं अत्यंत वेगानं इमारतीच्या प्रत्येक दारावर, बाहेर पडायच्या प्रत्येक

वाटेवर सशस्त्र पहारेकरी नेमून टाकले होते. त्यांना हुकूम दिला होता, की ह्या पोरानं पळायचा प्रयत्न केला तर बेधडक गोळी घाला.

रायफल हातात घेऊन प्रत्येक कोपऱ्यात पहारेकरी सज्ज राह्यले.

पण काहीच झालं नाही.

नेताजींच्या खोलीतनं घंटा वाजली.

आम्ही आत जाऊन बघितलं. तो पोरगा दोन्ही हातांनी तोंड झाकून कार्पेटवर बसला होता.

—ह्याला घेऊन जा. लॉकपमधे ठेवा आजची रात्र. उद्या सकाळी बघू या.

पहारेकरी पुढं आल्याआल्या तो पोरगा एकदम् उठून उभा राह्यला. तीनचार जणांनी धरून ठेवलं त्याला. तरी त्यातदेखील दोन्ही हात पसरून त्यानं छाती पुढं काढली. टेबल-लँपच्या लखलखीत उजेडात पाहृचलं, तर त्याच्या डोळयात पाणी.

स्वच्छ हिंदुस्थानीत म्हणाला—मला गोळी घालायचा हुकूम द्या नेताजी! मला न्याय नकोय्!

नेताजींनी इशारा केला.

त्याला घेऊन पहारेकरी निघून गेले.

त्या पंधरा मिन्टात नेताजींच्या खोलीत सगळयांच्या नजरेआड काय नाटक घडून आलं होतं ते काही मला माहीत नाही. पण एका वस्तूनं माझी नजर खेचून घेतली. त्याला घेऊन गेल्यावर नेताजींनी टेबलावरनं डेट्टॉलची एक लहानशी बाटली उचलली न् ती ते लगतच्या बाथरूममधे ठेवून आले. खोलीत डेट्टॉलचा तिखट वास तेव्हादेखील येत होता.

—त्याची प्रार्थना काही असफल व्हायची नाही, ना? मृत्यूचीच सजा होईल त्याला!

मलूल हसले होते नेताजी माझ्या त्या बोलण्यावर.

मग त्यांनी मला विचारलं होतं—शहीद हरिकिशनचं नाव ऐकलंय्स का तू भासी?

—नाही सर.

—मला ज्यानं भारताच्या सरहद्दीच्या पलीकडे पोचवलं होतं ना, त्या भरतरामचा तो दादा. लाहोर विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी पंजावचा कुख्यात गव्हर्नर मोरेन्सीला त्यानं गोळी घातली होती. फाशीची सजा झाली होती त्याला. त्या सजेविरुद्ध गव्हर्नर-जनरलकडे दयेचा अर्ज करायला काही तयार झाला नाही हरिकिशन!

—पण मोरेन्सी तर कुख्यात होता असं तुम्हीच तर म्हणालात! म्हंजे हरिकिशन शहीद झाला, नाही का?

नेताजी परत एकदा हसले. म्हणाले —भासी, तुझं काय आहे, तुला तत्त्वज्ञान येत नाही की गणितपण येत नाही. आता तुला मी आइनस्टाइनची रिलेटिव्हिटी कशीकाय समजावून देऊ? तुझ्यामाझ्या दृष्टीनं हरिकिसन शहीद, मोरेन्सी अत्याचारी, पण एका साध्यासुध्या ब्रिटिश नागरिकाच्या दृष्टीने मोरेन्सी शहीद अन् हरिकिशन मारेकरी ठरतो. हो का नाही?

नेताजी मला असं बोलले तरी मी

उलट खूषच झालो. म्हटलं, चला, नेताजी परत नॉर्मलवर आले.

कारण कस्तुरबा गेल्याची बातमी ऐकून ते इतकं मरगळून गेले होते, की मी चांगलाच घाबरून गेलो होतो. परत दुसऱ्या दिवशी चिकार कामं होती. म्हंजे नेताजींचं चित्त इकडंतिकडं राहून चालण्याजोगं नव्हतं.

--ह्या ब्रम्ही पोराचं वय माहित आहे तुला? एकोणीस! शिकलेला नाही फारसा, पण अगदी पोलाद आहे पोलाद! कुणा जाणकाराचा हात लागला असता तर लखलखीत तलवार झाली असती त्याची! पण तो लागला ब्रिटिश गुप्तहेरांच्या हाती. त्यामुळं बिचारा मारेकरी बनला!

--त्यानं सगळं कबूल केलं हे?

--हो. त्याला खोटंनाटं सांगून त्याची दिशाभूल केली होती त्यांनी. त्याला वाटत होतं, आझाद हिंद सेना ब्रह्मदेश जिंकायला आलीय्. ब्रह्मदेश पादाक्रांत करायला. त्याच्या दृष्टीनं नेताजी म्हंजे एक अत्याचारी दिग्विजयी!

मी चाटच पडलो.

--म्हंजे तुम्ही काय त्याला बेकसूर सोडून द्यायचं म्हणताय्?

--परत चुकलास तू भासी. माझा दृष्टिकोन अन् आपल्या लष्करी अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन सारखाच असेल असं का म्हणून धरून चाललाय्स तू? विस्तवाला हात लावला, की हात भाजणारच. आपण सगळेच लष्करी कायदा पाळायला बांधलेलो आहोत. हा, एक गोष्ट मी खात्रीपूर्वक सांगू शकतो--आता त्याला जरी सोडून दिलं तरी परत तुमच्या नेताजींचं नुकसान करायला तो काही यायचा नाही.

तुम्हाला मी आधीच सांगून टाकलंय्, की नेताजींच्या खोलीत पंधरा मिनिटं काय चाललं होतं हे काही मला माहीत नाही. पण नेताजी हे जे शेवटी म्हणाले, त्याच्यावर माझा शंभर टक्के विश्वास आहे. त्यांच्यासमोर आल्यावर त्या ब्रह्मी तरुणाचं हृदय पालटायला पंधरा मिनटं म्हंजे पुरेसा वेळ झाला!

जरा चाचरतच मी विचारलं--ह्या पोराचा जीव वाचावा अशी शिफारस करणार आहात का तुम्ही?

नेताजी परत मलूल हंसले. म्हणाले--आजच संध्याकाळी ऑल इंडिया रेडिओनं काय घोषणा केली, ती विसरून गेलास तू भासी. दाताच्या बदली दात, डोळ्याच्या बदली डोळा घ्यायची का ही वेळ आहे?

हा प्रसंग घडून गेल्यावर विश्वंभरच्या डोक्यात मात्र चक्क वारंच शिरलं.

सगळेच त्याच्यामागं लागायचे. म्हणायचे, बरं झालं हं, तुला आधीच महावीरजींनी सावध केलं होतं म्हणून! नाहीतर काय झालं असतं बघ ना!

ते थट्टा करायचे. पण त्या सरळ साध्याभोळ्या ब्राह्मणाला खरंच वाटायचं ते. अन् तो अंतराळातल्या महावीरजींना नमस्कार करायचा हात जोडून.

नंतर आठवडा झाला असेल नसेल. विश्वंभर माझ्याकडे येऊन म्हणाला--

…त गोष्ट सांगायचीय् एक.

मी त्याला बसायला सांगितलं. म्हटलं—बोला !

विश्वंभरनं एकदा चारी बाजूला बघून घेतलं. मग खुर्ची पुढं सरकवली. अन् कानात बोलत असल्यासारखा हलक्या आवाजात म्हणाला—भास्करन-साब, मी सांगून ह्या लोकांचा काही विश्वास बसत नाही. ते थट्टा करतात माझी. पण तुम्हांला गुपचुप सांगतो—ते परत येतायत !

त्याच्या डोक्यातल्या वाऱ्याची गोष्ट माझ्या कानावर आली होती. त्यामुळं त्याला दुखवावंसं वाटेना मला. म्हणून खोटाच भीतीचा भाव आणला मी चेहऱ्यावर.

असं ? परत स्वप्न पाह्यलं का ?

—जी हाँ ! फिर महावीरजी !

दोन्ही हात जोडून विश्वंभरनं कपाळाला टेकवले.

—काय म्हणले ते ?

—आणखी काय म्हणणार ! कोपलेत ते. म्हणाले, तुझी थट्टा करतात ना, त्यांना सांगा, की संकट अजून टळलेलं नाही. ते परत येतायत. सात रात्रींच्या आत !

मी हंसू आवरून म्हणालो—भलतंच काळजीत टाकलंत हो तुम्ही !

विश्वंभरला चांगलंच टक्कल होतं. अकाली म्हातारा होऊन गेला होता तो. त्यानं टकलावरनं हात फिरवला. मागं शेंडीला कण्हेरीचं फूल बांधलेलं होतं. वाऱ्यानं डोलत होतं ते.

विश्वंभर मला म्हणाला—तुम्ही नेताजींना सांगा. म्हणावं हा आठवडाभर घराच्या बाहेर पडू नका.

माझ्या पोटातल्या-पोटात हंसण्याचं कारंजं उडायला लागलं. ते कसंबसं दाबून ठेवत मी म्हणालो—बघू या काही करता येतं का. नेताजी थोडेच ऐकणारायत ! परवाच तर त्यांना बँकॉकला जायचंय्.

विश्वंभर काकुळतीला आला.

—सात दिवसांनी काय होतंय् ! तुम्ही नेताजींना सांगा सगळं सविस्तर. महावीरजींची आज्ञा ते नक्कीच ऐकतील !

मान हलवत मी म्हणालो—बघू या.

हे सगळं खरं म्हंजे मी विसरूनच गेलो असतो. पण एक अजब गोष्ट घडली न् सगळं ध्यानात राह्यलं.

खरंच ह्या एकाच आठवड्यात परत एकदा नेताजींच्यावर हल्ला झाला मारेकऱ्याचा. कावळा न् ढापीचा न्याय आहे की नाही ?

रात्रीची आठ-साडेआठची वेळ असेल. नेताजी घरातच होते. एक प्रचंड काळी जपानी मेकची गाडी येऊन थांबली पोर्टिकोत. गाडीत फक्त तिघंजण होते. स्टिअरिंगवर ड्रायव्हर न् मागं दोघं.

ग्रे रंगाचा सूट घातलेला एक म्हातारा इसम गाडीतनं खाली उतरला. डोक्याला टक्कल. डाव्या हातात काठी. डोळ्यांवर चष्मा. अन् एक हात कोटाच्या खिशात.

दुसरा इसम गाडीतच बसून राह्यला.

ड्रायव्हरपण स्टिअरिंग धरून दगडी पुतळ्यासारखा.

गाडीचा स्विचपण ऑफ केला नव्हता त्यानं. गाडी स्टार्टमधेच होती.

सावकाश काठी टेकत-टेकत तो म्हातारा गृहस्थ पायऱ्यांकडे आला. दारावरचा पहारेकरी कुतुहलानं पुढं आला. म्हाताऱ्यानं मान वर करून एकदा त्याच्याकडे पाह्यलं न् विचारलं–सुभाष आहे का घरी ?

पहारेकरी दचकलाच. आख्ख्या पूर्व-आशियात नेताजींना नावानं हाक मारणारं कुणी असेल असं त्याला कधी स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं.

त-त-प-प करत तो म्हणाला, हो आहेत. त्यांना काय सांगू ? कोण आलंय् म्हणून सांगू ?

––सांग रासबिहारी बोस आलेयत म्हणून.

संत्र्यानं लगोलग सॅल्यूट केला.

हे नाव काही त्याला अनोळखी नव्हतं. त्यानं काही क्रांतिकारक रास-बिहारीबाबूंना प्रत्यक्ष बघितलं नव्हतं कधी. पण त्यांचा फोटो बघितला होता.

आत्ता कुठं त्याच्या एकदम ध्यानात आलं––अरेच्या ! खरंच की ! तसाच चेहरा आहे की ! आधीच लक्षात यायला हवं होतं आपल्या.

तळमजल्यावरच खोलीतल्या सोफ्या-कडे हात करत तो म्हणाला––बसा आपण. मी खबर देतो.

त्या म्हाताऱ्या गृहस्थानं एकदा घड्याळ पाह्यलं.

भलतेच घाईत होते वाटतं ते. संत्र्याचं आमंत्रण काही त्यांनी स्वीकारलं नाही. उलट ते गाडीकडेच परत गेले. गाडीचं दार उघडून एक पाऊल पाय-दानावर ठेवत ते म्हणाले––लौकर खबर दे !

मुख्य दरवाजा तसाच सोडून पहारे-करी तत्काळ धावतच आत गेला.

त्यानं मागं वळून बघितलं असतं तर त्याला दिसलं असतं, गाडीतला दुसरा इसम––लाललाल रंगाचा इसम––एवढ्यात गाडीतनं उतरून लपून उभा आहे एका खांबाआड. अन् म्हातारा गृहस्थ उघड्या दाराच्या हँडलवर हात ठेवून उभा आहे.

जिन्याच्या तोंडाशीच संत्र्याची गाठ पडली विश्वंभर पांडेशी.

त्याची काही ड्यूटी नव्हती तेव्हा. पण ड्यूटी असू दे नाहीतर नसू दे, हातात रायफल घेऊन तो घरभर फिरत असायचा सारखा.

विश्वंभरनं त्याला हटकलं––पळायला काय झालं एवढं ?

––नेताजींना खबर द्यायला जातोय्. प्रत्यक्ष रासबिहारी बोस आलेयत !

रासबिहारी बोस ! सेनसाइजी !

विश्वंभर दचकलाच. त्यांच्या स्वागतात काही उणीव तर राहूचली नाही ना ?

विश्वंभर अगदी सुरुवातीच्याच काळात आझाद हिंद सेनेत सामील झालेला. जनरल मोहनसिंगच्या काळात. क्रांतिकारक रासबिहारी बोसांना त्यानं खूपदा पाहूचलेलं होतं.

तो धावतच बाहेर आला.

न् पहिल्याप्रथम त्याला दिसली ती काळी गाडी. अन् पायदानावर पाय

ठेवून उभा असलेला तो म्हातारा गृहस्थ.

हो ! रासबिहारी बोसच !

पण जवळ आल्यावर—नाही ! हे ते नाहीत !

त्यानं विचारलं—नेताजींना कुणाला भेटायचंय् ?

म्हातारा गृहस्थ गंभीरपणानं म्हणाला —मला !

—आपका नाम ?

—रासबिहारी बोस !

पटकन् त्या म्हाताऱ्याचा हात धरला विश्वंभरनं.

म्हणाला—झूट बात !

इकडे पहारेकऱ्यानं वर जाऊन नेताजींना खबर दिल्यावर नेताजीपण चक्क दचकलेच.

म्हणाले—सेनसाइजी ? ते कसं शक्य आहे ? आत्ता तासाभराआधीच तर ते टोकिओ रेडिओ स्टेशनवर बोलत होते! चल चल, बघू या तरी—

होते तसेच खाली आले ते. मागोमाग तो पहारेकरी.

जिन्यावर असतानाच त्यांना फायरिंगचा आवाज ऐकू आला ! रिव्हॉल्वरचा आवाज ! मुख्य दरवाजाकडनं !

दोघंही दचकले.

मागनं संत्री ओरडला—मत आइये साब !

पण त्या खबरदारीच्या इशाऱ्याकडे अजिबात लक्ष न देता नेताजी समोर धावले. मुख्य दरवाजाच्या जवळपास आल्यावर परत दुसरा फायरिंगचा आवाज ! हृया खेपेला रायफलचा !

उघड्या दरवाजातनं त्यांना दिसलं —एक काळी गाडी विजेच्या वेगानं गेटमधनं बाहेर जातेय्. गेटवरच्या दिव्याच्या उजेडात दिसलं—गाडीची मागची व्ह्यू-फाइंडर काच फुटलेली.

पायरीवर विश्वंभर उभा. त्याच्या रायफलच्या नळीतनं अजून धूर येतोय् !

—काय झालं विश्वंभर ?

विश्वंभरनं सॅल्यूट केला.

खेदानं म्हणाला—टायरवर नेम धरून गोळी मारली. कांचेला लागली !

निव्वळ योगायोगानं विश्वंभर तेव्हा तिथं हजर झाला म्हणूनच ह्या खेपेला नेताजी वाचले. नाहीतर मारेकऱ्यांनी ह्या वेळेला जाळं नीट टाकलं होतं.

त्यांनी बरोब्बर हेरलं होतं, की सेनसाईजींचं नाव कानावर पडलं म्हंजे आमची खबरदारी जरा ढिली पडेल.

पण हा इसम म्हंजे काही रासबिहारी बोस नव्हेत हे विश्वंभरच्या ध्यानात यायला काही वेळ लागला नव्हता.

विश्वंभरनं त्या म्हाताऱ्याचा हात पकडला तशी लगेच खांबाच्या आडनं कुणीतरी रिव्हॉल्वर झाडलं. विश्वंभरचं नशीब थोर म्हणून ती गोळी त्याला लागलीबिगली नाही.

म्हाताऱ्याला सोडून देऊन लागलीच त्यानं रायफल रोखली. पण त्याच्या आधीच ड्रायव्हरनं त्याला मागनं येऊन ढकललं न् विश्वंभर पडला.

तो उठून उभा राह्यला तर त्याला दिसलं, की गाडी निघून जातेय्.

त्यानं गाडी रोखायचा प्रयत्न केला. गोळी झाडून. पण गोळी टायरला लागलीच नाही. मागच्या काचेला लागली.

नंतर सगळी गोष्ट मी नेताजींना सविस्तर सांगितली. म्हंजे विश्वंभरच्या स्वप्नासकट सगळं. नेताजींनी धीरानं सबंध गोष्ट ऐकली.

मग विश्वंभरला बोलवून घेतलं.

मोठ्या आदरानं लष्करी सॅल्यूट ठोकून सेकंड लेफ्टनंट विश्वंभरदास पांडे उभा राह्यला नेताजींच्यासमोर.

--तुला एक विनंती आहे माझी पांडे! पण नाही मात्र म्हणू नकोस. बोल. हो?

तो साधासरळ ब्राह्मण आ वासून बघतच राह्यला. त्याला शरमेनं मेल्या-सारखं झालं.

नेताजींनी काहीही हुकूम सोडावा तर आपण मृत्यूच्या मुखात पण उडी घेऊ. अन् तेच नेताजी आज आपल्याला विनंती करतायत! आझाद हिंद सेनेचे सरसेनापती, आझाद हिंद सरकारचे राष्ट्रपती आज विनंती करतायत मुजफ्फरपूरच्या अत्यंत सामान्य रहि-वाशाला--ह्या विश्वंभर पांडेला! हाय रामजी! हाय बजरंगबली! अशी गोष्ट कानानं ऐकणंपण पाप आहे!

विश्वंभरनं दोन्ही हात कानांवर ठेवले.

म्हणाला--हुकूम फर्माइये साब!

त्याचा तो दोन्ही हातांनी कान झाकून हुकूम ऐकायचा पवित्रा बघून-देखील नेताजी हसले नाहीत.

म्हणाले--नाही नाही, हुकूम नाही. एक विनंती आहे माझी!

खिशात हात घालून त्यांनी काही ब्रह्मी नोटा काढल्या.

हात विश्वंभरपुढं धरून म्हणाले--माझी सध्या शनीची दशा चालल्याय्. तू माझ्या नावानं महावीरजींची पूजा बांध. अन् प्रसाद आणून दे मला.

सेकंड लेफ्टनंट विश्वंभर पांडे आता लष्करी सलाम करायला विसरला. त्याचे दोन्ही हात कानांवरनं खाली आले. कपाळावर हात जोडून त्यानं नमस्कार केला. महावीरजींना का नेताजींना, ते काही कळलं नाही. मग दोन्ही हातांत त्यांनी पूजेकरता ते पैसे घेतले.

पांडे निघून गेल्यावर माझी चुळबूळ सुरू झाली. नेताजींना प्रश्न केल्यावाचून मला राहवलं नाही.

--सर, तुमचा ह्या असल्या गोष्टींच्यावर विश्वास आहे?

नेताजी हसले.

म्हणाले--ह्या लोकांचा धर्मावर जो विश्वास आहे, त्याच्याबद्दल मला श्रद्धा आहे. भारतवर्ष ह्या धर्म-विश्वासावरच टिकून आहे.

तर असा हा विश्वंभर पांडे!

सितांगच्या छावणीत जो अपघात झाला, त्याच्यात त्या बिचाऱ्याची काहीच चूक नव्हती. त्यानं 'हुकमदार' म्हणून केलेल्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून तो जपानी अधिकारी तसाच पुढं आला, तेव्हा विश्वंभरच्या डोक्यात कदाचित् आधीचे हे मारेकरी आले असतील. आदल्या दिवशी स्वप्नात त्याला बजरंगबलींनी परत दर्शन दिलं होतं का काय कुणास ठाऊक! त्याला अटक झाल्यावर त्याच्याशी बोलण्याइतकी फुरसत काही मिळाली नाही मला.

पण एक गोष्ट मला ठाऊक आहे, की नेताजींनी त्याची शस्त्रं काढून घ्यायचा जो हुकूम केला तो एवढ्याच-साठी, की नाहीतर ह्या स्वामिभक्त पश्चात्तापदग्ध ब्राह्मणानं आत्महत्याच करून टाकली असती बहुतेक.

[ पुढील अंकात चालू ]

## सत्यनारायण पूजा : बंदी हवी

[ पृष्ठ ७ वरून ]

सत्यनारायण पूजा करीत बसला होता. त्याच मार्गावरून कोणी एक मोळीविक्या चालला होता. त्याला त्या ब्राह्मणाने सांगितले, या व्रतापासून मनुष्याची पाहिजे ती इच्छा पूर्ण होते. मोळीविक्याने सत्यनारायणपूजेचा संकल्प केल्याबरोबर त्याच्या मोळीचे मोल नित्यापेक्षा दुप्पट झाले.

'वेडा जॉर्ज फर्नांडिस, मुंबईत बोनससाठी उगा संप करीत बसला. सत्यनारायणाचा वायदा केला असता तर!'

२. उल्कामुख राजा देवमंदिरात नित्य धन देऊन ब्राह्मणांना संतुष्ट करीत असे. त्याची रूपसुंदर कांता भद्रशीलेला सोबत घेऊन तो सत्यनारायणाचे पूर्वसंकल्पित व्रत नदीचे तीरावर करीत होता. तेथे एक व्यापारी 'साधुवाणी' येऊन पोहोचला. त्याने ते पाहिले. प्रसाद घेऊन लगेच घरी जाऊन त्याने संततिसाठी व्रताचा संकल्प केला. व नारायणाच्या प्रसादे त्याची पत्नी महासाध्वी लीलावती गरोदर राहिली. पुढे त्याला कलावती कन्यारत्न झाले. परंतु साधुवाणीच तो. त्याने पूजेचा वायदा कन्येच्या लग्नात पुरा करावयाचे ठरविले. लग्नातही हा वायदा पुरा झाला नाही. त्यामुळे सत्यनारायणदेवाचा कोप झाला. एकदम चोरांना ऑर्डर सुटली वाण्याच्या घरचे सर्व द्रव्य हरण झाले. वाण्याच्या वायकोला नारायणाच्या शापामुळे शारीरिक, मानसिक रोग सुरु झाले. तिच्यावर भिक्षा मागण्याची पाळी आली. मुलगी कलावतीही भिक्षा मागू लागली. एके दिवशी घरी येण्यास बरीच रात्र झाली. आईने विचारले असता तिने सांगितले, 'आई ग, मी एका ब्राह्मणाच्या घरी गेले असता तो ब्राह्मण इच्छा पूर्ण करणारे व्रत करीत बसला होता.

तात्काळ आईच्या मनात तरुण मुलीविषयी निर्माण झालेल्या शंका दूर झाल्या व तिला सत्यनारायणाच्या नवसाची आठवण झाली. तिने लागलीच संकल्प केला. त्याबरोबर चोरांना दृष्टांत झाला. चोरीला गेलेले सर्व धन त्यांनी परत आणून दिले. इकडे परदेशात व्यापारासाठी गेलेले साधुवाणी व त्याचा जावई यांना चोरीच्या मालामुळे राजाने पकडून ठेवले होते. परंतु साधुवाण्याच्या बायकोच्या सत्यनारायण संकल्पामुळे चंद्रकेतू राजालाही दृष्टांत झाला. त्याला साधुवाणी व त्याचा जावई गुन्हेगार न वाटता एकदम पुण्यवान वाटू लागले. चोरीचा माल तर परत दिलाच; पण तेवढेच द्रव्य राजाने त्यांच्या हवाली केले. साधुवाण्याने त्यातील पुष्कळ द्रव्य ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून वाटून टाकले. (हे महत्त्वाचे). तरीही सत्यनारायणप्रभूला वाण्याची कसोटी पाहण्याची इच्छा झाली. 'नावेत काय आहे?' असे प्रभूने विचारले. 'वाणीच तो!' खोटे बोलल्याबरोबर त्याच्या नावेतील द्रव्याचे रूपांतर लतापल्लवांत झाले.

वाणी लगेच प्रभूला शरण गेला, शापाचा उःशाप झाला. परत लतापल्लवांचे द्रव्य झाले. वाण्याने यावेळी थाटाच्या सत्यनारायण पूजेचा वायदा केला. (भारतातील स्मगलर मंडळी हा प्रयोग का करीत नाहीत हे समजत नाही !) वाणी घरी आला. इकडे बायकोने व्रत पुरे केले होते. परंतु कन्या कलावती प्रसाद खाण्याचे विसरली. त्यामुळे जावई एकदम नाहीसा झाला. परत 'वायदा' केल्याबरोबर जावईबुवा दृश्य झाले. पुढे त्यांनी प्रत्येक पौर्णिमा व संक्रातीला पूजा करण्याचा निश्चय केला.

३. अंगध्वज राजाने पूजेचा प्रसाद न खाल्ल्यामुळे त्याचे १०० पुत्र, धन, धान्य, व त्याचे राज्य या सर्वांचा नाश एका क्षणात झाला. त्याने पूजा करताच परत सर्व नाश दूर होऊन परत प्राप्ती झाली शेवटी तर तो वैकुंठाला गेला.

तेव्हा शौनकादिक ब्राह्मणहो...

हे परमदुर्लभ व्रत जे कोणी आचरण करतील त्यांना वांछित फल देणारी ही पुण्यपावन कथा श्रवण करतील त्यांना धनधान्यादिक सर्व संपत्ती यथेच्छ प्राप्त होईल. दारिद्रय जाईल. तुरुंगातून सुटका होईल. भुतखेताचे भय नष्ट होईल. जी इच्छा असेल ती परिपूर्ण होऊन माणूस नारायणाच्या वैकुंठाप्रत जाईल.

(पुणे महानगरपालिकेने नवीन स्मशानभूमीला 'वैकुंठ' नाव दिलेलेच आहे.)

या पूजेसाठी...चांगले सत्कर्म करणारे ब्राह्मण पाचारण करावेत. नैवेद्य म्हणजे रवा, तूप, साखर, दूध व केळी. प्रत्येक वस्तु सव्वाशेर, सव्वा पायली, सव्वा खंडी घ्यावी. रवा नसेल तर तांदुळाचे पीठ घ्यावे. साखर नसेल तर गूळ घ्यावा आणि दूध नसेल तर ? पाणी चालणार नाही,...कारण ब्राह्मणाला कसे चालणार ? ...शेवटी दक्षिणा देऊन ब्राह्मणभोजन द्यावे.

ब्राह्मण-भिक्षुकांच्या पोटापाण्याची व्यवस्था पाहाण्यासाठी रचलेली ही भाकडकथा चांगल्या सुशिक्षितांनीही कवटाळून ठेवलेली आहे. कोणी ऐको वा न ऐको, भटजीबुवांचे संगीत सुरू असते. 'भाजी अळूची !! भाजी मेथीची'. कारण संगीत सत्यनारायणकार दुसरे काय सांगणार ?'

अलिकडे या पूजेचा समय गाठून अनेक व्यवहार उरकले जातात. कंत्राटदार, परमिटवाल्यांच्या घरी पूजेच्या

---

## एक नमुना उत्तम वाईन्स

सप्रेम नमस्कार वि. वि.

आम्ही आमच्या वास्तूमध्ये विदेशी मद्याचे दुकान दि. १४ सप्टेंबर १९७२ पासून सुरू करीत आहोत. त्या दिवशी 'श्रीसत्यनारायणाची पूजा' आयोजित केली आहे. तरी आपण आपल्या इष्टमित्रांसमवेत तीर्थ-प्रसादास संध्याकाळी ४ ते ७ पर्यंत अगत्य येण्याचे करावे ही विनंती.

प्रभात वि. गडकरी, (ले. कर्नल रिटायर्ड)
सौ. विजयाराणी गडकरी

---

निमित्ताने जाऊन भला मोठा प्रसाद सरकारी अधिकारी व पदाधिकाऱ्यांना घेता येतो. राजकीय पुढारी अनुनया-साठी पूजेला जातात. गल्लीबोळातील हातभट्टीवाले, मटकेवाले, क्लबवाले, यांना या सार्वजनिक सांस्कृतिक कार्याला सढळ हाताने मदत करता येते.

'गरिबी हटाव' व 'जय समाज-वाद' या घोषणा करणाऱ्या राज्य-कर्त्यांनी या भाकडकथेला बंदी घातली पाहिजे. ही कथा नुसती भाकड नाही ब्राह्मणी संस्कृतीचा वारसा चालविणारी आहे. ब्राह्मण्यावर हल्ले झाले. परंतु ज्यांनी ते केले त्या सत्यशोधकांची मुले आता सत्यनारायण करू लागली आहेत, याला काय म्हणावे ?

□ □ □

---

# विद्यार्थिनींचा दिवाळी वर्ग

विद्यार्थी साहाय्यक समिती व इनव्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट या संस्थांतर्फे मे १९७२ मध्ये विद्यार्थिनींचा वासंतिक वर्ग घेण्यात आला होता. 'व्यक्तिमत्त्व विकास' हा वर्गाचा प्रमुख उद्देश होता. या उद्देशास पूरक असे नानाविध कार्य-क्रम-व्याख्याने, चर्चा, प्रात्यक्षिके, सहली, छंदवर्ग, व्यायाम व खेळ या ती तीन आठवड्यांच्या काळात योजिले होते. महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागातून आलेल्या साठ विद्यार्थिनींनी या वर्गात भाग घेतला होता.

वासंतिक वर्गाचा अनुभव, त्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थिनी व संचालक या उभयतांना विशेष मोलाचा वाटला. या अनुभवांवर आधारित पण अधिक वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम असलेला एक वर्ग येत्या दिवाळीच्या सुट्टीत घेण्याचे योजिले आहे. वर्गाचा काळ **दिनांक १६ ते ३१ ऑक्टोबर** असा आहे. शिबिरात सुमारे आठ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात येईल.

या वर्गात भाग घेणाऱ्या विद्यार्थि-नींची व्यवस्था विद्यार्थी साहाय्यक समि-तीच्या वसतिगृहातच होईल. सह जीवनाच्या उद्देशाने विद्यार्थिनींनी पूर्ण-वेळ वसतिगृहातच राहाणे आवश्यक आहे भोजन व निवास–शुल्क रु. ५० आहे. आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थितीतील विद्यार्थिनींना या शुल्कात योग्य ती सवलत देण्यात येईल. मात्र त्यासाठी आर्थिकपरिस्थिती–निदर्शक आवश्यक ती प्रमाणपत्रे आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य व स्वतःचे पालक यांचेकडून अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थिनींना या वर्गात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी खालील पत्त्या-वर पत्र लिहून छापील अर्ज मागवावा. अर्ज पोस्टाने मागवल्यास ५० पैशांची पोस्टाची तिकिटे पाठवावीत. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख **५ ऑक्टोबर १९७२** ही आहे.


पत्रव्यवहाराचा पत्ता :

श्रीमती निर्मला पुरंदरे, ११३७/१३, मॉडेल कॉलनी, विद्यार्थी साहाय्यक समितीचे विद्यार्थिनी गृह, पोलीस ग्राऊंडजवळ, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे १६.

भेटीची वेळ : रोज सायंकाळी ५–३० ते ७–३० (रविवार सोडून).



# संस्कार




देवीदास बागूल

भडकलेल्या चितेच्या ज्वाळा पाहत तो कितीवेळ तरी तळहातावर हनुवटी टेकून बसला होता. या ज्वाळा विझल्या म्हणजे सगळा संसार विझला काय ? नाहीतरी आता घरी परतण्यासारखे काय उरले होते ? चितेवरची पत्नी हेच आपले सर्वस्व नव्हते काय ? आता ती गेली. कित्येक दिवस अंथरुणाला खिळली होती म्हणून काय झाले ? ती होती म्हणून तर सर्व नित्यनैमित्तिक कर्मे आपण धीरगंभीरपणे करत होतो ना ? कालच तिला औषध देताना तिनं आपल्याला दुसरं लग्न करण्याचा किती आग्रह केला, नाही ? पण यापुढे सगळं आयुष्य सेवेत वेचायचा आपला मनोदय आपणच तिला सांगितला...सकाळी उठावं आणि नदीत आंघोळ करावी... येताना परडीत चार फुलं आणावीत... देवपूजा करून सहधर्मचारिणीस तीर्थ द्यावे...मग तिला काढा करून द्यावा... गाईला भरवावे...कालचा दिवस अगदी असाच सुरू झाला होता. पण तेवढ्यात नारायणाची स्त्री धावत आली आणि खांबाला ओठंगून रडत राहिली...ती काहीच उत्तर देईना तेव्हा तिच्या घरी धावत गेलो. पाहतो तर नारायणच देवाघरी गेलेला !

आता याचा अंत्यविधी कसा करावा ? खरे म्हणजे हा काही प्रश्न होऊ शकत नाही. आणि झाला तरी त्याचे उत्तर शोधण्यासाठी डोके खाजवीत बसण्याची गरज नाही. मग त्याच्यावर चित्रपट काढण्याची तर गोष्टच सोडा.

पण कानडी दिग्दर्शक टी. पट्टाभिरामा रेड्डी यांनी ह्या गोष्टीवर 'संस्कार' नावाचा चित्रपट काढला आणि गिरीश कर्नाड ह्या लेखकाला मुख्य भूमिका देऊन तो मधाचा प्रश्न जगायला लावला.

गिरीश कर्नाड हाही असा संवेदना-

क्षम माणूस की त्याने त्या प्रश्नाची छटा न् छटा आपल्या दृष्टिक्षेपातून सहजपणे व्यक्त केल्या. नाही करणार तर सांगतो कोणाला ? सबंध चित्रपटात ज्याच्याजवळ मनमोकळे बोलावे असे होतेच कोण ?

नारायणप्पाला जाळावे की जाळू नये ? हाच प्रश्न पंचमंडळींना विचारला तर त्यांची उत्तरे ठरलेलीच होती. ते मुळी प्रश्न नव्याने समजूनच घेत नव्हते. पण आपल्याला मात्र नव्या प्रश्नाला जुनी उत्तरे देऊन कसे चालेल ? नारायणप्पा जन्माने ब्राह्मण होता ना ? पण जन्मभर तो ब्राह्मणासारखा वागला कुठे ? बाई, बाटली ह्याशिवाय त्याने केले तरी काय ? मग काय त्याला ब्राह्मणासारखे अग्निसंकार करायचे नाही ? नाही तरी कसं म्हणावं ? कारण त्याला आपण बहिष्कृत कुठं केलं होतं ?

पंचमंडळी नायकाला विचारतात की काय ठरवलं आपण ?

नायक म्हणतो, ठरवणार तरी काय ? शिवाय खर्चाचाही प्रश्न आहेच की ?

खर्चाचे नाव निघताच समोर बसलेली नारायणप्पाची स्त्री पुढे येते आणि अंगावरचे सोन्याचे दागिने काढून देते।

ह्या शूद्र स्त्रीने आपल्या बिनलग्नाच्या पण जिवाभावाच्या पुरुषासाठी एवढं करावं, आणि आपण नात्यागोत्याचे असून काहीच करण्याचा निर्णय घेऊ नये ?

पंचमंडळी तर सोने पाहताच अग्निसंस्कार करावयास तयार होतात. सोन्यामुळे सगळे प्रश्न समूळ नष्ट होतात, नव्हे काय ? आता कसला उशीर ?

नायक म्हणतो की मला प्रश्नाचं उत्तर शोधायला अवधी हवा. मी ग्रंथ धुंडाळून उद्या काय ते सांगेन.

म्हणजे सोन्याचा प्रभाव नायकावर पडलाच नाही काय ?

घरी येऊन नायक रात्रभर शास्त्रार्थ धुंडाळीत वसतो. पतित ब्राह्मणाला ब्राह्मणाप्रमाणे अग्निसंस्कार करावा की नाही ?

रुग्णशय्येवरील पत्नी म्हणते की झोपावे आता, फार रात्र झालीय !

पण हा म्हणतो की, नाही, आधी उत्तर शोधलं पाहिजे. शोधलेच पाहिजे.

खरंच, नारायणप्पा जिवंतपणी त्रासदायक होता, आणि मेल्यावरही त्रासदायक होतो आहे ? त्याला किती समजावले होते ! एकदा त्याच्या घरीसुद्धा गेलो होतो आपण ! तेव्हा हा त्या शूद्र स्त्रीला मांडीवर घेऊन बसला होता. तीच आदबशीर म्हणून आपल्याला पाहताच उठून उभी राहिली... नारायणप्पा मात्र ब्राह्मणपणाची लक्तरे काढण्यासाठी दारूची बाटली आणून आपल्याला म्हणाला की घेता का थोडे तीर्थ ? काय उद्धट प्रश्न हा ? आपण डोळे रागीट करून पाहिले, पण त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. म्हणतो कसा, गावातली मुलं माझ्यामुळं बिघडली असं म्हणतात, पण खरं सांगायचं तर तुमच्या शृंगारिक वाङ्मयामुळं ती बिघडली. संस्कृतमधून

शिकवलं तरी स्त्री-सौंदर्य ते स्त्री-सौंदर्यच! तुमच्या वर्गातला ह्या बघा एक विद्यार्थी. एके दिवशी साहित्यातल्या स्त्री सौंदर्याचा साक्षात अनुभव घेण्यासाठी त्याने नदीकाठी एका नवयौवनेला मिठी मारली. आहे माहिती? मग मला तेवढ्या शिव्या का? नाही, तुमची गोष्ट सोडा, तुम्ही सत्वशील ब्राह्मण आहात हे खरे. पण बाकीच्यांचं काय?

खरंच, आहोत का आम्ही शुद्ध?

रात्र संपली, पण उत्तर सापडलं नाही.

सकाळी नायकाचे डोळे कसे असहाय दिसत होते. त्याने खुंटीवरचे सोन्याचे दागिने काढले आणि नारायणप्पाच्या स्त्रीला, चंद्रीला, परत केले. दारी आलेल्या ब्राह्मणवर्गाला सांगितले, की शास्त्रात मला उत्तर सापडले नाही, मी आज मारुतीला कौल लावणार आहे.

नदीवर आंघोळ करून, फूल घेऊन नायक मारुतीला कौल लावतो. फूल उजवीकडे पडले तर मी स्वतः प्रेताला अग्नी देईन, डावीकडे पडले तर देणार नाही. मारुतीराया, मार्गदर्शन कर.

संध्याकाळ झाली तरी काहीच कौल लागला नाही.

आता मात्र नायक विकल झाला, वंचितच राहिला. त्या तशा असहाय मनोवस्थेत तो मंदिरातून बाहेर पडला आणि चार पावले टाकतो न टाकतो तोच चंद्री येऊन पायाला मिठी मारते.

काय उत्तर द्यावे हिला? मलाच जिथे उत्तर सापडले नाही, तो मी हिला काय सांगणार? हिचे सांत्वन कसे करणार? प्रश्नच किती बिकट आहे?

तिच्या डोक्याला हात लावून तो तिला उचलून घेतो आणि अकस्मात एक अघटित घडून येते!

एका शरीराची उब दुसऱ्या शरीराला मिळते आणि संस्कारांच्या अतीत असलेल्या स्त्रीपुरुष-देहांचे मीलन होते.

तृप्तीनंतर तो जेव्हा भानावर येतो तेव्हा तो कसा हरवलेला दिसतो!

काही न बोलता तो घरी जायला निघतो. वाटेत गावकरी दिसतात तेव्हा हा तोंड लपवतो. गावातला श्रेष्ठ आचार्य तोंड चुकवतो? तो स्वतःशीच उद्गारतो की, मी एक नवीनच गोष्ट शिकतोय, मी स्वतःला लपवतोय?

तो घरी येतो. ब्राह्मणवर्ग वाटच पाहत असतो. तो त्यांना सांगतो, की ह्या प्रश्नाच्या बाबतीत मी अनधिकारी आहे. तुम्ही मठाधिपतीकडे जावे हे बरे!

अग्निसंस्कार करावा की करू नये? ह्या प्रश्नाने आपली किती कसोटी घ्यायचे ठरवले आहे कोण जाणे?

तो घरात जातो आणि पत्नीच्या शेजारी बसतो. आता तिचा ताप फारच वाढला आहे. तडफड तडफड होतेय तिची!

आणि हाय! घरातला हा दिवाही मालवला!

बैलगाडीत तिला घालून नदीकाठी आणले आणि अग्निसंस्कार दिला. पुढे काय?

दहाही दिशा मोकळ्या आहेत. नेसत्या वस्त्रानिशी तो वाट फुटेल तिकडे निघतो.

कुठे? कोण ह्याचे उत्तर देणार?

हा प्रश्न तर अगदीच अपूर्व आहे.

आणि तो पहिला प्रश्न? तो तर आहेच. पण शिवाय त्याच्या सोबतीला हाही आहेच. जाणार कुठे?

अनेक गावे तो ओलांडतो. वाटेत एकजण भेटतो. त्याला टाळण्याचा प्रयत्न करूनही टाळता येत नाही. हा नवा जोडीदार नायकाची पाठ सोडत नाही. एकदा साप आडवा जातो. जोडीदार त्याला मारतो. नायक म्हणतो, दे फेकून दूर. पण जोडीदार म्हणतो की, त्याला अग्निसंस्कार केला पाहिजे.

म्हणजे तो प्रश्न पुन्हा आहेच की!

ते दोघे एका जत्रेच्या ठिकाणी येतात. देवळात ब्राह्मणांना अन्नदान असते. जोडीदार नायकाला तेथे जेवणासाठी पाठवतो. नाही म्हणवत नाही म्हणून नायक तेथे जातो. पण जेवताना त्याचे मन भरून येते. डोळे झरू लागतात. पाणी पिताना ठसका लागतो. तेवढ्यात वाढप्यांपैकी एकजण त्याला ओळखतो. नायकाला अपराध्यासारखे वाटते. त्याला वाटते, की आपण अशौचात असताना पंगतीत बसून सगळ्यांना विटाळले! छे छे! तो तिथून धूम ठोकतो आणि गावाबाहेर येऊन थांबतो.

मागोमाग जोडीदार येतो. आत्ता मात्र नायक जोडीदाराला सगळं सांगून टाकतो. तो म्हणतो, नारायणप्पाला नावं ठेवण्यात काय अर्थ आहे. नारायणप्पा निदान प्रामाणिक आणि मनमोकळा तरी होता. आम्ही तर ढोंगीच आहोत मी तर शूद्र स्त्रीबरोबर रत झालो. नाही, मला परत गेलेच पाहिजे. नारायणप्पाला अग्निसंस्कार केलाच पाहिजे. आणि ते काम मलाच केले पाहिजे.

नायक शांत चित्ताने गावाकडे परततो. प्रश्न गळून पडलेला असतो. प्लेगमुळे गाव निर्मनुष्य झालेला असतो. फक्त चंद्रा तेवढी प्रेताची राखण करीत थांबलेली असते.

नायक गावात येतो आणि सरळ नारायणप्पाच्या घराच्या पायऱ्या चढतो.

त्याच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे चंद्रा डोळे भरून पाहते.

डोळे भरून पहावा असाच हा नायक होता. स्वत: गिरीश कर्नाड यांनीच ही भूमिका केली. शुचिर्भूत, सकलशास्त्रपारंगत ब्राह्मणाची भूमिका करताना 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही' ह्या आत्मप्रत्ययी माणसाचे रंग त्या भूमिकेत मिसळण्याचे कुशल कार्य गिरीश कर्नाड ह्यांच्या बोलक्या डोळ्यांनी बघताबघता तडीस नेले.

प्रश्न एकच! पण त्याने ह्या सद्सदविवेकी माणसाला कसे अस्वस्थ, अनिकेत, अबोल, आणि अंतर्मुख केले; आणि शेवटी अंतर्मुखतेतून आलेल्या प्रकाशातच तो मूळ प्रश्न विरणाऱ्या अंधाराप्रमाणे नाहीसा झाल्यामुळे नायक कसा शांत, घररिघा झाला ह्याची बोलकी दर्शने ह्या चित्रपटात फुलाप्रमाणे उमलली आहेत.

आणि उमललेले फूल पाहिल्यावर आपण अबोल होण्यातच सार्थक नाही काय?

□ □ □

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

## भाग दोन

खाली पाच विधाने केली आहेत. त्यातील बरोबर पर्यायावर खूण करा.

१. पिवळा + नीळा = अ. हिरवा
ब. पारवा
क. काळा
ड. नारिंगी


२. लाल + पिवळा = अ. हिरवा
ब. नारिंगी
क. तपकीरी
ड. करडा.

३. नीळा + लाल = अ. जांभळा
ब हिरवा
क. पिवळा
ड. पारवा.

४. नारिंगी रंगाच्या विरुद्ध रंग –
अ. काळा ब. नीळा क. पिवळा ड. करडा.

५. राष्ट्रध्वजातील केशरी रंग कोणत्या मूळ रंगाच्या मिश्रणांनी तयार झाला आहे ?
अ. नीळा + फिक्का पिवळा
ब. पिवळा + फिक्का लाल
क. जांभळा + काळा
ड. लाल + नारिंगी.

ANOOS (Weekly) । 50 Paise । Regd. No.MH64



# माणूस

३० सप्टेंबर १९७२ । किमत पन्नास पैसे

**भुयारी रेल्वे**

लंडनमधील पाच प्रख्यात वहातूक-तज्ज्ञांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे ३५० कोटी रुपये खर्चून कुलाबा ते कुर्ला असा भुयारी रेल्वे-मार्ग मुंबईत बांधला जाईल. या योजनेचे काम १९७३ च्या दिवाळीत हाती घेतले जाईल.

– टाइम्स ऑफ इंडिया

## हे करण्यापूर्वी प्रा. डी. डी. कोसंबींना विसरू नका

".. किमान या बाबतीत माओचा चीन आपला गुरु असला पाहिजे. मी तुम्हाला एक मजेशीर आव्हान देतो. माझ्या भारतातील अनेक प्रकल्प परकीय तंत्रज्ञांनी आखलेले आहेत. त्यातील किमान एक प्रकल्प मला असा काढून दाखवा, की जो उभारताना परकीय कंपन्यांच्या वा परकीय देशांच्या फायद्याचा विचार झालेला नाही ! आणि हे केवळ एवढ्यावरच थांबत नाही. अनेक सामाजिक दडपणांना आणि राजकीय हितसंबंधांना हे प्रकल्प नित्यनेमाने बळी पडत असतात.

निदान आज तरी मला थोडे बोलू द्या. या देशातील गरीब, अर्धशिक्षीत, अर्ध-पोटी जनतेने खूप काळ खूप काही सोसले आहे. निदान यापुढे तरी एक गोष्ट करा. या भूमीत ज्यांचे पाय रुजले आहेत अशा शास्त्रज्ञांच्या संचा-कडून या पुढे येणारी प्रत्येक योजना तपासून घ्या. हे तुम्ही कराच असा माझा आग्रह नाही. पण हे तुम्ही करणार नसाल तर तुमच्या या योजना आणि या योजना राबवणारे शास्त्रज्ञ यांची होळी करीत या देशातील जनतेचे थवेच्या थवे एक वेळ बाहेर पडतील. चीनच्या सांस्कृतीक क्रांती-नेहि पाहिले नाहीत असे चमत्कार या भूमीत तुम्हाला पाहायला मिळतील !"